# अर्थबोधपत्रिका

(आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक विषयांवरील द्वैमासिक)

खंड १ : अंक ५ — नोव्हेंबर-डिसेंबर २००२

- संस्कृती : इतिहास व स्वरूप
- सांस्कृतिक सापेक्षतावाद
- जपानमधील संस्कृती व आर्थिक वागणूक
- चीनची संस्कृती
- अकरा सप्टेंबरनंतर : नोम चोम्स्की
- सातत्यपूर्ण विकास व संस्कृती
- आर्थिक विकास व संस्कृती
- संस्कृती व मानसशास्त्र
- संस्कृती व भारत
- मध्य महाराष्ट्रातील पाऊस
- जगाच्या पाठीवर (संस्कृती)
- कालप्रवाहात.....

## संस्कृती विशेषांक

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

## अर्थबोधपत्रिकेविषयी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेतर्फे "अर्थबोधपत्रिका" हे आर्थिक, सामाजिक, व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन, केवळ खाजगी वितरणासाठी प्रकाशित करण्यात येत होते. ते आता सर्वांसाठी खुले करण्यात आले आहे. सर्वसामान्य मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे मांडणे, तसेच विविध समस्यांच्या संदर्भातील सैद्धांतिक व संकल्पनात्मक बाबी सोप्या शब्दांत देणे, हे या पत्रिकेचे उद्देश आहेत. विशेषतः अनेक विषयांवरील सखोल माहिती व सैद्धांतिक बैठक असणारे विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके व पुस्तके आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा आमचा प्रयत्न आहे.

अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी ५० रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $ १० ) डिमांडड्राफ्ट /मनीऑर्डर/पोस्टलऑर्डर/चेकने किंवा रोख पाठवावी. त्याबरोबर संपूर्ण नाव व पूर्ण पत्ता पाठवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानावर देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : खंड १ (अंक ५ ) : नोव्हेंबर-डिसेंबर २००२**

**संपादक** - रमेश पानसे, **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :**व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,अर्थबोध,९६८/२१-२२,
रत्ना हॉस्पिटल जवळ, सेनापती बापट मार्ग, पुणे ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ ई-मेल : ispe@vsnl.com

: ५६५७२१० फॅक्स : ५६५७६९७

# अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| संपादकीय | ३ |
| (१) संस्कृती : इतिहास व स्वरूप | ४ |
| (२) सांस्कृतिक सापेक्षतावाद | ९ |
| (३) जपानमधील संस्कृती व आर्थिक वागणूक | १५ |
| (४) चीनची संस्कृती | १९ |
| (५) सातत्यपूर्ण विकास व संस्कृती | २५ |
| (६) अकरा सप्टेंबर व नोम चॉम्स्की | २७ |
| (७) संस्कृती व आर्थिक विकास | ३५ |
| (८) संस्कृती व मानसशास्त्र | ३८ |
| (९) संस्कृती व भारत | ४३ |
| (१०) मध्य महाराष्ट्रातील पाऊस | ४७ |
| (११) जगाच्या पाठीवर.....(संस्कृती) | ५३ |
| (१२) कालप्रवाहात...... | ५७ |


**सूचना** ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे.

◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात/वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली 'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने' अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे.

◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे.

# वाचकांचा प्रतिसाद

'अर्थबोधपत्रिके'चा खंड १, अंक १ (मार्च-एप्रिल २००२) यामधील 'कारे बदरा, कारे बदरा' हा लेख व त्यावरील श्री. श्रीकांत धुंडिराज जोशी यांची खंड १ अंक ३ (जुलै-ऑगस्ट २००२) या अंकातील प्रतिक्रिया (वाचकांचा प्रतिसाद) वाचली. या विषयाबद्दल मला असलेली माहिती पुढे देत आहे.

'कारे बदरा...' या लेखात 'भादली' व जोशी यांच्या पत्रात 'सहदेव-भाडळी' यांचे उल्लेख आहेत. या विषयावर श्रेष्ठ संशोधक श्री. रा. चिं. ढेरे यांचा विस्तृत लेख आहे; 'लोकसंस्कृतीची क्षितिजे' (१९७१) या त्यांच्या संग्रहात तो समाविष्ट आहे. सहदेव आणि भाडळी यांच्या प्रश्नोत्तरांमधून पावसाचे भविष्य सांगितले जाते; ही दुक्कल म्हणजे शंकर-पार्वतीच होत; मुळात हे पावसाचे अडाखे संस्कृत पोथ्यांमधील आहेत. इत्यादी तपशील त्या लेखात वाचल्याचे आठवते.

भारतीय संस्कृतीकोश (सं. महादेवशास्त्री जोशी) या ग्रंथात 'सरवदे जोशी' या शीर्षकाखाली सहदेव-भाडळीचे संवाद म्हणून पावसाचे भविष्य सांगणाऱ्या जमातीची माहिती दिली आहे. 'सरोदे' असेही या जमातीचे पर्यायी नाव असल्याची आठवण आहे. संस्कृतीकोशातील नोंदीच्या शेवटी साधन-साहित्य म्हणून श्री. ढेरे यांच्या पुस्तकाचाच उल्लेख आहे.

संस्कृतीकोशातच 'सहदेव जोशी' या शीर्षकाखाली आणखी एक नोंद आहे. हीही भविष्य सांगत फिरणारी व भिक्षेवर उदरनिर्वाह करणारी एक जमात आहे. मात्र ती पावसाचे भविष्य सांगते असा उल्लेख नोंदीत नाही.

काही वर्षांपूर्वी हैदराबादच्या 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रूरल डेव्हलपमेंट' या संस्थेच्या एका प्रकाशनात आंध्रप्रदेशातही अशी एक पावसाचे भविष्य सांगणारी भटकी जमात असल्याचा उल्लेख होता. या लेखाच्या लेखकाला महाराष्ट्रातील तत्सम जमातीची माहिती सांगणारे पत्र मी लिहिले होते. त्याचे उत्तरही आले होते. पण हा संवाद पुढे चालू राहिला नाही.

लोकसंस्कृतीचा हा आविष्कार गुजरात, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेशातही दिसून येत असेल तर, देशाच्या इतर राज्यांमधूनही तो आढळून येण्याची शक्यता आहे. प्रादेशिक लोकसंस्कृती व अखिल भारतीय लोकसंस्कृती यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करणारांना हा विषय आकर्षक वाटण्याचा संभव आहे. *(पान क्रमांक ४२ वर पाहावे.)*

# संपादकीय

अर्थबोधपत्रिकेच्या अंकाची वाचक उत्सुकतेने वाट पाहतात, असा प्रतिसाद अनेकांकडून मिळाल्यामुळे, मागील अंकापासून पत्रिकेची आठ पाने वाढविली आहेत. या जास्तीच्या आठ पानांचा उपयोग करून, नावाजलेल्या विचारवंतांची महत्त्वाच्या विषयांवरील मते, त्यांच्याच शब्दात द्यावी असा विचार केला. त्यानुसार मागील अंकात जॉन होल्ट यांची मुलाखत छापली. या अंकात नोम चॉम्स्की यांच्या गाजलेल्या मुलाखतींमधील निवडक भाग, वाचकांना वाचायला मिळत आहे. अमेरिकेतील अकरा सप्टेंबरच्या घटनेनंतरच्या मुलाखतींवर आधारित असा हा मजकूर असल्यामुळे, वाचकांना त्याचे विशेष औत्सुक्य वाटेल.

पत्रिकेचा हा अंक दिवाळीपूर्वी वाचकांच्या हाती पडत असल्यामुळे 'दिवाळी अंक' असे या अंकाचे स्वरूप ठेवले आहे, अंक अधिक पानांचा काढला आहे. अंकाला खास विषयही आहे. 'संस्कृती' या विषयाचा वेध या अंकात घेतला आहे. संस्कृती ही आता नित्य वापरातली संज्ञा झाली आहे. विविध ज्ञानक्षेत्रांत या विषयाला, विविध अंगांनी भिडले जाते. परंतु नेहमीच्या संस्कृती संज्ञेच्या वापरात या अंगाचा उल्लेख क्वचितच् होतो. त्यामुळे, या संज्ञेची ही विविध परिमाणे वाचकांसमोर, या अंकातून आणली आहेत.

भारताची सांस्कृतिकदृष्ट्या जवळीक आहे अशा पूर्वेकडील दोन राष्ट्रांच्या, चीन व जपान यांच्या संस्कृतीबद्दल माहिती देणारे खास लेख येथे दिले आहेत. तसेच 'संस्कृती व आर्थिक विकास,' 'संस्कृती आणि सातत्यपूर्ण विकास', 'संस्कृती व मानसशास्त्र' यांचा परस्परसंबंध मांडणारे लेख, हा या अंकाचा विशेष ठरावा. सांस्कृतिक सापेक्षतावादाची संकल्पना ही नवीन आणि तेवढीच संस्कृतीविषयक विश्लेषणात उपयोगी पडणारी संकल्पना आहे; तिचीही ओळख वाचकांना करून दिली आहे. वाचकांनी आणखी विचारप्रवृत्त व्हावे यासाठी, संस्कृतीविषयाशी सुसंगत असाच लेख पुरवणी म्हणून, या अंकातून पाठवीत आहोत. तो अंकाच्या शेवटी असून वाचकांनी जरूर वाचावा.

अर्थबोधपत्रिकेचा वाचकवर्ग एक सुसंस्कृत आणि नवज्ञानाला जवळ करणारा असा वाचकवर्ग आहे. त्यामुळे आमचे संपादनाचे काम आम्हाला अधिक चोखंदळपणे करावे लागते; पण हा आमच्या आनंदाचा भाग आहे, असे आम्ही आवर्जून सांगू इच्छितो.

# ⌘ संस्कृती : इतिहास व स्वरूप ⌘

'संस्कृतीची व्याख्या करणे म्हणजे मुठीत वारा पकडण्यासारखे आहे' असे रॉबर्ट बोरोस्की याने म्हटले आहे. तर रेमंड विल्यम्सने म्हटले आहे की, 'भाषेतील (इंग्रजी) दोन-तीन अगदी गुंतागुंतीच्या शब्दांपैकी 'संस्कृती' हा एक शब्द आहे.' विल्यम्सने इंग्रजीतल्या आणि इतर युरोपियन भाषांतल्या 'संस्कृती' या संज्ञेच्या शेकडो व्याख्या अभ्यासल्यानंतर, झालेले हे त्याचे मत आहे.

**शब्दाचा इतिहास**

पीटर मॉरिस याने पाश्चात्य इतिहासातील 'कल्चर' म्हणजे 'संस्कृती' या शब्दाचा होत गेलेला विकास सांगून, स्वतःची व्याख्याही देण्याचा प्रयत्न केला आहे. मूळ लॅटिन कोलेर (colere) या धातूपासून कल्चर हा शब्द विकसित झाला. त्याचा मूळ अर्थ 'वाढ' असा आहे. व्याकरणात ते एक 'नाम' आहे आणि कशाची तरी 'वाढ' होणे हा त्याचा मूळ अर्थ आहे. मुख्यतः एखादे रोप, वनस्पती, जनावर यांच्या वाढीच्या संदर्भात कल्चर हा शब्द वापरला जात असे. सोळाव्या शतकात हा शब्द माणसाच्या संदर्भात वापरायला सुरूवात झाली. विशेषतः माणसाचे मन, बुद्धी यांच्या संदर्भात ती संज्ञा वापरली जाऊ लागली. एखाद्या प्रक्रियेचे 'नाम' म्हणूनच ती वापरली जात असे. त्याचे शिक्षणाच्या प्रक्रियेशी साधर्म्य दर्शविले जात असे. हळूहळू एकोणिसाव्या शतकापर्यंत या संज्ञेचाच विकास होऊन, तिने, व्यक्ती, समाज आणि संपूर्ण जागतिक समुदाय यांना आपल्या अर्थाच्या कवेत घेतले. मात्र, तत्कालीन अर्थाच्या दृष्टीने, 'कल्चर' हे सर्व व्यक्तींना, समुदायांना अथवा देशांना लागू होत नव्हते. काही लोक, काही समुदाय, काही देश फक्त 'कल्चर्ड' मानले जात. त्यांच्या 'कल्चर्डपणा'नुसार त्यांची उतरंडही लावता यायची. (अर्थात, इंग्लंडमधील लोक हे सर्वात जास्त कल्चर्ड मानले जायचे, हे ओघानेच आले !) कल्चर्ड लोक म्हणजे असे लोक की ज्यांना पाश्चात्य ज्ञान, विज्ञान, कला यांची चांगली माहिती अवगत असायची. (या अर्थाने ब्रिटिशांनी भारतीय लोकांना 'कल्चर्ड' बनवले !)

विसाव्या शतकात मात्र या संज्ञेच्या अर्थास कलाटणी मिळालेली दिसून येते. आता, 'एकच' कल्चर मानले जात नाही; उलट आता, विविध 'संस्कृती'ची माणसे जगात एकत्र नांदताहेत. प्रत्येक जनसमुदायास आता स्वतःची आणि इतरांपासून वेगळी अशी जीवनपद्धती आहे, संस्कृती आहे. एवढेच नव्हे

तर, एका मोठ्या संस्कृतीत अनेक उपसंस्कृती वास करीत असतात. अनेक लहान-सहान उपनद्यांचा (संस्कृतींचा) प्रवाह एकत्र येऊन मोठ्या नदीचा प्रवाह निर्माण होतो. म्हणजे जगाचा सांस्कृतिक भूगोल निर्माण होतो.

## संस्कृती संकल्पनेचे स्वरूप

आता कल्चर हे नाम न राहता, क्रियापद झाले आहे. आता ते 'काही विशिष्ट गुणांचा व्यक्तींमध्ये असलेला समुच्चय' राहिलेला नाही, तर वेगवेगळ्या नि बदलत्या अशा लोकवागणुकीच्या पद्धतींमध्ये त्याचे रूपांतर झाले आहे. आता, कल्चर किंवा संस्कृती म्हणजे एखाद्या विशिष्ट लोकसमुदायाची जीवनपद्धती. जीवनपद्धती असे म्हणताना, पीटर मॉरिस यांच्या मतानुसार, पुढील चार गोष्टींचा यात समावेश होतो.

१) संस्कृती ही संज्ञा लोकसमुदायाच्या संदर्भात वापरली जाते. हा लोकसमुदाय म्हणजे तथाकथित वांशिक किंवा राष्ट्रीय समुदायच असला पाहिजे असे नाही. उदाहरणार्थ, एखादी व्यक्ती, एकाच वेळी दोन किंवा अधिक समुदायांत वावरत असेल, अनेक संस्कृतींची सभासद असेल. मी भारतीय संस्कृतीचा सदस्य असेन त्याचवेळी, मी व्यावसायिकदृष्ट्या शिक्षकीसंस्कृतीचा सदस्यही असेन.

२) संस्कृती ही शिकण्याची, आत्मसात करण्याची बाब आहे. ती व्यक्तीने बाह्य जगाकडून (नजिकच्या समाजातून) आत्मसात केलेली वागणूक आहे. म्हणजे असे की, एखादी अंगभूत असलेली बाब हा संस्कृतीचा भाग ठरत नाही. माणूस अन्न सेवन करतो ही 'संस्कृती'च्या व्याख्येशी संबंधित बाब नाही. परंतु एखाद्या विशिष्ट समुदायाची विशिष्ट प्रकारचे नि विशिष्ट पद्धतीने पदार्थ करण्याची व खाण्याची जी सवय आहे, ती त्यांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग होऊ शकते. थोडक्यात, संस्कृती म्हणजे मानवाची निसर्गदत्त वैशिष्ट्ये नव्हेत. ती समाजाने दीर्घकालात बहाल केलेली वैशिष्ट्ये आहेत.

३) 'संस्कृती'मध्ये मूल्ये, श्रद्धा, कल्पना तसेच भौतिक वस्तू आणि मानवी वागणूक यांचा समावेश होतो. उदाहरणार्थ, मोठ्यांबद्दल आदर दर्शविण्याच्या पद्धती, विवाहाचे पारंपरिक रीती-रिवाज, येथपासून ते स्वातंत्र्याची संकल्पना अथवा खाजगी मालमत्तेचा हक्क असणे वा नसणे इथपर्यंतच्या सामाजिक बाबींचा समावेश या संज्ञेत केला जातो.

४) संस्कृतीत कालाबरोबर बदल होतो. या अर्थाने कोणतीही संस्कृती स्थिरपद नाही. उलट सर्वच संस्कृती कालौघात बदलत जातात. तशी लवचिकता त्यांच्यात असते. इतर संस्कृतींशी येणारा संबंध, संकर, नव्या कल्पना, तंत्रज्ञान,

शोध या साऱ्यांमुळे संस्कृतीत बदल अपरिहार्य असतो. त्यामुळेच वेगवेगळ्या संस्कृतींनी परस्परांपासून काय घेतले हा, मानवी भूगोलाचा महत्त्वाचा अभ्यासविषय असतो.

५) या व्यतिरिक्त आणखीही एका घटकाचा समावेश यात करता येतो. तो म्हणजे प्रतीके. संस्कृती ही प्रतीकांवर म्हणजे अमूर्त अशा आकलनपद्धतींवर अवलंबून असते. वेगवेगळ्या कल्पना, वस्तू, भावना किंवा वागणुकींमध्ये या प्रतिकयुक्त मार्गांचा वापर समाज करीत असतो. उदाहरणार्थ, भाषा-प्रतीक माध्यमातून लोक परस्परांशी संवाद साधत असतात. थोडक्यात असे की, प्रत्येक संस्कृतीची स्वतःची अशी, विविधसंदर्भातील प्रतीक-व्यवस्था असते.

'संस्कृती'चे स्वरूप जे ठरते ते अनेक घटकांच्या मिश्रणाने जसे घडते तसेच ते अनेक गोष्टींच्या परिणामांनीही ठरते. उदाहरणार्थ, हवामान हा असा एक परिणामकारक घटक आहे. हवामानाचा संबंध कपडे कोणते व कसे असतील यांच्याशी जसा असतो तसाच तो पिकांशी, जनावरांशी, वृक्षराजींशीही असतो; त्यामुळेच तो समाजाची अन्नपद्धती ठरविणाराही असतो. तसेच विशिष्ट प्रदेशाचा भूगोल, भूगर्भशास्त्र यांचाही परिणाम संस्कृतीवर होत असतो. शेती, खाणी, नद्या-नाले इथपासून ते वाहतूक, औद्योगिकरण इथपर्यंत हे परिणाम पोचत असतात. असाच पण वेगळ्या संदर्भात, संस्कृतीवर, इतिहास आणि राजकारण यांचा प्रभाव पडत असतो. वेगवेगळे राजे-रजवाडे, युद्धे, इतिहासकालातील विविध राजवटी, त्यांचे कायदे-नियम, त्यांनी रुजवलेल्या परंपरा याही संस्कृतीचे रूप घडवीत असतात. प्लासीच्या लढाईतील इंग्रजांचा विजय ही घटना, पुढे दोनशे वर्षांच्या भारतीय संस्कृतीवर परिणाम करणारी नाही का ?

## संस्कृती-संकल्पनेचा इतिहास

'द एन्सायक्लोपेडिया ऑफ फिलॉसॉफी'ने संस्कृतीची संकल्पना व तिचा इतिहास स्पष्ट केला आहे. साधारणपणे, अठराव्या शतकाच्या अखेरीपासून एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंतच्या काळात 'संस्कृती' ही संकल्पना चार अंगांनी विकसीत होत गेली. एक, संस्कृती म्हणजे मनाची एक सर्वसामान्य स्थिती किंवा सवय या अंगाने तिच्याकडे पाहिले गेले. मानवी मनाची एखादी आदर्श स्थिती, ती पूर्णतेची स्थिती असावी, अशा दिशेने जाणारी ही संकल्पना आहे. दोन, संपूर्ण समाजातील बौद्धिक नि नैतिक विकासाची सर्वसामान्य स्थिती दर्शविणारी अशी ही कल्पना मानली गेली. तीन, प्रत्यक्षातील कलात्मक नि बौद्धिक कौशल्यांच्या निर्मितीला ही संकल्पना वापरली जाऊ लागली आणि,

चार, एखाद्या मानव समुदायाची, भौतिक, बौद्धिक आणि आध्यात्मिक अशी साकल्याने मानवी जीवनपद्धती या संकल्पनेने ती विचारात घेतली जाऊ लागली.

'संस्कृती'च्या संकल्पनेच्या इतिहासात अनेकदा ही संकल्पना अर्थाच्या संदर्भात वादग्रस्त ठरलेली आहे. विशेषत: अठराव्या नि एकोणिसाव्या शतकांत, युरोपमध्ये जे काही सामाजिक व राजकीय बदल होत गेले त्यांच्या संदर्भात ही संकल्पना तावून सुलाखून निघाली आणि तिला जो काही आजचा अर्थ आहे, तो प्राप्त झाला. तीन दिशांनी तो बहरत गेला. एक म्हणजे, संस्कृती या शब्दाचा जो मूळ अर्थ - वाढ, वाढणे, वाढविणे या अर्थाने व्यक्तीच्या बाबतीत एक आदर्शवत अशी मानवी मनाची पूर्णावस्था गृहीत धरून ती एक सार्वत्रिक लागू पडणारी अशी अवस्था मानली गेली; अर्थातच तिच्या वापरात नैतिक, आध्यात्मिक असे रंग प्रामुख्याने होते. या संकल्पनेच्या अगदी विरूद्ध अर्थाने, म्हणजे माणसाच्या दैनंदिन जीवनव्यवहारांशी निगडित अशा ज्या बाबींनी माणसे आपले आयुष्य अर्थपूर्ण करतात, त्यासाठी ज्या काही वेगवेगळ्या पद्धतींना नि मूल्यांना ते जवळ करतात, त्या अर्थाने, ही संकल्पना अधिकतर वापरली जाऊ लागली. आज समाजशास्त्र, मानववंशशास्त्र या सामाजिक शास्त्रात, भिन्न अशा संस्कृतींचा जो अभ्यास प्रचलित आहे, त्यात या अर्थाने ही संकल्पना येते. थोडीशी या दोन्हींच्या मध्ये दबलेली अशी, पण व्यवहारात सर्रास वापरली जाणारी संकल्पना म्हणजे, प्रत्यक्षातील बौद्धिक नि कलात्मक वस्तूंचा समुच्चय. ही संकल्पना पहिल्या दोन्हींपेक्षा गुणात्मकदृष्ट्या वेगळी आहे. कारण, पहिल्या दोन्ही दिशा काही (काल्पनिक) पूर्णतेकडे अंगुलिनिर्देश करणाऱ्या आहेत. तिसऱ्या संकल्पनेत असे 'पूर्णत्वा'चे अंग मात्र जोडता येत नाही.

इंग्रजी वाङ्मयात 'कल्चर' या शब्दाचा, एक शास्त्रीय संज्ञा म्हणून वापर करण्याचे श्रेय एडवर्ड टेलर याला दिले जाते. १८७१ साली प्रसिद्ध झालेल्या 'प्रिमिटिव्ह कल्चर' या त्याच्या ग्रंथात, त्याने स्वत:च्या सविस्तर व्याख्येसह ही संकल्पना मांडली. (अर्थात, त्याहीआधी ती जर्मन भाषेत 'समग्र जीवनपद्धती' या अर्थाने, येऊन स्थिर झालेली होती.) याच अर्थाने, 'गुंतागुंतीची समग्रता' असे शब्द सुरूवातीलाच आपल्या व्याख्येत टेलरने वापरले आहेत. मानवी जीवनातील सर्व धाग्या-दोऱ्यांची 'गुंतागुंतीची समग्रता', संस्कृती या शब्दात त्याला अभिप्रेत होती. (टेलरने आपल्या व्याख्येत कल्चर नि सिव्हिलायझेशन या दोन्ही संज्ञा समानार्थी वापरल्या आहेत !) "मनुष्याने समाजाचा एक सदस्य म्हणून, आत्मसात केलेल्या श्रद्धा, ज्ञान, कला, नीतीमत्ता,

कायदे, परंपरा आणि अशाच इतर सर्व क्षमता नि सवयी यांची गुंतागुंतीची समग्रता म्हणजे कल्चर किंवा सिव्हिलायझेशन होय," अशी टेलरने संस्कृतीची व्याख्या केली. टेलरच्या या व्याख्येनुसार पाहिले तर, सर्वच मानवी समुदायांना स्वत:ची विशिष्ट अशी संस्कृती आहे, हे लक्षात येईल. मार्क्सच्या विचारांच्या प्रभावांनी, 'संस्कृती' संकल्पनेला आणखी एक विशेष असे परिमाण लाभले आहे. टेलरच्या व्याख्येतील, "मनुष्याने, समाजाचा एक सदस्य म्हणून आत्मसात केलेल्या श्रद्धा, ज्ञान, कला, नीतीमत्ता, कायदे, परंपरा आणि अशाच इतर सर्व क्षमता नि सवयी यांची गुंतागुंतीची समग्रता," तिच्यातील अर्थात्मकता नि मूल्ये यांना समाजातील विशिष्ट प्रकारच्या सामाजिक नि आर्थिक संस्था घडवीत असतात. भौतिक जीवनातील गुंतागुंतीच्या संबंधांचा माणसाच्या व्यक्तीगत मूल्यांवर व सामाजिक संबंधांवर परिणाम होत असतो, असे गृहीत धरले तर मग 'संस्कृती'ची व्याख्या विस्तारून त्यात भौतिक संस्था-संघटनांनाही स्थान अनिवार्य ठरते. आज अनेक समाजशास्त्रज्ञ व मानववंशशास्त्रज्ञ ही भूमिका स्वीकारतात.

सामाजिक शास्त्रांच्या विश्लेषणात वापरली जाणारी 'संस्कृती'ची व्याख्या 'अमेरिकन हेरिटेज डिक्शनरी'ने (१९९२) दिली आहे. (अ) सामाजिक स्तरावर प्रक्षेपित केल्या जाणाऱ्या, वागणुकीचे आकृतिबंध, कला, श्रद्धा, संस्था आणि इतर सर्व, मानवी कृतीतून नि विचारांतून साकार झालेल्या गोष्टींचा समुच्चय म्हणजे संस्कृती असे म्हणता येईल. (आ) हे वागणुकीचे आकृतिबंध, स्वभाववैशिष्ट्ये आणि निर्मित गोष्टी या सर्व विशिष्ट वर्गप्रकाराशी, उदाहरणार्थ, क्षेत्र, विषय किंवा अभिव्यक्तीचा प्रकार, यांच्याशी संबंधित असतात. अशी वर्णनात्मक व्याख्या प्रामुख्याने मानववंशशास्त्रात त्यांतही संस्कृतिविषयक मानववंशशास्त्रात उपयोगात आणली जाते. (या शब्दकोशाने 'मानववंशशास्त्रा'ची व्याख्या अशी केली आहे, : मानवाचा उगम, त्याची वागणूक, आणि त्याचा शारीरिक-सामाजिक-सांस्कृतिक विकास यांचा अभ्यास करणारे शास्त्र) आता, 'संस्कृती'चा अभ्यास ही मानववंशशास्त्राची मक्तेदारी राहिलेली नाही. समाजशास्त्र, मानसशास्त्र यांपासून ते राज्यशास्त्र, अर्थशास्त्र नि संदेशवहन, शिक्षणशास्त्रापर्यंत सर्व शास्त्रे संस्कृतीचे, त्यांच्या त्यांच्या शास्त्रांतील आशयांवर होणारे परिणाम तरी तपासतात किंवा त्यांच्या शास्त्रातील आशयांचे संस्कृतीवर होणारे विशिष्ट वा तुलनात्मक परिणाम शोधण्याचा प्रयत्न करतात.

# ⌘ सांस्कृतिक सापेक्षतावाद ⌘

संस्कृती म्हणजे नेमके काय ते आपण या आधीच्या लेखात वाचले. सध्या जगात संस्कृती या शब्दावरून बरीच चर्चा चालू आहे. त्यातीलच एक चर्चा आहे सांस्कृतिक सापेक्षतावादाची. (cultural relativism) म्हणजे असे की, "ज्ञान, सत्य आणि नीती या सर्व गोष्टी संस्कृतीसापेक्ष असतात, अथवा विशिष्ट समाज किंवा त्याचा ऐतिहासिक संदर्भ यांच्याशी संबंधित असतात, त्या निखळ नसतात, असे मानणे होय." 'संस्कृती व अनेकतत्त्ववाद' (culture and pluralism) या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या एका चर्चासत्रात, अमेरिकेतील पर्ड्यू विद्यापीठातील मानववंशशास्त्र विभागाच्या प्रमुख, डॉ. सुसान सटन यांनी, 'सांस्कृतिक सापेक्षतावाद' या विषयावर अभ्यासपूर्ण भाषण केले. त्यांनी मांडलेल्या आणि तत्संबंधी उपलब्ध झालेल्या इतर लेखांमधील मुद्यांचे हे संकलन. संस्कृती-संबंधीचा हा विषय समजण्यासाठी, संस्कृती आणि सांस्कृतिक हे शब्द इंग्रजीमधील culture या अर्थाने प्रस्तुत लेखात वापरले गेले आहेत.

**'कल्चर'शब्दाचा उगम**

खरे तर फार पूर्वीपासून म्हणजे शतकानुशतके चालत आलेल्या परंपरा, आचार-विचार याला आपण 'कल्चर' म्हणत असलो तरी, इंग्रजीतील 'कल्चर' या शब्दाचा इतिहास मात्र अलीकडचा म्हणजे गेल्या शंभर वर्षापूर्वीचाच आहे. त्यापूर्वी शेतीसाठी जमीन तयार करणे, मशागत करणे, म्हणजे 'कल्चर' करणे, असा शेतीसंबंधी हा शब्द वापरला जात होता. मग सोळाव्या शतकात व त्यानंतरच्या काळात बुद्धी वाढविणे, मन प्रगल्भ करणे, विविध कलांची अभिरूचीपूर्ण जोपासना करणे या अर्थाने तो वापरण्यात येऊ लागला. एकोणिसाव्या शतकात तो अधिक व्यापक अर्थाने, विशिष्ट समाजाची सर्वकष प्रगती, या अर्थाने वापरण्यात येऊ लागला. त्यामुळे त्यात समाजाची राहण्याची, आचार-विचारांची पद्धत, मानसिक, सांस्कृतिक जडण-घडण असे अनेक पैलू समाविष्ट झाले.

इंग्लंडमधील एडवर्ड टेलर या संस्कृतीतज्ज्ञाने एकोणिसाव्या शतकात, आजच्या व्यापक अर्थाने व सांस्कृतिक अंगाने वापरला जाणारा 'कल्चर' हा शब्द इंग्रजी भाषेत रूढ केला. त्याने 'कल्चर' या शब्दाची व्याख्या फार व्यापक

केली. त्यामुळे आचार-विचार, परंपरा-चालीरीती, साहित्य-कला, श्रद्धा-अंधश्रद्धा, तत्त्वज्ञान-विज्ञान हे सर्व विषय, तसेच या सर्वांच्या अनुषंगाने धर्म हाही प्रत्येक संस्कृतीचा एक भाग म्हणून ओळखला जाऊ लागला.

टेलर यांची 'कल्चर' विषयक व्याख्या ही त्या काळी क्रांतीकारक ठरली. कारण, तेव्हा वंश, गरिबी यांचा विचार करता, एकाच सांस्कृतिक समाजातील ज्या लोकांना या परिघाबाहेर ठेवण्यात आले होते, त्यांना त्या संस्कृतीचा एक घटक मानले जाऊ लागले. म्हणजेच माणसा-माणसांमधील भेद हे जीवशास्त्रीयदृष्ट्या किंवा जन्मतःच नसून ते त्यांनतरच्या आचार-विचार, रीतीरिवाजांवर अवलंबून आहेत हे सहज सिद्ध झाले. जीवशास्त्रीयदृष्ट्या मानवाला मेंदू, डोळ्यांचा व शरीराचा रंग, ठेवण अशा काही गोष्टी मिळत असल्या तरी माणसाचे विचार आणि वर्तन, आवडी-निवडी अशा अनेक बाबी त्याला त्याच्या 'कल्चर'मधून मिळत असतात. जगभरातील विविध समाजघटकांची वागणूक, यशापयश यांच्याशी 'कल्चर'चा संबंध येतो तो असा.

## सांस्कृतिक सापेक्षतावाद

यानंतर विसाव्या शतकात यासंबंधीचा अभ्यास आणखी पुढे गेला. काही मूलभूत बाबींचा विचार करता, प्रत्येकच समाजाची संस्कृती महत्त्वाची आहे, असे जाणवू लागले. प्रत्येक संस्कृतीच्या आचार-विचारांमागे 'आपली' अशी काही तर्कसंगतता असते. त्यामुळे विविध समाजांचा अभ्यास हा त्या संस्कृतीच्या परिघात करणे, हे जास्त योग्य ठरते. म्हणून सांस्कृतिक सापेक्षतावादाची संकल्पना पुढे आली. समाजशास्त्रीय अभ्यासाच्या दृष्टिकोणातून, विसाव्या शतकातील ही घटना फार महत्त्वपूर्ण समजली गेली आहे. योगायोगाने आईन्स्टीनचा पदार्थविज्ञानातील सापेक्षतावादाचा सिद्धांत आणि मानसशास्त्रातील मीमांसा किंवा चिकित्सा करणारा सिद्धांत, यांच्या समकालीन ही संकल्पना उदयास आली. पदार्थविज्ञानात सापेक्षता महत्त्वाची असते, त्याप्रमाणेच माणसाची कोणतीही वागणूक ही संस्कृतीसापेक्ष अशीच असते, असे मत हळूहळू सर्वमान्य होऊ लागले. म्हणूनच एका समाजातील अतिशय निरर्थक वाटणाऱ्या गोष्टींमध्ये कोणता व किती अर्थ आहे, हे त्या संस्कृतीचा चष्मा लावल्याशिवाय कळू शकत नाही. उदाहरणार्थ, कृषिप्रधान असलेल्या भारतीय संस्कृतीतील व हिंदू धर्मातील गोमांस न खाणे आणि गाई-बैलांची पूजा करणे, या गोष्टी पाश्चात्यांना हिंदू चष्मा लावल्याशिवाय, महत्त्वपूर्ण वाटू शकणार नाहीत. (भारतात, अमेरिकेतील मॅकडोनाल्ड कंपनीला

अन्नपदार्थांमध्ये गोमांस वापरल्याबद्दल जाहीर माफी मागावी लागल्याची घटना ताजीच आहे !) तसेच पाश्चात्यांची एखादी गोष्ट, त्यांचा चष्मा लावल्याशिवाय भारतीयांना समजू शकणार नाही.

सापेक्षतावाद किती महत्त्वपूर्ण आहे ते दर्शविणारी, आणखी एक घडलेली गोष्ट अशी - "पूर्व युरोपमधील एका देशातील एका कुटुंबात, एका चिनी पाहुण्याला जेवायला बोलावले होते. या भागांत पाहुण्याने ताटांत थोडे अन्न टाकायचे असते, म्हणजे यजमान कुटुंबाने भरपूर अन्न शिजवून तुमचा योग्य पाहुणचार केला, असा त्याचा अर्थ होतो. जर पाहुण्याने अन्न संपविले तर त्याचे पोट भरले नाही, असे गृहीत धरून त्याला आणखी वाढण्यात येते. याउलट चीनमध्ये अन्न ताटात टाकणे म्हणजे, यजमानाचा अपमान करण्यासारखे समजले जाते. त्यामुळे या चिनी पाहुण्याने एकदा वाढलेले सर्व अन्न संपविले. त्याचे ताट रिकामे पाहून युरोपीय कुटुंबाने त्याला आणखी वाढले. असे करत त्या गृहिणीचे शिजविलेले अन्न संपले. मग तिने आणखी अन्न शिजवून वाढले, आणि इकडे या चिनी पाहुण्याला अति खाऊन-खाऊन घेरी आली." म्हणजे दैनंदिन जीवनातील इतकी साधी गोष्टही संस्कृतीसापेक्ष कशी असते ते लक्षात येते.

सांस्कृतिक सापेक्षतावाद हा नैसर्गिक असून समाजाचे व माणसांचे वर्तन समजून घेण्यासाठी तो फार उपयुक्त आहे. जगातील अनेक घटनांचा विचार, आपण आपल्याच सांस्कृतिक दृष्टिकोणातून करीत असतो; आणि हे इतके सहजपणे घडते की त्यातील संस्कृतीसापेक्षतेची चूक आपल्या लक्षातही येत नाही. सापेक्षतावादाचे व्यवहारातील महत्त्व कितीतरी गोष्टींवरून स्पष्ट होते. उदाहरणार्थ,

- कोणतीही व्यक्ती आपल्या सान्निध्यात आली की त्या व्यक्तीला समजून घेताना, आपल्याला सामोरे जावे लागणाऱ्या अनेक प्रश्नांची उकल, या सापेक्षतावादाच्या मदतीने करणे सोपे जाते.
- मानवामानवांमधील भेद अनेकदा काळजीचे ठरतात; त्यातील काळजीचा भाग दूर होऊन त्यांतील विविधता आणि इतर अनेक पैलू हे, औत्सुक्याचे व जिज्ञासायुक्त अभ्यासाचे ठरतात. अशा अभ्यासांमधून अनेक प्रश्नांवर उत्तरे सापडतात आणि नवनवीन कल्पना उदयास येतात.
- इतरांना समजून घेताना आपण, स्वतःकडेदेखील वेगळ्या दृष्टिकोणातून बघतो, त्यातून आपल्याला आणखी प्रगतीचा वा बदलाचा मार्ग गवसू शकतो.
- संस्कृती-संस्कृतीमधील भेद वा साधर्म्य लक्षात येऊन, त्यातील ही संस्कृती

उच्च, ही नीच अशी क्रमवारी टाळणे शक्य होते.

● संस्कृतीतील भेदाभेद व उतरंड टळल्याने दुसऱ्या संस्कृतींप्रती सहिष्णुता व आदर वाढीस लागतो.

अर्थात, एका संस्कृतीमधील काही आचार-विचार, चालीरीती इत्यादी बाबी दुसऱ्या संस्कृतीने मान्य कराव्यात किंवा नाही आणि त्यांच्यात समन्वय कितपत राहील, हे नक्की सांगता येणार नाही. हे व्यक्तीसापेक्ष व समाजसापेक्ष राहील. यासंबंधी काही वादग्रस्त मते वा अनुभव असले तरी संस्कृतीसापेक्षता ही महत्त्वाची आहे, एवढे मात्र म्हणता येते.

## आजच्या बहुविध संस्कृती आणि संस्कृतीसापेक्षता

गेल्या पन्नास वर्षांपासून संस्कृती आणि संस्कृतीसापेक्षता यांना जास्त महत्त्व देण्यात येत आहे कारण, माणसाची वागणूक ही बऱ्याच प्रमाणात संस्कृतीवर आधारित असते, असे लक्षात आले आहे. पूर्वी अभ्यासकांचे असे म्हणणे होते की, संस्कृतीला भौगोलिक, भाषिक, धार्मिक बंधने होती. त्यामुळे संस्कृतीचा विचारही त्याच वर्तुळात केला जात होता. तेव्हा संस्कृतीही एका अर्थाने विशिष्ट आचार-विचारांच्या संचात अडकलेली होती. पण गेल्या काही वर्षांपासून असे लक्षात आले आहे की, अनेक देशांमध्ये अनेक संस्कृतींचे लोक विविध कारणांनी एकत्र येत आहेत. या लोकांच्या आचार-विचारात विविध संस्कृतींची सरमिसळ होत आहे. बरेचदा असेही आढळते की, आपल्या मूळ संस्कृतीला धक्का पोचणार नाही अशा बेताने, दुसरी संस्कृती स्वीकारणे हे लोकांना सहजपणे जमलेले आहे. त्यामुळे संस्कृतींची भौगोलिक, भाषिक, धार्मिक बंधने सैल होत आहेत.

विविध देशांमधील वेगवेगळ्या संस्कृतीच्या लोकसमूहांना, आजच्या रूढ भाषेत एका विशिष्ट मानववंशाचे (ethnic) असे म्हटले जाते. एका अंदाजानुसार जगातील सुमारे दोनशे देशांपैकी फक्त एक चतुर्थांश देशांमध्ये सांस्कृतिक एकसंघता आहे. म्हणजे तेथे एकाच सांस्कृतिक, धार्मिक गटाचे लोक राहत आहेत. तीन चतुर्थांश देशांमध्ये एकापेक्षा जास्त संस्कृतींचे, वंशांचे लोक राहत असून त्यापैकी ४० टक्के देशांमध्ये पाचपेक्षा जास्त संस्कृतींचे लोक वास्तव्यास आहेत. त्यामुळे काही देशांमध्ये सांस्कृतिक समन्वयाचे वातावरण तयार होत आहे तर काही देशांमध्ये सांस्कृतिक संघर्ष उद्‌भवत आहेत. संस्कृतींची सरमिसळ होताना अनेकदा असे घडते की, संस्कृतीशी संबंधित असलेली एखादी विशिष्ट बाब ही सरधोपटपणे त्या संस्कृतीशी व पर्यायाने त्या

लोकांशी जोडली जाते. अशावेळी व्यक्ती वा समुहाप्रमाणे त्यात काही फरक किंवा अपवाद असू शकतात, हे साधारणत: लक्षात घेतले जात नाही. असा सरधोपटपणा ही सार्वत्रिक घटना असून ती, अमेरिका, र्‌वांडा, श्रीलंका आणि इतरही देशांमध्ये आढळते.

भिन्नभिन्न सांस्कृतिक गट सुखाने एकत्र राहत असतात तोपर्यंत, सर्व काही सुरळीत असते. त्यातही बहुतांशवेळा स्थानिक गट प्रभावी असतो, तसेच जोपर्यंत या स्थानिक गटाचे वर्चस्व कायम असते तोपर्यंत, हा प्रभावी गट दुसऱ्या गटांची फारशी दखल घेत नाही. पण या वर्चस्वाला धक्का देण्याचा प्रयत्न जर इतर गटांकडून झाला तर मात्र संघर्षाची स्थिती निर्माण होते; आणि आतापर्यंत निरुपयोगी वाटणारा गट एकदम 'उपद्रवी' या गटात जाऊन बसतो. त्यामुळे संस्कृतींचा विचार करताना असा हा सरधोपटपणा उपयोगी ठरत नाही. उलट सांस्कृतिक सापेक्षतेच्या वातावरणाला तो अडथळा निर्माण करतो.

जागतिकीकरणाच्या या युगात अशा भिन्नभिन्न संस्कृतींना एकत्र राहायचे असेल तर सांस्कृतिक सापेक्षतावादाचा आपल्याला दैनंदिन व्यवहारात उपयोग करावा लागणार आहे. उदाहरणार्थ,

●प्रत्येक संस्कृती म्हणजे एक वेगळे व्यक्तिमत्व आहे, हे सर्वप्रथम ध्यानात घ्यावे लागणार आहे. एकाच संस्कृतीत व्यक्तीव्यक्तींच्या आवडी-निवडींप्रमाणे, आणखी वेगळे छोटे गट वा समूह तयार होत असतात आणि तेही संस्कृतीवर परिणाम करीत असतात, हे समजून घ्यावे लागणार आहे. ●ज्या सांस्कृतिक गटाबद्दल आपल्याला जाणून घ्यायचे आहे, त्याची आर्थिक, राजकीय स्थिती, त्या गटाचे इतर गटांबरोबर असलेले संबंध यांची माहिती आपण करून घ्यायला हवी. थोडक्यात, त्या गटाची वागणूक समजून घेण्यासाठी त्याच्या सभोवतालच्या परिस्थितीचे आकलन आपण करून घ्यायला हवे. ●माणसाच्या, गटाच्या, समाजाच्या वागणुकीवर, त्यांच्या स्वत:च्या संस्कृतीचा फार प्रभाव पडत असल्याने, सांस्कृतिक सापेक्षतेचा विचार केला तर आपल्याला वैयक्तिक, एका समाजाची व सर्व समाजांची एकत्रित अशी प्रगती साधता येणे सोपे जाईल. आता प्रश्न असा उद्‌भवतो की, जेव्हा दोन भिन्न समूहांमध्ये एखाद्या विषयावर एकमत होऊ शकत नाही, तेव्हा कोणत्या समाजाची संस्कृती वा विचार ग्राह्य मानायचे ?

अशावेळी मात्र माणसाच्या बौद्धिकतेला खरे आव्हान असते. अशा प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी काय काय करता येणे शक्य आहे ?

● दोन्ही गटांनी दुसऱ्याच्या भूमिकेत शिरून, त्यांच्या सांस्कृतिक वातावरणाचा विचार करून स्वत:मध्ये थोडा जरी बदल करण्याचा प्रयत्न केला, तर तोडग्याच्या दिशेने पहिले पाऊल पुढे पडले असे म्हणता येते.

● समन्वय साधण्यासाठी असा विचार करणाऱ्या लोकांना चर्चेसाठी एकत्र आणता येते.

● मानवतेच्या भूमिकेतून वागण्याबाबत संबंधित गटांना समजाविण्याचा प्रयत्न केला जाऊ शकतो.

● दुसऱ्या संस्कृतीतील स्वीकारता येणारे विचार मान्य करून आपापली संस्कृती व्यापक करता येते आणि वादग्रस्त मुद्यांबाबत समंजसपणे तोडगा काढण्यासाठी एका हाताने द्यायचे व दुसऱ्या हाताने घ्यायचे, अशी देवाणघेवाण करण्याचा विचार करता येऊ शकतो.

अलीकडे, संस्कृतीसापेक्षतेचा विचार हा व्यावहारिक पातळीवर आणण्याचा प्रयत्न होतो आहे, हे खरे महत्त्वाचे आहे. यातून सर्व प्रश्नांची उकल होईलच असे नाही, तरी माणसांच्या, समाजाच्या वागणुकीत थोडा तरी बदल नक्कीच होईल असे मानू या.

## *'संस्कृती'बद्दल आणखी काही.....*

● **जॉन स्टुअर्ट मील** - ज्या मनाची विविध कवाडे उघडण्यायोग्य अशी मशागत झाली आहे आणि ज्यातून ज्ञानाचे तुषार उडताहेत, असे मन म्हणजे सुसंस्कृत मन होय.

● **मॅथ्यू अरनॉल्ड** - संस्कृती, यंत्रांच्या पलीकडे डोकावते, संस्कृती तिरस्काराचाच तिरस्कार करते, संस्कृतीला एकच तीव्र भावना असते ती म्हणजे गोडवा नि प्रकाश (?) यांची.

● **सॅम्युअल बटलर** - माणसाने निदान इतके तरी सुसंस्कृत झाले पाहिजे की त्याला संस्कृतीकडे संशयाने पाहता आले पाहिजे.

● **राल्फ वाल्डो एमर्सन** - संस्कृती आमच्या बाबतीत डोकेदुखीच ठरते.

● **महात्मा गांधी** - वेगळे होऊन जगायचा विचार करणारी कोणतीही संस्कृती टिकणार नाही.

# जपानमधील संस्कृती व आर्थिक वागणूक

औद्योगिकतेत व सर्वंकष प्रगतीत अमेरिका व युरोपच्या खालोखाल अव्वल क्रमांक मिळविणारा, पूर्वेकडे असूनही पाश्चिमात्यीकरण व आधुनिकीकरण चटकन स्वीकारलेला हा देश, आजही आपली सांस्कृतिक परंपरा व धर्म मात्र तितक्याच अभिमानाने टिकवून आहे. यामुळे जपानी माणूस हा धार्मिक व परंपरावादी आहे का, या प्रश्नाने पाश्चिमात्यांना नेहमीच संभ्रमात टाकले आहे. १८६८मध्ये मेईजी राजवटीच्या काळात जपानने आपल्या देशात प्रथमच परकीयांना प्रवेश करू दिला. तोपर्यंत जपानचा इतर जगाशी फारसा संबंध आलेलाच नव्हता. जपानमध्ये राजेशाही असली तरी या मेईजी राजवटीने जगातील बदल आपल्या जनतेपर्यंत पोचविले. हे करतानाच जपानची सामाजिक व्यवस्था व अर्थव्यवस्था आणखी चांगली कशी करता येईल, याचाही त्यांनी विचार केला व तसे स्वातंत्र्य नागरिकांना दिले. समाजाची पुनर्रचना करताना जपानने अनेकदा पाश्चिमात्यांची तंतोतंत नक्कल केली आणि आपला देश त्यांच्या तुलनेत कुठे कमी पडणार नाही याची काळजी घेतली. त्यामुळे जपानमध्ये आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमात्यीकरण असे बरेचदा घडले. (यानंतर इतर देशांमध्ये झालेल्या सुधारणेच्या काळातही आधुनिकीकरण म्हणजे पाश्चिमात्यीकरण हा गोंधळ कायम राहिला.) अर्थात, जपानने पाश्चिमात्यीकरण स्वीकारले तरी पाश्चिमात्यांचा ख्रिश्चन धर्म व त्यांची व्यक्तीवादी मूल्ये मात्र स्वीकारली नाहीत. त्यामुळेच जपानच्या सांस्कृतिक व धार्मिक मूल्यांबाबत परदेशात कुतूहल वाटते.

## आचार-विचार, संस्कृती व धर्म

जपानमध्ये फार पूर्वी शिंतो धर्म होता, पण चीनमध्ये जसा बौद्ध धर्म पसरला तसाच तो जपानमध्येदेखील पसरला. जपानमधील बौद्ध धर्माने शिंतो धर्मातील काही प्रथा मान्य करून आपला जम बसविला. याशिवाय हॉंगकॉंग, सिंगापूर व तैवान यांप्रमाणे जपानमध्येही कन्फ्यूशियानिझमचा देखील प्रभाव पडला आहे. अशा तीन धर्मांच्या प्रथा येथील नागरिक साधारणपणे पाळतात.

जपानच्या सांस्कृतिक परंपरेत (शिंतो धर्मात) नव्या वर्षाची सुरूवात सूर्योदय पाहून करतात. कारण, सूर्याच्या आशीर्वादाने आपल्या वर्षभरातील दैनंदिन घडामोडी चांगल्या रीतीने पार पडतील असा त्यांचा साधाभोळा समज

आहे. (सूर्य हा पृथ्वीवरील चराचर सृष्टीला नवसंजीवनी देतो, अशी शास्त्रीय भूमिका त्यामागे असेलही. पण त्याहीपेक्षा फार पूर्वीच्या काळापासून चालत आलेली ही प्रथा आहे, म्हणून बहुतांश नागरिक उगवत्या सूर्याचे दर्शन घेतात. भारतीय संस्कृतीने देखील सूर्योपासना स्वीकारली आहे !) जपानी नागरिक शिंतो व बौद्ध धर्माच्या मंदिरांना आवर्जून भेटी देतात; पण त्यामागे धार्मिकतेपेक्षा 'पर्यटक' या भूमिकेतून पुरातनकाळातील वास्तूंबद्दलची उत्सुकता जास्त असते. अशा वास्तूंमध्ये प्रवेश केल्यानंतर मात्र जपानी माणूस गंभीरपणे सर्वकाही टिपून घेत असतो. बाहेर आल्यावर परत तो हसत-खेळत पुढच्या प्रवासासाठी निघतो. तर दुसरीकडे अनेक संन्यासी अशा वास्तूंचे दर्शन घेत आपले आध्यात्मिक ज्ञान वाढविण्याचा प्रयत्न करताना आढळतात. या भिक्खूंना समाजात आदराचे स्थान असते. मात्र अशा भिक्खूंनी पांढरेशुभ्र कपडे परिधान करावयाचे असतात आणि पुरातन मंदिरातील भिक्खूंकडून काही प्रशिक्षण त्यांना घ्यायचे असल्यास, अनेक प्रकारचा संयम व पावित्र्य यांचा त्यांना गंभीरपणे स्वीकार करावा लागतो.

जगातील प्रत्येक नैसर्गिक गोष्टींमध्ये काहीतरी नैसर्गिक शक्ती असते या तत्त्वाचा पुरस्कार तेथे केला जातो. या भूमिकेमुळे जपानमधे अनेक वस्तूंचे वेगळे स्थान निर्माण होते. उदाहरणार्थ, ज्ञान देणारे पुस्तक वा ग्रंथ ही केवळ कागदी पाने नसतात, तर त्यामागे ज्ञान देणाऱ्या त्या लेखकाचे चांगले तत्त्व म्हणजे एका अर्थाने विचार त्यात उतरले असतात, म्हणून ते ग्रंथ पूजनीय ठरतात. (भारतीय संस्कृतीत ज्ञान देणाऱ्या सरस्वतीची व ग्रंथांची पूजा दसऱ्याच्या दिवशी, तसेच बुद्धीदात्या गणपतीचीही उपासना केली जाते !)

याच भूमिकेतून, शब्दांमध्येही असे नैसर्गिक तत्त्व आहे असे मानले जाते. म्हणून बोलताना जपानी माणूस फार विचार करून काळजीपूर्वक शब्द वापरतो.

जपानच्या मूल्यव्यवस्थेत सामाजिक एकतेला फार महत्त्व आहे. एकतेचे उद्दिष्ट गाठण्यासाठी, प्रामाणिकपणा, ज्येष्ठांप्रती आदर व श्रद्धा अशा मूल्यांची पूर्तता करणे गरजेचे मानले जाते. कौटुंबिक पातळीवर ही मूल्ये रुजावीत यासाठी पूर्वजांची प्रार्थना केली जाते. औद्योगिक पातळीवर देखील जपानने या मूल्यांचा चांगला उपयोग करून घेतला आहे. जपानमध्ये राजेशाहीला महत्त्व होते. राजघराण्याला सूर्याचा आशीर्वाद लाभला आहे, अशी समजूत तेथे आहे. मात्र अशा कुटुंबात समावेश होण्यासाठी, त्या व्यक्तीने जे काही कार्य स्वीकारले आहे, त्यात उच्च दर्जाचे प्राविण्य मिळविले पाहिजे, अशी पूर्वअट

तेथे आहे. कोणी कोणता धर्म स्वीकारावा याबाबत जपानमध्ये पूर्णपणे व्यक्तीस्वातंत्र्य आहे. धर्म म्हणजे त्या व्यक्तीची श्रद्धा-समज आणि विचार-आचार असे तेथे समजले जाते. त्यामुळे ज्या व्यक्तीची मूल्यविषयक प्रगती (म्हणजे दैनंदिन वर्तन) ज्या धर्मातून होणार असेल, तो धर्म त्या व्यक्तीने स्वीकारायचा, अशी ही खाजगी बाब आहे. व्यक्तीची प्रगती होण्यासाठी धर्म ही वैचारिक प्रक्रिया आहे, असे तेथे मानले जाते. त्यामुळे धर्म (आचार या अर्थाने) हा लवचिक असला पाहिजे, सभोवतालच्या बदलत्या वातावरणात व्यक्तीला मदत करणारा तो असायला हवा, अशी मते तेथे समाजमान्य आहेत. अर्थात, बदलत्या व्यवस्थेतही तेथे मूल्यांवर भर हा आहेच.

## संस्कृतीचा आर्थिक प्रगतीवरील परिणाम

दुसऱ्या महायुद्धात उद्ध्वस्त झालेल्या जपानने केलेली आर्थिक प्रगती ही स्तिमित करणारी आहे. तसेच जपानला नैसर्गिक आपत्तींनाही सतत सामोरे जावे लागले आहे. या पार्श्वभूमीवर जपानच्या प्रगतीमागे सांस्कृतिक कारणे आहेत का, याचा अभ्यास करण्यात आला. तेव्हा असे आढळले की, दैनंदिन व्यवहार, आर्थिक उद्दिष्ट आणि धार्मिक, सांस्कृतिक कर्तव्ये वा बंधने यांची सांगड जपानमध्ये फार चांगल्या रीतीने घातली गेली आहे. हे सर्व व्यवहार परस्परांमध्ये अतिशय चांगले गुंफले गेले असल्याने, त्यांना वेगळे करणे शक्यच होत नाही.

धार्मिक बंधने आणि आर्थिक उद्दिष्टे यांमध्ये वैचारिक संघर्ष होण्याची वेळच येत नाही कारण, आर्थिक व्यवहार करून नफा मिळविणे हे गैर मानले जात नाही. म्हणजे असे की, नफा मिळविण्यासाठी व्यापार करणे आवश्यक आहे, व्यापार करताना स्वतःबरोबर समाजाचा फायदा हा होतच राहणार, हेही गृहीत धरले गेले आहे. या अर्थाने व्यापार हा समाजाची देव-घेव वाढविण्याचा, प्रगतीचा मार्ग आहे. मग तो असांस्कृतिक किंवा अधार्मिक ठरत नाही. उलटपक्षी ते एक सत्कार्य ठरते.

स्वतःची व स्वतःच्या समाजाची प्रगती करणे हे शिंतो धर्मातील एक मूल्य आहे. त्यामुळे जपानी माणूस आपला उद्योग एखादे धार्मिक कृत्य समजून तितक्याच निष्ठेने, श्रद्धेने आणि मेहनतीने करतो. तसेच त्याच्या या कार्यात त्याच्या उद्योगातील कर्मचारी देखील, वरील भूमिकेतूनच सहभागी होतात. उद्योगांमध्ये औपचारिकपणा लोप पावून, एक प्रकारची कौटुंबिक व सामाजिक भावना वाढीस लागते. व्यापार हा समाजाचे भले करण्यासाठी असल्याने

उत्पादनांच्या दर्जालाही तेथे महत्त्व प्राप्त होते आणि औद्योगिक वातावरण चांगले राहून, कर्मचारी उत्कृष्ट काम करून उत्पादनांचा दर्जा चांगला राखण्यास मदत करतात. असा, योग्य रीतीने यशस्वी झालेला उद्योजक हा तेथे आदरणीय ठरतो. एकदा असे नेतृत्व मान्य झाले की त्याच्या मतालाही फार वजन प्राप्त होते.

आर्थिक व्यवहार, दैनंदिन व्यवहार हेच एक प्रकारचे धार्मिक कार्य समजले जात असल्याने, रूढ अर्थाने व्यापार व धर्म यांच्यात जो फरक करण्यात येतो, तो येथे करता येत नाही. त्यामुळे धर्मनिरपेक्ष व्यापार वा व्यवहार असा काही भेदभाव या समाजात करताच येत नाही.

देशाचे, समाजाचे कोणतेही कार्य, वर उल्लेखित अर्थाने, सर्वकल्याणकारी धार्मिक कार्यच मानले जाते. यात शिक्षण देणे-घेणे, नोकरी करणे, उद्योग करणे, फार काय राजकारण करणे हे देखील वाईट मानता येत नाही. एकूणच समाजधारणेसाठी आवश्यक असणारी मूल्यव्यवस्था जपणे व ती आचारात आणणे हाच जपानी नागरिकांचा धर्म आहे.

आता आधुनिकीकरण व पाश्चिमात्यीकरण स्वीकारताना देखील आपला समाज स्पर्धेत टिकला पाहिजे, ही स्पष्ट भूमिका जपानमधील सरकारची व नागरिकांची होती. त्यामुळे पाश्चिमात्यांशी स्पर्धा करणे आणि त्यासाठी आपल्या व्यवहारात बदल करणे, हे त्यांना अडचणीचे वाटले नाही. स्पर्धेत टिकण्यासाठी करावी लागणारी हरप्रकारची मेहनत हे त्यांच्यासाठी एक धार्मिक कार्य ठरले. एकोणिसाव्या शतकात औद्योगीकरण करताना जपानमध्ये फार अडचणी आल्या नाहीत, त्यामागे जपानची अशी सांस्कृतिक परंपरा आहे.

पाश्चात्यांची नक्कल करताना जपानने आपल्या कौटुंबिक व्यवस्थेला, त्यातून उमलणाऱ्या मूल्यांना तडा जाऊ दिला नाही. उलट, जपानी नागरिकांना पुढे जायचे असेल तर त्यांना आपलीच स्वदेशी मूल्ये उपयोगी ठरतील, असे वातावरण तेथे निर्माण झाले. पाश्चिमात्यांचा व्यक्तीवाद, व्यक्तीस्वातंत्र्य या संकल्पना देखील जपानने एका मर्यादेतच स्वीकारल्या आहेत. आपले कुटुंब, आपला समाज व आपला देश हे, जपानसाठी महत्त्वाचे आहे आणि त्यासाठी जपानने आपल्याच सांस्कृतिक परंपरेचा उपयोग चांगल्या रीतीने करण्याचा प्रयत्न केला आहे.

# चीनची संस्कृती

जगात महासत्ता होऊ शकण्याची क्षमता असणाऱ्या आणि तशी स्वप्ने पाहणाऱ्या 'चीनची संस्कृती' हा औत्सुक्याचा विषय खासच आहे. त्यातच साम्यवाद अंगी बाणवलेल्या चीनमध्ये 'संस्कृती'चे स्थान काय आहे हे जाणून घेण्याचा मोह अनेक परदेशी अभ्यासकांना झाला नसता तर नवलच ! या अभ्यासकांनी चीनविषयीचे अनेकविध प्रकारची माहिती देणारे फार विस्तृत व सखोल साहित्य इंटरनेटवर उपलब्ध करून ठेवले आहे. या माहितीच्या आधारे चीनच्या संस्कृतीची ही ओळख.

## धर्मसंस्कृती

चिनी समाज हा उद्योगी, चिवट आणि कष्टाळू म्हणून ओळखला जातो. या समाजाचा पाया आहे नीतीशास्त्राचा. कन्फ्यूशियस या शिक्षणतज्ज्ञ व तत्त्वज्ञानी व्यक्तीने सांगितलेले नीतीशास्त्र व मूल्ये यात बद्ध झालेला असा हा समाज. पण चिनी लोक त्याला धर्म म्हणत नाही. धर्माऐवजी ते 'स्कूल ऑफ कन्फ्यूशियस' किंवा 'कन्फ्यूशियसची तत्त्वे' असा शब्दप्रयोग करतात. मात्र गंमत अशी की, संपूर्ण जगात 'कन्फ्यूशियानिझम्' हा चीनचा रूढ अर्थाने 'धर्म' म्हणून ओळखला जातो. चिनी भाषेत, इंग्रजी भाषेतील religion या शब्दाला प्रतिशब्द वा समानार्थी शब्द नाही, हेही लक्षात घेण्यासारखे आहे. चीनच्या समाजाचे-संस्कृतीचे दुसरे महत्त्वाचे घटक आहेत 'ताओइझम्' व बौद्ध धर्म. भारतातील बौद्ध धर्म चीनमध्ये पसरला व तिथे तो कन्फ्यूशियसच्या तत्त्वांबरोबर इतका मिसळून गेला की, आता तो तेथील संस्कृतीचाच घटक झाला आहे. 'ताओइझम्'द्वारे मानवी आयुष्यात घडणाऱ्या गोष्टींची कारणमीमांसा शोधण्याचा प्रयत्न करण्यात येतो. 'ताओ' या शब्दाचा अर्थ आहे 'मार्ग'. 'ताओ' म्हणजे 'मोक्षाकडे किंवा निर्वाणाकडे जाण्याचा मार्ग' असेही म्हटले जाते. 'ताओइझम्' प्रमाणे ताओ, पृथ्वी, मनुष्य व स्वर्ग असे विश्वाचे चार घटक कल्पिलेले आहेत. माणसाचा मूळ स्वभाव चांगला असून मनुष्य स्वतः सुखी राहू शकतो व जगालाही सुखी ठेवू शकतो, अशी या तत्त्वाची धारणा आहे.

तत्त्वज्ञानाच्या अशा विचारांवर आधारित असलेल्या चिनी समाज-संस्कृतीचा शतकानुशतकांचा प्रवास हा, बहुतांशी राजकीय अंगाने झालेला आढळतो. त्यात कधी धर्म हा नागरिकांचा व्यक्तिगत हक्क म्हणून स्वीकारला गेला तर कधी तो नाकारलाही गेलेला दिसतो. पण याबरोबर एक मात्र खरे व

वाखाणण्यासारखे आहे की, चीनच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीत, तेथील सरकारने कोणताही धर्म कधीच आड येऊ दिला नाही आणि अशा कठोरप्रसंगी धार्मिकता जपणाऱ्या नागरिकांनीही सरकारची अडवणूक केली नाही, असे म्हणतात.

चीनमध्ये कन्फ्यूशियसची काही प्रार्थनास्थळे आहेत म्हणून काही लोक त्याच्या तत्त्वांना धर्म मानतात. अशा जुन्या प्रार्थनास्थळांना धार्मिकतेपेक्षाही पर्यटन व उत्खनन-संशोधन या अंगाने आज जास्त महत्त्व आहे. तसेच पुजाऱ्यांपेक्षा असे संशोधकच अशा वास्तूची देखभाल चांगली करतात. या प्रार्थनास्थळांमध्ये अनेकदा काही धार्मिक कार्यक्रम केले जातात. तेथील संबंधित अधिकारी त्यात सहभागी होत असले तरी ते स्वत: धार्मिक असलेच पाहिजेत असे बंधन तेथे नाही. कर्तव्य म्हणून ते कार्यक्रम चांगल्या रीतीने पार पाडण्याची जबाबदारी त्यांनी पूर्ण करायची असते.

## आचार-विचार व संस्कृती

कन्फ्यूशियसने नैतिकतेने वागण्यावर भर दिलेला आहे. मनुष्य व समाज यांमध्ये पाच प्रकारच्या संबंधांची चर्चा त्याने केली आहे. सार्वभौम सत्ता किंवा तत्त्वप्रणाली आणि सामान्य नागरिक, पालक व मुले, लहान भाऊ व मोठा भाऊ, पती व पत्नी आणि मित्र व मित्र हे पाच संबंध कसे असावेत म्हणजे समाजाचा गाडा योग्य मार्गावर धावेल, ते त्याने सांगितले आहे. या त्याच्या तत्त्वज्ञानात आणि समाजवादाच्या मूळ तत्त्वज्ञानात कमालीचे साम्य आहे. दोन्ही तत्त्वज्ञानात समाजाचे हित आणि कल्याण याला प्राधान्य दिलेले आहे. समाजकल्याणासाठी व त्याकरवी स्वकल्याणासाठी निरंतर शिक्षणावर व त्यानुसार स्वत:ला घडविण्यावर दोन्हीकडे भर देण्यात आला आहे. राजकीय तत्त्वप्रणाली आणि रूढ अर्थाने धार्मिक किंवा वागणुकीच्या अर्थाने नैतिक म्हणता येतील अशी मूल्ये, यांचा समन्वय सहजपणाने किंवा योगायोगाने उत्तम साधला गेल्याने भांडवलशाहीत व पाश्चिमात्य संस्कृतीत आढळणारा व्यक्तीवाद येथे आढळत नाही.

कन्फ्यूशियस हा मूळात शिक्षणतज्ज्ञ होता आणि त्याचे तेच स्थान आजही चिनी समाजाने कायम राखले आहे. धार्मिक गुरू असे त्याला कधीच संबोधले जात नाही. शिक्षणात कोणत्याही प्रकारची वर्गवारी नसावी. शिक्षणाचा व जन्माचा म्हणजे कौटुंबिक परिस्थितीचा काही संबंध नसून शिक्षण सर्वांनी घेतले पाहिजे व ते सर्वांपर्यंत पोचले पाहिजे अशी त्याची भूमिका होती. शिक्षण

घेऊन मेहनतीने व स्वकर्तृत्वाने पुढे जाण्याचा प्रयत्न सर्वांनी केला पाहिजे असे त्याने समाजाच्या मनावर बिंबविले. नागरिकांची व समाजाची वागणूक ही जबरदस्तीने नव्हे तर मूल्यांचे भान राखून आणि स्व-प्रेरित असायला हवी, असे त्याला वाटत होते. बौद्ध धर्मातही शिक्षणावर भर देण्यात आला असून सर्वांनी ज्ञान, शिक्षण मिळवावे असे म्हटले गेले आहे. बौद्ध धर्मातही कर्मकांडापेक्षा आचारांना महत्त्व आहे. त्यामुळे कन्फ्यूशियसच्या तत्त्वज्ञानात बौद्ध धर्माची आडकाठी न येता उलटपक्षी त्याची मदतच झाली.

कन्फ्यूशियसची व बौद्ध धर्माची तत्त्वे आणि 'ताओइझम्' या धार्मिक मूलतत्त्वांचे एकत्रीकरण करण्याचाही प्रयत्न चीनमध्ये झाला, पण तो समाजात तेवढा रुजला नाही. मात्र या समाजाच्या आचार-विचारांवर, वर उल्लेखित तीनही बाबींचा परिणाम झालेला दिसतो. आठव्या ते सोळाव्या शतकांच्या दरम्यान कन्फ्यूशियसच्या तत्त्वज्ञानाला चीनचा 'राष्ट्रधर्म'ही समजला गेला होता. पण कन्फ्यूशियसने देवदेवता, कर्मकांड यांच्याबद्दल काहीही म्हटलेले नाही. त्यामुळे त्याला रूढ अर्थाने धर्माचे स्वरूप प्राप्त झाले नाही. (अर्थात, धर्म शब्दाची व्याख्या कशी केली जाते त्यावरही हे अवलंबून आहे. म्हणजे धर्म हा केवळ देवदेवता व उपासनापद्धतीशी जोडला जात असेल तर, त्यात कन्फ्यूशियसची तत्त्वे बसत नाहीत. मात्र धर्म हा शब्द 'मानवी व्यवहार' अशा व्यापक अर्थाने वापरला जाणार असेल तर त्यात याचा समावेश करता येतो.)

## राजकारण व संस्कृती

चीनमध्ये समाजवाद व साम्यवाद स्वीकारला गेल्याने चीनमध्ये धर्म व संस्कृती हे विषय राजकारणात कधीच प्रभावी ठरले नाहीत. त्यामुळे चीन हा देश राजकीयदृष्ट्या निधर्मी आहे, असे म्हटले जाते. (मात्र चीनच्या आजच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक, औद्योगिक प्रगतीला चीनमधील तत्त्वज्ञानाची ही पार्श्वभूमी फार उपयोगी ठरली आहे, असेही म्हटले जाते) तरीदेखील रशियात बोल्शेव्हिक क्रांतीनंतर 'धर्म ही अफूची गोळी आहे' असे वातावरण तयार झाले, तसे चीनमध्ये झाले नाही.

चीनमधील राजकारणाचा व समाजकारणाचा अलीकडचा प्रवाह चार टप्प्यांत विभागला जातो. १९४९ते १९५६ हा साम्यवादाच्या विजयावर शिक्कामोर्तब करणारा क्रांतीनंतरचा काळ, १९५७ ते १९६५ हा राजकीय सत्तासंघर्षाचा काळ, १९६६ ते १९७६चा सांस्कृतिक क्रांतीचा काळ आणि १९७७ ते आजमितीपर्यंतचा आर्थिक विकासाचा व जागतिकीकरणाचा काळ. या

चारही टप्प्यांमध्ये साम्यवादी राजकीय नेत्यांनी समाजाच्या सांस्कृतिक व तत्त्वज्ञानविषयक घडामोडींची दखल कशी घेतली ? बहुतेक देशांमधील साम्यवादी नेते धार्मिक घडामोडींमध्ये फारसा रस घेत नाहीत, आणि अशीच भूमिका चीनमधील राज्यकर्त्यांनी सुरूवातीला घेतली असली तरी काही साम्यवाद्यांनी आपला लढा तीव्र करण्यासाठी आणि सर्वसामान्य जनतेपर्यंत पोचण्यासाठी वेगवेगळ्या धार्मिक गटांची मदत घेतली होती. सांस्कृतिक व धार्मिक घटनांना विरोध करण्याला चीनमधील नेत्यांनी कधीच फार प्राधान्य दिले नाही. चीनमधील घटनेच्या ४६व्या कलमात धार्मिक स्वातंत्र्याबाबत असे म्हणण्यात आले होते की, "चीनमधील नागरिकांना कोणत्याही धार्मिक बाबींवर विश्वास ठेवण्यास अथवा न ठेवण्यास आणि नास्तिकतेबाबत प्रचार करण्यास स्वातंत्र्य आहे." (१९५४)

पण आस्तिकतेबाबत प्रचार करण्याचे स्वातंत्र्य न देणारे वरील कलम अन्यायकारक आहे असे मत अनेक धार्मिक नेत्यांनी मांडल्यानंतर सरकारने (१९८२) या कलमात बदल केला. हे कलम आता असे आहे - "चीनमधील नागरिकांना धार्मिक स्वातंत्र्य आहे. सरकार, प्रशासन, सार्वजनिक संघटना किंवा कोणतीही व्यक्ती चीनमधील नागरिकांना एखाद्या बाबीवर विश्वास ठेवणे किंवा न ठेवणे, याबाबत जबरदस्ती करू शकत नाही. तसेच असा विश्वास ठेवणाऱ्या किंवा न ठेवणाऱ्या व्यक्तींबाबत, सरकार कोणताही भेदभाव करणार नाही. सर्वसामान्यपणे धार्मिक घटनांचे रक्षण सरकार करेल; पण सार्वजनिक सुव्यवस्था व शांतता याला बाधा आणणाऱ्या धार्मिक घडामोडी करण्याची परवानगी कोणालाही नाही. तसेच नागरिकांचे आरोग्य आणि चीनच्या सरकारने ठरविलेले शिक्षणविषयक धोरण, यात धार्मिक हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नाही. धार्मिक संस्था व संघटना आणि धर्मविषयक इतर बाबी यांमध्ये कोणत्याही प्रकारचा परकीय हस्तक्षेप, दबाव वा वर्चस्व मान्य करण्यात येणार नाही."

चीनमधील सरकारच्या या भूमिकेमुळे आजपर्यंत चीनमध्ये मोठे धार्मिक संघर्ष झाले नाहीत. येथील धर्म व संस्कृतीशी संबंधित असलेले क्वांझू हे शहर सर्वधर्मियांसाठी आदर्श ठरले होते. फार पूर्वीच्या काळात सर्व संस्कृतींच्या, धर्मांच्या लोकांनी येथे हजेरी लावलेली आहे. या शहरात हिंदू, ख्रिश्चन-प्रॉटेस्टंट व कॅथॉलिक, मुस्लिम, बौद्ध अशा सर्वधर्मीयांची प्रार्थनास्थळे

आहेत; ब्रुनेई येथील मुसलमान आपली मुळे क्वांझू येथीलच आहेत, असे मानतात. ब्रुनेईतील मुसलमान अनेक वर्षांपासून क्वांझूला भेट देत असतात, असे याच्या पुष्ट्यर्थ सांगण्यात येते. (मात्र १९८९मध्ये तियानमेन चौकात साम्यवादी राजवटीविरूद्ध विद्यार्थ्यांनी केलेल्या निदर्शनात, एक गट मुस्लिम युवकांचा होता आणि साम्यवादी सरकारमुळे आपल्या धर्मावर अन्याय होतो अशी भूमिका त्यांनी घेतली होती. मात्र तेव्हा ही बाब पुढे आली नव्हती.)

## औद्योगिकता व संस्कृती

१९७०च्या दशकात चीनमधील राज्यकर्त्यांच्या लक्षात आले की केवळ वर्गसंघर्षातून व साम्यवाद-समाजवादाच्या मागे लागून चीनची प्रगती होणार नाही. चीनला जागतिक घडामोडींपासून फार काळ दूर ठेवणे हे चीनच्याच हिताचे नाही. तेव्हा त्यांनी, चीनला जागतिक प्रवाहात आणण्यासाठी काही धोरणे (१९७८मध्ये) आखली. मग औद्योगिक उत्पादन वाढवून आतंरराष्ट्रीय व्यापार वाढविण्यावर भर देण्यात आला. १९८० ते १९९० या काळात चीनमध्ये अनेक वस्तूंचे उत्पादन वाढले. उदाहरणार्थ, क्रूड ऑईल - १०.६०कोटी टनांवरून १३.८०कोटी टन, वीजनिर्मिती - ३००६ कोटी किलोवॅट वरून ६१८० कोटी किलोवॅट, स्टील ३.७१२ कोटी टनांवरून ६.६०४कोटी टन आणि सिमेंट ८कोटी टनांवरून २१.३० कोटी टन. ग्राहकोपयोगी वस्तूंच्या विविध प्रकारात वाढ होऊन त्यांच्या पुरवठ्यात देखील वाढ झाली.

अशी उत्पादनक्षमता वाढण्यामागे काही सांस्कृतिक कारणे होती का, याचा शोध घेण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केला. त्यांना असे आढळले की, चीनमधील कन्फ्यूशियनच्या व बौद्ध धर्माच्या आचारतत्त्वांनी तेथील नागरिकांमधील चातुर्य, कल्पकता, हुषारी वाढविण्यास मदत केली आहे. जीवनव्यवहारास आवश्यक असणारे विविध गुणविशेष अंगी बाणवून, त्यांचा योग्य तो वापर करण्यावर, तसेच शिक्षण व वाचन यांद्वारे ज्ञान वाढविण्यावर या तत्त्वज्ञानाचा भर आहे. त्यामुळे उद्योजकतेशी संबंधित विविध गुणविशेष व पैलू बहुतेक नागरिकांच्या दैनंदिन व्यवहारात साधारणपणे असतात.

चीनमधील सरकारने वेळोवेळी कळत-नकळत या गुणांचा उपयोग करून घेतला आहे. सरकारने जेव्हा-जेव्हा शिक्षणावर भर दिला व शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण करण्याचा प्रयत्न केला, तेव्हा तेव्हा तेथील समाजाने सरकारला सर्वतोपरी सहाय्य केले, त्यामागे ही पार्श्वभूमी आहे. आजूबाजूच्या बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता अंगी बाणणे, विचारक्षमता व कार्यक्षमता

वाढविणे, ठरावीक पद्धतीने, ठरावीक कृती करण्याची सवय लावणे, जगात घडणाऱ्या विविध नव्या गोष्टी जाणून घेण्याची उत्सुकता वाढविणे, तसेच त्याला सामोरे जाण्यासाठी असलेली उदारता मनात निर्माण करणे अशा बारीकसारीक बाबींमधून नागरिकांचे 'नागरी मन' तयार करण्याचे कार्य या संस्कृतीने केले आहे.

## अन्नसंस्कृती

संस्कृतीचा आणखी एक मोठा घटक आहे अन्न. जगण्यासाठी अत्यावश्यक असलेल्या या घटकाचा, सभोवतालच्या वातावरणात कसा-कसा विचार केला जातो, ते फार महत्त्वाचे आहे. बहुतेक सर्वच देशांमधील अन्न हे माणसाला उष्मांक (कॅलरी), जीवनसत्त्वे (व्हिटामिन्स), प्रथिने (प्रोटीन्स) असे आरोग्यदृष्ट्या आवश्यक असलेले घटक पुरवीत असते. पण अन्न तयार करण्याची प्रक्रिया व त्याचे सेवन केव्हा व कसे केले जाते, या सर्व बाबी 'संस्कृती'त मोडतात. संस्कृतींप्रमाणे अन्न बदलते तसेच, एकाच संस्कृतीअंतर्गतही यात बदल होत असतात. चीनमधील अन्नसंस्कृतीतील विशेष म्हणजे निसर्गतः सहज उपलब्ध होणाऱ्या अन्नघटकांवर चिनी समाजाने दिलेला भर. यात गहू, तांदूळ, मका, सोयाबीन, शेंगदाणे, कोबी, मुळा, मशरूम, चिकन, मटण, बदक, डुकरांचे मांस व विविध प्रकारचे मासे इ. अनेक पदार्थांचा समावेश आहे.

चिनी लोक 'फान' (fan) आणि 'त्साई' (ts'ai) असा दोन भागांत या अन्नघटकांची विभागणी करतात. या दोन्ही भागांतील घटक मानवी शरीराला आवश्यक असून ते योग्य प्रमाणात खाल्ले गेले पाहिजेत, हे ते कटाक्षाने बघतात. साधारणपणे भाज्या व मांसाहारी पदार्थ एकत्र करण्याची त्यांची पद्धत आहे. याबरोबर गव्हापासून अथवा बाजरीपासून तयार केलेले पॅनकेक किंवा नूडल्स खाण्याची प्रथा आहे. तसेच या दोन भागांतील पदार्थ तयार करण्यासाठी वेगळी भांडी कटाक्षाने ठेवली असतात.

चीनच्या तत्त्वज्ञानात म्हणजे 'ताओइझम्' व 'कन्फ्यूशियानिझम्'च्या परंपरेत यिन व यांग या दोन संकल्पनांना महत्त्व आहे. परस्परांच्या विरूद्ध असलेल्या संकल्पनांचा समतोल निसर्गात राखला जातो, म्हणून जग सुरळित चालते अशी भूमिका यामागे आहे. शरीराचे कार्यही यिन व यांग या दोन तत्त्वांवर चालते. त्यामुळे दोन्ही गटांतील अन्नघटकांचे योग्य प्रमाण हे, यिन व यांग यांचा समतोल राखते, असा विचार त्यांच्या अन्नसंस्कृतीमागे आहे.

# सातत्यपूर्ण विकास व संस्कृती

आजच्या तंत्रज्ञान-विज्ञानाच्या संशोधनाच्या काळात 'पर्यावरणीय नीतीमूल्ये' हा एक महत्त्वाचा व पायाभूत विषय मानला जात आहे. कारण मानवाच्या तंत्रज्ञान-विज्ञानातील संशोधनाच्या कर्तृत्वामुळे, निसर्ग-मानव संबंधांबाबत, एक नवे आव्हान उभे राहिले आहे. हे आव्हान आहे जीवनसातत्य टिकविण्याचे. 'जीवनसातत्या'ची सुरेख व्याख्या लीस्टर ब्राऊन यांनी केली आहे. "जो समाज, आपल्या भावी पिढ्यांच्या गरजा भागविण्याच्या शक्यता कमी होऊ न देता, आपल्या गरजा भागवतो, तो जीवनसातत्य टिकविणारा समाज होय !" पर्यावरणीय नीतीमूल्यांमध्ये समाजाच्या कृतींचा, त्याच्या सभोवतालच्या परिसरविज्ञानावर व एकंदरीत निसर्गावर होणाऱ्या परिणामांचा विचार करण्यात येतो.

निसर्गाची प्रक्रिया ही चक्राकार आहे; म्हणजे निसर्गातील प्रत्येक सजीव आपल्या अन्नसेवनातून स्वतःला निरुपयोगी असा घन व द्रवरूप कचरा बाहेर टाकत असतो. हा कचरा, हे दुसऱ्याचे अन्न असते. त्यामुळे संपूर्ण निसर्ग कचराविहीन म्हणजे स्वच्छ राहण्यास मदत होते. निसर्गातील विविध घटक हे, अनेक प्रकारे इतर घटकांवरही अवलंबून असतात. तसेच विविध घटकांमध्ये भागीदारीही असते आणि निसर्गनियमांमध्ये टिकून राहण्यासाठी आवश्यक असणारी लवचिकताही असते. निसर्गाची चक्राकार रचना, परस्परावलंबित्व, भागीदारी, लवचिकता आणि विविधता ही सातत्यपूर्ण समाजाची आधारभूत तत्त्वें आहेत. या तत्त्वांवर आधारित व्यवहार करणे म्हणजे 'पर्यावरणीय नीतीमूल्ये' जपणे होय. ही नीतीमूल्ये बहुतेक संस्कृतींनी मानवापर्यंत पोचविली आहेत. तसेच काही संस्कृतींनी, ती इतर संस्कृतींमधून आत्मसात केली आहेत.

निसर्ग हा मानवाच्या विकासाच्या प्रक्रियेतील अडसर नाही. उलट निसर्ग अतिशय समृद्ध असल्याने तो अनेक प्रकारे विकासासाठी उपकारकच ठरतो, असा विचार अमेरिकेतील प्रसिद्ध तत्त्वज्ञ राल्फ वाल्डो एमर्सन (१८०३ते १८८२) आणि हेन्री डेव्हिड थोरो (१८१७ते१८६२) यांनी प्रथम मांडला. या दोघांच्या विचारांवर, हिंदू संस्कृतीतील तत्त्वज्ञानविषयक विचारांचा प्रभाव पडलेला होता. त्यांचे हे मत, विसाव्या शतकातील सातत्यपूर्ण विकासाच्या संकल्पनेच्या सुरूवातीस, म्हणजे १९६०च्या दशकात पुन्हा एकदा अमेरिकेतील

नागरिकांनी पुढे आणले. आजच्या सातत्यपूर्ण विकासाच्या संकल्पनेवर व चळवळीवर या दोघा तत्त्वज्ञांच्या विचारांचा व हिंदू संस्कृतीचा परिणाम झाला आहे तो असा. यानंतर नॉर्वेमधील तत्त्वज्ञ आर्ने नेस यालाही निसर्गाशी एकतानता मानणाऱ्या, तादात्म्य पावणाऱ्या अद्वैत तत्त्वज्ञानाने भारून टाकले होते. निसर्गाबरोबर एकतानता असणे, हाही विचार या चळवळीचा केंद्रबिंदू राहिला आहे.

याच काळात जपानमधील 'झेन बुद्धिझम्'नेही सातत्यपूर्ण विकासाच्या चळवळीवर आपला प्रभाव पाडला. डी. टी सुझुकी यांनी पूर्वेचा हा विचार पश्चिमेकडे पोचविला. अमेरिकेतील निसर्गकवी ॲलन वॅट याने सुझुकी याचे विचार अमेरिकेत लोकप्रिय केले. वॅट यांच्याकडून प्रेरणा घेऊन गॅरी सिडर या अमेरिकतील व्यक्तीने क्योतो (जपान) येथे जाऊन या तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. मग सातत्यपूर्ण विकासाचा विचार करणाऱ्या पाश्चिमात्य पर्यावरणवाद्यांनी 'ताओइझम्'चा (चीनची संस्कृती) अभ्यास केला. यातदेखील निसर्गासमवेत मानवाने चालणे अभिप्रेत आहे. किंबहुना तो मार्ग म्हणजेच 'ताओ' होय.

सातत्यपूर्ण विकासाची चर्चा व चळवळ जगभरात हळूहळू पुढे जात असताना 'आध्यात्मिकता व सातत्यपूर्णता' या विषयावर १९९७मध्ये इटलीत एक चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या एका संशोधनपर निबंधात हा विषय स्पष्ट करण्यात आला. त्यात असे म्हटले आहे, "माणूस हा निसर्गातील एक घटक आहे, हे समजून घेऊन निसर्गाचा सर्वंकष अभ्यास, निसर्गाचे चिन्तन व निसर्गाची जपणूक करणे, म्हणजे आध्यात्मिकता होय. आध्यात्मिकता म्हणजे देवपूजा नव्हे, उपासनापद्धती व धर्मातील कर्मकांड नव्हे तर निसर्गाचा आतील आवाज जाणणे, निसर्गाची भाषा समजणे, त्याची क्रिया-प्रतिक्रिया लक्षात घेणे होय."

सातत्यपूर्ण विकासासाठी, विविध संस्कृतींमधून केलेले निसर्गविषयक आणि वरील अर्थाने आध्यात्मिक असलेले चिन्तन, जगभरांतील सर्व समाजांनी आज जाणीवपूर्वक व्यवहारात उतरविण्याची गरज आहे.

*(संदर्भ - अमेरिकेतील विस्कॉन्सिन विद्यापीठातील तत्त्वज्ञान विषयाचे प्रोफेसर जे. बेअर्ड कॅलिकॉट आणि धर्म, संस्कृती व पर्यावरण या विषयातील अभ्यासक व अमेरिकेतील ह्युमेन सोसायटीच्या संचालक मंडळातील एक सदस्य डोनाल्ड कॅशे यांचे इंटरनेटवरील निबंध)*

# अकरा सप्टेंबरनंतर : नोम चॉम्स्की

*(नोम चॉम्स्की हे गेली कित्येक वर्षे, अमेरिकेतील मॅसॅच्युसेटस् इन्स्टिटट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (एम्. आय. टी.) येथे भाषाशास्त्राचे प्राध्यापक आहेत. त्याचबरोबर राजकीय क्षेत्रातील ते एक विचारवंत कार्यकर्ते आहेत. अमेरिकेचे परराष्ट्रीय धोरण, आंतरराष्ट्रीय घटना नि मानवी ह्क्क यासंदर्भात त्यांचे अनेक लेख व पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. त्यापैकी अलीकडची काही पुस्तके म्हणजे 'वर्ल्ड ऑर्डर्स : ओल्ड अँड न्यू' (१९९६), 'क्लास वॉरफेअर' (१९९६), 'पॉवर्स अँड प्रॉस्पेक्ट्स' (१९९७), 'द कॉमन गुड' (१९९७), 'द न्यू मिलिटरी ह्युमॅनिझम' (१९९९), ही आहेत.*

*अमेरिकेत ११ सप्टेंबर २००१ रोजी वर्ल्ड ट्रेड सेंटरवर झालेल्या हल्ल्यानंतर, जगभरच या विषयावर बरेच लेखन झाले. एक राजकीय विश्लेषक म्हणून नोम चॉम्स्की यांच्या अनेक मुलाखती, वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजनवरून झाल्या. भारतातही ते गेल्या डिसेंबरमध्ये आले असताना, पश्चिम बंगाल व केरळ येथे त्यांच्या मुलाखती घेण्यात आल्या. देशाविदेशातील या मुलाखतींमधून निवडक प्रश्नोत्तरे याठिकाणी आम्ही देत आहोत. - संपादक)*

**प्रश्न** : तुमचा जन्म, पालकांचे तुमच्यावर झालेले संस्कार याविषयी सुरुवातीला थोडे सांगाल का ?

● माझा जन्म फिलाडेल्फियामधला. १९२८सालचा. माझे वडील हिब्रू भाषेचे अभ्यासक होते आणि आई शाळेत हिब्रू शिकवीत होती. फिलाडेल्फियात हिब्रूंच्या सांस्कृतिक वातावरणात वाढलो; कारण अशी हिब्रू भाषिकांचीच एक वस्ती तेथे होती. माझे आई-वडील, त्यांची कुटुंबे ही स्थलांतरितांची कुटुंबे होती. वडील-वडिलांचे कुटुंब बाल्टीमोरचे. आई-आईचे कुटुंब न्यूयॉर्कचे. बाल्टिमोर-कुटुंब तसे कट्टर सनातनी. विशेषत: असे घडते की जे असे देशांतर केलेले लोक असतात, त्यांच्यात आपल्या सांस्कृतिक परंपरा अधिकच घट्ट करण्याची प्रवृत्ती असते. कदाचित अगदी नवीन वातावरणात आपले 'स्व'त्व टिकविण्याचा तो प्रकार असावा. आईचे कुटुंब मात्र ज्यू कामगारवर्गाचे होते. अतिशय

सुधारणावादी. माझ्यावर तसे संस्कार म्हणाल तर माझे काका - म्हणजे माझ्या आत्याचे यजमान - जे चौथीच्या पुढेही गेले नव्हते, त्यांचेच बरेचसे झाले. न्यूयॉर्कमध्ये त्याचे एक साधे वर्तमानपत्र विक्रीचे दुकान होते. पण तोच त्यावेळच्या बुद्धिमान लोकांचा एक अड्डा होता. अनेक विचारवंत, प्राध्यापक मंडळी तिथे रोज हजेरी लावत असत.

काकांकडे मी नेहमी राहायला जात असे; मला या वृत्तपत्रांच्या दुकानात जाऊन बसायला आवडायचे. त्यावेळी 'न्यूज इन मिरा' (म्हणजे न्यूज व मीरर) म्हणून एक वृत्तपत्र होते, ते आजही आठवते. मी त्यावेळी आठ वर्षांचा असेन. पुढे या माझ्या काकांमुळेच मी तत्कालीन रॅडिकॅलिझमच्या चळवळीत उतरलो. हिब्रू लोकांची, झियानिस्ट - इस्रायलपूर्व पॅलिस्टिनमधल्या जीवनाशी संबंधित अशी चळवळ होती. तिचा माझ्यावर खूपच प्रभाव पडला. मी स्वतः हिब्रू शिक्षक झालो. चळवळीचा तरूण पुढारी झालो. खरं तर, त्यातूनच मी भाषाशास्त्राकडेही वळलो.

**प्रश्न** : या तुमच्या वयातच, मला वाटते, जॉर्ज ऑर्वेलचे वाचन किंवा जागतिक मंदीचे वातावरण आणि स्पॅनिश युद्धासारख्या घटना, यांचे संस्कार तुमच्यावर झाले. त्याबद्दल थोडे सांगा ना !

● अगदी उलट आहे हे. ऑर्वेलचे, माझ्या मते, महान पुस्तक कोणते असेल तर ते आहे, 'होमेज टू कॅटलोनिया', मला वाटते प्रथमतः ते १९३७साली प्रसिद्ध झाले. पण कम्युनिस्टविरोधी असल्यामुळे ते दाबून टाकण्यात आले. पुढे जागतिक महायुद्धाच्या काळात तर ते पुढे येणे शक्यच नव्हते; त्यानंतरच ते लोकांपुढे येऊ शकले. स्पॅनिश युद्धाविषयी म्हणाल तर मला त्याहीपूर्वीपासून त्यात रस होता.

**प्रश्न** : तुम्ही त्यावर प्रत्यक्षात लिहिले होते ना ? तुम्ही याच विषयावर तुमचा पहिला निबंध वयाच्या दहाव्या वर्षीच लिहिलात...

● हो, स्पॅनिश युद्धावरच.

**प्रश्न** : हे तुमचे विविध अनुभव - तुम्ही असे म्हणालात की त्यातूनच तुम्ही भाषाशास्त्राकडे वळलात; पण मला असही वाटतं की त्यातूनच तुमचे जगाबद्दलचे नि एकूण राजकारणाबाबतचे विचार तयार होत गेले. तुम्ही स्वतः 'लिबर्टेरियन अनार्किस्ट' आहात. या देशातील प्रश्नांबाबत जी काही मांडणी केली जाते, त्यात अनेक गैरसमज आहेत - आणि जे काही तुम्ही लिहिता त्यानेही गैरसमज होतात. याविषयी काही सांगता येईल ?

● मी जरा अमेरिका बाजूला ठेवतो. काही प्रमाणात ब्रिटनही. कारण, स्वतंत्रतावादी (लिबर्टेरियन) या शब्दाचा जो अर्थ इतिहासात घेतला जातो, त्याच्या अगदी विरूद्ध अर्थाने तो अमेरिकेत घेतला जातो. आधुनिक युरोपच्या इतिहासात, नेहमीच, त्याचा अर्थ समाजवादी-अराजकवादी (सोशालिस्ट अनार्किस्ट) असा आहे. समाजवादी चळवळीत किंवा कामगार चळवळीत असलेली अ-राज्यवादी भूमिका असा त्याचा अर्थ होतो. पुढे त्याच्याच दोन शाखा झाल्या. स्थूलपणे सांगायचे तर, त्यातील एक होती राज्यवादी (स्टेटिस्ट) तर दुसरी होती अ-राज्यवादी (अँटी-स्टेटिस्ट). राज्यवादी शाखेतून पुढे बोल्शेव्हिझम्, लेनिन, ट्रॉटस्की हे उदयाला आले तर अ-राज्यवादी शाखेत मार्क्सवादी, डावे मार्क्सवादी किंवा रोझा लक्झेंबर्ग नि इतर येतात. ही विचारधारा, त्यात अराजकवादी धागा मिसळून, ज्याला आपण स्वतंत्रतावादी समाजवाद (लिबर्टेरियन सोशालिझम) म्हणतो आहोत, तो उदयाला आला. त्यामुळे युरोपमध्ये नेहमीच लिबर्टेरियन हे समाजवादी मानले जातात. आणि इथे, (अमेरिकेत) मात्र कडवे पुराणमतवादी (अल्ट्रा कॉंझर्वेटिव्ह) म्हणजे आयन रँड किंवा कॅटो इन्स्टिट्यूट यांसारखे. पण हा खास अमेरिकन अर्थ आहे. तिकडे युरोपमध्ये मात्र समाजवादी पण अ-राज्यवादी किंवा समाजवादाची अ-राज्यशाखा या अर्थाने तो घेण्यात येतो. मलाही तोच अर्थ अभिप्रेत आहे. अ-राज्यवादी हा एक संघटित समाज असतो. पूर्णपणे संघटित आणि लोकशाहीवर आधारलेला असा हा समाज असतो. तिथे कुठेही अराजकाला वाव नाही.

इथे अमेरिकेत त्याची मुळे खूप खोलवर जातात. अमेरिकेतील एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास म्हणजे औद्योगिक क्रांतीच्या सुरूवातीस असलेल्या कामगार चळवळीत ती आहेत... त्याकाळी 'मानवी गुलामी'विरूद्धचे युद्ध पेटले होते. आता उद्योगांतून वेतनासाठी काम करणे, ही सुद्धा एक प्रकारची गुलामीच मानली जाऊ लागली होती. लक्षात घ्या, हा काही फार वेगळा विचार नव्हता. अगदी रिपब्लिकन पार्टी किंवा अब्राहम लिंकन यांचीही हीच भूमिका होती.

अमेरिकेत एक परंपरा चालू आहे. तिला 'रिपब्लिकॅनिझम' असे म्हणतात. आम्ही जगातले पहिले स्वतंत्र लोक आहोत. परंतु त्या स्वातंत्र्याचे अवमूल्यन करणारी, स्वातंत्र्य नाहीशी करणारी अशी ती आहे. खरं तर स्वातंत्र्य हा जगभरच्या कामगार चळवळींचा गाभा आहे. त्यामागचे गृहीत आहे ते असे की, "जे कारखान्यात काम करतात त्यांचीच त्यावर मालकी असली पाहिजे."

रिपब्लिकॅनिझमची एक महत्त्वाची घोषणा आहे की "आजच्या जगाचा नवा घोष, संपत्ती मिळवा, त्यासाठी स्वतःला वगळून इतर सर्वकाही विसरा." ही जी घोषणा आहे, तिचा कामगारचळवळीकडून धिक्कार केला जातो. स्वतःची सर्व नाती-गोती विसरून, केवळ पैशाच्या मागे लागले पाहिजे, ही गोष्ट मूलभूत मानवी स्वभावाचे अवमूल्यन करणारी, त्याची पायमल्ली करणारी अशी आहे.

अमेरिकेची ती पूर्वीची संस्कृती आजवर अत्यंत कठोरपणे दडपली गेली आहे. अमेरिकेचा कामगारचळवळीचा इतिहास अतिशय हिंसात्मक गोष्टींनी भरलेला आहे. युरोपपेक्षाही जास्त. ही चळवळ दीर्घकाल, अगदी टोकाच्या हिंसक पद्धतींनी धुऊन टाकली आहे.

**प्रश्न** : थोडेसे या परंपरेच्या मुद्यातून बाहेर पडू या. कायदेशीर सत्तेविषयीची तुमची कल्पना काय आहे ? कोणत्या परिस्थितीत सत्ता कायदेशीर ठरते ?

● जी अराजकतावादी परंपरा मी स्पष्ट केली, तिचा गाभाच मुळी हा आहे की, सत्ता ही नेहमीच बेकायदेशीर असते. तिने स्वतःच आपण कायदेशीर आहोत असे सिद्ध करेपर्यंत..... सत्ता बेकायदेशीर असते, हे मुळी गृहीतच आहे. तुम्ही एखादा युक्तिवाद करून जोवर हे दाखवीत नाही की ती बरोबर आहे, तोवर ती बेकायदेशीर आहे. ही गोष्ट, आंतरराष्ट्रीय स्तरावरील हिंसेच्या वापरासारखी आहे. जो कोणी हिंसेचा आसरा घेतो त्यानेच त्याची युक्तायुक्तता पटवून द्यायची असते. ही जबाबदारी त्याचीच असते.

**प्रश्न** : जी सत्ताकेंद्रे दुर्बल असतात किंवा जे सत्ताविहीन असतात, त्यांच्याबाबतीत ही सिद्ध करण्याबाबतची जबाबदारी मूलतः कमी असते काय ?

● नाही. ती सर्वांना समानच असते. मी दहशतवादाविषयी लिहिले आहे आणि हे दाखविणे तसे अवघड नाही की दहशतवाद आणि सत्ता या बरोबरीने जाणाऱ्या गोष्टी आहेत. यात काहीच आश्चर्य नाही. जास्त शक्तीमान राष्ट्रे ही सामान्यपणे, अधिक दहशतवादात गुंतलेली असतात. अमेरिका ही सर्वशक्तीमान आहे; म्हणजेच ती, त्यांच्याच दहशतवादाच्या व्याख्येनुसार मोठ्या प्रमाणात दहशतवादी आहे.

**प्रश्न** : अमेरिका हा 'सर्वात जास्त दहशतवादी देश' आहे, हे तुमचे म्हणणे अनेक अमेरिकनांना धक्कादायक आहे, तुम्ही याबाबत विस्ताराने सांगता का ?

● मी एकच उदाहरण देतो. निकाराग्वाचे. अमेरिका हा एकमेव देश असा आहे की ज्याचा, जागतिक न्यायालयाने, आंतरराष्ट्रीय दहशतवादासाठी धिक्कार केला आहे; आणि हाच देश असा आहे की ज्याने, युनोच्या,

आंतरराष्ट्रीय कायदा पाळावा, याबाबतच्या ठरावाला विरोध केला आहे. त्याने आपला आंतरराष्ट्रीय दहशतवाद चालूच ठेवला आहे... इथल्या ओख्लाहामा शहरावर बाँबहल्ला झाला तेव्हा सगळेच या दुष्कृत्याने हेलावले. दोन-चार दिवस सर्वच वृत्तपत्रांतून बातम्या होत्या की ओख्लाहामा शहर बैरूतसारखे दिसते आहे. पण मला कोणीच असे म्हणताना दिसले नाही की बैरूत हे 'बैरूत'सारखे दिसते आहे. कारण असे की, रेगन सरकारने १९८५साली असाच, ओख्लाहामा सारखाच, दहशतवादी बाँबहल्ला बैरूत शहरावर केला होता. मशिदीतून जास्तीत जास्त लोकांचा लोंढा बाहेर पडण्याची वेळ साधून, तिथे उभ्या असलेल्या ट्रकमधून बाँबहल्ला केला. यात ८० लोक मारले गेले आणि दोनशेच्यावर जखमी झाले. कारण काय तर तिथला मुस्लिम धर्मगुरू त्यांना नको होता. पण तो या हल्ल्यातून वाचला. ही काही गुप्त गोष्ट नाही. इराकमधील हल्ल्यात दहा लाख नागरिक मारले गेले, त्यात निम्मी मुलेच होती. ही किंमत मोजायची आमची तयारी होती, असे जेव्हा अमेरिकेतील 'सेक्रेटरी ऑफ स्टेट' म्हणतात, तेव्हा तुम्ही याला काय नाव द्याल ? इस्रायलच्या क्रौर्याला सहाय्य करणे, हेही असेच उदाहरण आहे.

तुर्की सरकारने आपल्याच देशातील कुर्डिश लोकांना ठेचून काढले आणि क्लिंटन सरकारने, या कृत्याला निर्णायक पाठिंबा दिला, ऐंशी टक्के शस्त्रास्त्रे पुरविली आणि जसजशी क्रूरता वाढत गेली तसतशी आपली मदतही वाढवत नेली. हे आणखी एक उदाहरण. सुदानमधील बाँबहल्ला घ्या, अकरा सप्टेंबरच्या पार्श्वभूमीवर याची एक ओळीची बातमी लक्षातही आली नसेल. ओसामा बिन लादेनने जर अमेरिकेतील निम्मा औषधी साठा आणि तो पुन्हा निर्माण करण्याची व्यवस्था, हल्ला करून नष्ट केली असती, तर याच पत्रकारांची काय प्रतिक्रिया राहिली असती ? असे आपल्या किंवा इतर कोणत्या राष्ट्रात घडले तर कोणत्याही राष्ट्राची प्रतिक्रिया काय असती ?

अर्थात, ही अशी तुलनाही बरोबर नाही. कारण, अमेरिकेचा हल्ला अशा गरीब राष्ट्रावर होता की मुळातच तेथे अपुरी औषधे वा लसी आहेत आणि ती भरून काढणेही त्यांना शक्य नाही. या एका क्रूर कृत्याने किती हजार वा लाख माणसे दगावली असतील कोण जाणे ! क्यूबाचे उदाहरण घ्या. १९५९सालापासून चालू झालेल्या दहशतवादी अत्याचारांबद्दल अमेरिकेचा हिंसात्मक बदला घेण्याचा अधिकार क्युबाला नको काय ? अमेरिकेचे हे तर्कशास्त्र नव्हे का ? त्याला कोणीच हटकत नाही. दुर्दैवाने या सर्व गोष्टी

अमेरिका आणि इतरही दहशतवादी राष्ट्रांकडून निर्विघ्नपणे चालल्या आहेत.

**प्रश्न** : दहशतवादाची राजकीय उपयुक्तता तुम्ही थोडक्यात सांगाल का ? सैद्धान्तिक व्यवस्थेत त्याचे नेमके काय स्थान आहे ?

● ज्याला 'लो इंटेन्सिटी वॉरफेअर' म्हणतात त्याला अमेरिका अधिकृतपणे बांधील आहे. तो त्यांचा अधिकृत सिद्धांत आहे. लष्कराच्या हस्तपुस्तिकेत तुम्ही 'लो इंटेन्सिटी कॉन्फ्लिक्ट'ची व्याख्या वाचलीत आणि बरोबरीने त्यातलीच 'दहशतवादा'ची अधिकृत व्याख्या पाहिलीत तर, तुमच्या लक्षात येईल की या दोनही गोष्टी जवळजवळ एकच आहेत. कोणतेही राजकीय, धार्मिक वा अन्य हेतू साध्य करण्यासाठी, नागरी लोकसंख्येबाबत कोणतेही बळजबरीचे उपाय वापरणे म्हणजे दहशतवाद. या व्याख्येनुसार वर्ल्ड ट्रेड सेंटरवरील हल्ला हा दहशतवादी ठरतो, अगदी पाशवी गुन्हा ठरतो. हा अधिकृत सिद्धान्त. मी यापूर्वी दोन-चार उदाहरणे तुम्हाला दिली. आणखीही देता येतील. ती सर्व देशपातळीवरची आहेत; अर्थात, केवळ अमेरिकेबाबतची नाहीत. ही सगळी उदाहरणे जगजाहीर असली पाहिजेत. ती तशी नाहीत, हे लांच्छनास्पद आहे. ज्या कुणाला त्यांच्याबद्दल सविस्तर माहिती हवी असेल त्यांनी, दहा वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेले, 'वेस्टर्न स्टेट टेररिझम्' हे पुस्तक वाचावे. वेगवेगळ्या लेखकांचे लेख असलेले हे पुस्तक ॲलेक्स जॉर्ज यांनी संपादित केलेले आहे. (रूटलेज १९९१), त्यात अशी कित्येक उदाहरणे दिली आहेत. या सर्व गोष्टी लोकांना माहिती व्हायला पाहिजेत, म्हणजे आपण काय करतो आहोत हे त्यांना कळेल.

**प्रश्न** : अकरा सप्टेंबरच्या घटनेने इतिहासाला वेगळे वळण मिळाले ?

● होय. कारण आता, अमेरिकेकडे बंदुका वळल्या आहेत. अमेरिकेवरचा हल्ला निश्चितच क्रूर होता. पण तसा तो काही नवीन नव्हता. अनेक वर्षे कित्येक देशांना याहूनही भयानक दहशतींना तोंड द्यावे लागले आहे. अमेरिका आता अफगाणिस्तान नष्ट करू पाहतोय. कारण काय तर, बुश सरकारने, ओसामा बिन लादेनचा हल्ल्यात हात असल्याचा पुरावा दिल्याखेरीज तालिबान सरकारने बिन लादेनला अमेरिकेच्या हवाली करण्यास नकार दिला.

अमेरिका व युरोप इतरांवर हल्ले करून त्यांना नष्ट करू शकतात, पण, त्यांच्यावर मात्र कुणी हल्ला करता कामा नये. आता पहिल्यांदाच असे घडले आहे की, बंदुका अमेरिकेच्या दिशेने रोखल्या गेल्या आहेत. हे जागतिक इतिहासाला मिळालेले नाट्यपूर्ण वळण आहे.

**प्रश्न** : तुम्हाला असे वाटते का की, अकरा सप्टेंबरचा हल्ला हा संस्कृती संघर्षाचा (क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स) परिणाम आहे ?

● हा केवळ अमेरिकेचा प्रचाराचा भाग आहे. ते थोतांड आहे. आपली धोरणे तशीच चालू ठेवण्यासाठीची ती एक खोटी सबब आहे; आणि त्यासाठी 'संस्कृतींचा संघर्ष' ही विद्वान लोकांनी शोधलेली संज्ञा आहे. आता असे पाहा, की सौदी अरेबिया हे जगातील सर्वात कडवे मुस्लिम राष्ट्र आहे पण ते तर अमेरिकेचे आवडते राष्ट्र आहे. सर्वात मोठे मुस्लिम राष्ट्र म्हणजे इंडोनेशिया. ते अमेरिकेने जवळ केलेल्यांपैकी एक राष्ट्र आहे. इंडोनेशियाच्या जनरलने, १९६५साली लाखो शेतकऱ्यांची कत्तल करून त्यांची कम्युनिस्ट पार्टी पूर्णतः उद्ध्वस्त केली तेव्हापासून ते अमेरिकेच्या जवळचे राष्ट्र झाले आहे. अमेरिकेची धोरणे ही केवळ आपल्या राजकीय डावपेचांच्या फायद्यासाठी राबविलेली असतात. लोक मात्र त्याला वेगवेगळी लेबले लावतात. कोणी त्याला 'संस्कृतींचा संघर्ष' म्हणतात; तर कोणी त्याला 'जागतिकीकरणा'चा प्रभाव म्हणतात.

**प्रश्न** : जगाने दहशतवादाशी मुकाबला कसा करावा ? युनोने त्यात पुढाकार घ्यावा का ?

● सगळ्यात मोठा प्रश्न असा आहे की, जगातील सर्वात प्रबळ राष्ट्र अमेरिका हेच माफियांचा मेरूमणी असल्यासारखे वागत आहे. अमेरिकेने युनोची पूर्णतः उपेक्षा केली आहे, कारण तिला आपलीच दहशतवादी धोरणे पुढे रेटायची आहेत. जोवर अमेरिका आपल्या या धोरणात बदल करीत नाही तोवर दहशतवादाविरूद्धचा जागतिक लढा उभा राहणार नाही.

**प्रश्न** : ज्यांचे न्याय्यतेशी काही देणे-घेणे आहे अशा सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांची आज भूमिका काय असावी असे तुम्हास वाटते ? काहींच्या म्हणण्याप्रमाणे आम्ही आमच्या टीकांना आवरते घ्यावे की, उलट आमचे प्रयत्न अधिक व्यापक करावेत ?

● या सामाजिक कार्यकर्त्यांना काय हवे आहे यावरून ते ठरेल. जगभर हिंसेचे हे जे चक्र सुरू झाले आहे ते पुढे वाढत जावे, किंवा अकरा सप्टेंबरसारख्या घटनांतून निर्माण होणाऱ्या अत्याचारांची शक्यता दुणावली जावी, असे जर त्यांना वाटत असेल तर त्यांनी आपले टीकास्त्र आवरते घ्यावे, विचार करणे सोडून द्यावे आणि ते ज्या गंभीर प्रश्नांमध्ये गुंतलेले आहेत, त्यातून सरळ बाजूला व्हावे. तसेच इथल्या आणि एकूण जगातल्या लोकांना फार मोठा धोका निर्माण करताहेत अशा राजकीय-आर्थिक सत्तांच्या योजना किंवा सबंध

मानवजातीच्या अस्तित्वालाच धोका पोचवताहेत अशा कृत्यांना आपण मदतच करावी, असे ज्यांना वाटत असेल, त्यांनाही माझा हाच उपदेश आहे.

पण जर का, भविष्यात अत्याचार कमी व्हावेत; स्वातंत्र्य, मानवी हक्क आणि लोकशाही यांचा विस्तार व्हावा असे जर वाटत असेल, तर मग मात्र त्यांनी अगदी विरूद्ध मार्ग अवलंबला पाहिजे. या आणि अशा तऱ्हेच्या गुन्ह्यांमागच्या कारणांचा शोध घेण्याकरता, प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. किंबहुना आपली अधिक शक्ती त्यांनी, त्यांची बांधिलकी असलेल्या न्याय्य गोष्टींसाठी पणाला लावली पाहिजे. तशी संधी भरपूर निर्माण झाली आहे. काळजात धडकी भरविणाऱ्या या गुन्ह्यांमुळे, समाजातील उच्चभ्रू लोकही ज्याप्रकारे उत्स्फूर्त प्रतिक्रिया व्यक्त करीत आहेत, त्याची कल्पनाही करणे काही वर्षांपूर्वी शक्य नव्हते. इतरांची तर गोष्टच सोडा. अर्थात, लोकांनी आज्ञाधारकपणे चूप बसावे असे सांगणारे आहेतच. पण त्यांच्या बेभान वल्गनांना आणि असत्याला भीक घालण्याचे कारण नाही. त्यांच्या धमक्यांना न भिता, प्रत्येकाने प्रामाणिकपणे सत्याची कास धरली पाहिजे. आपण काय करतो किंवा करत नाही, त्याचा मानवजातीवर होणाऱ्या परिणामांचा विचार आपण करत राहायला हवे.

**प्रश्न :** अखेरचा प्रश्न विचारतो. विद्यार्थी जर ही मुलाखत वाचताहेत असे मानले तर तुम्ही समोर ठेवत असलेली उद्दिष्टे स्वीकारून त्यांना आपल्या भावी काळाची तयारी करायची असेल तर, तुम्ही त्यांना काय सल्ला द्याल ?

● स्वत:शी प्रमाणिक राहा. चिकित्सक व्हा. प्राथमिक स्वरूपाची नैतिक मूल्ये आपलीशी करा. उदाहरणार्थ, असे तत्त्व की एखादी गोष्ट जर आपण दुसऱ्यासाठी चुकीची मानत असू तर ती आपल्यासाठीही चुकीची आहे, असे मानणे. अराजकवादाचे मूलभूत तत्त्व आत्मसात करा, ते कोणते ? तर, तुम्हास समर्थन करता येत नसेल तर सत्ता आणि हिंसा या गोष्टी मुळातच बेकायदेशीर आहेत. हे तत्त्व सगळीकडेच लागू आहे; अगदी कुटुंबातील परस्परसंबंध असोत किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवरचे असोत. याही पलीकडे जाऊन, तुमच्याचसारखा विचार जे करू पाहताहेत, त्यांच्याशी सलगी करा; त्यांच्यापासून शिका आणि शिकून अत्यंत जबाबदारीने जगाचे कठीण प्रश्न सोडविण्यासाठी त्या प्रश्नांना सामोरे जा. प्रश्न सुटू शकतात असा विश्वास ठेवा.

⌘ ⌘

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY ARTHABODH PUNE

# संस्कृती व आर्थिक विकास

जागतिक संस्कृती अहवालात, पहिल्या विभागात 'संस्कृती आणि आर्थिक विकास' या विषयावर नोबेल पारितोषिकप्राप्त अर्थशास्त्रज्ञ अमर्त्य सेन यांचे एक टिपण आहे. 'आशियाची मूल्ये व आर्थिक प्रगती' यांचा परस्पर-संबंध मांडणारे हे टिपण आहे. कारण, अगदी अलीकडच्या काळात, मुख्यत्वेकरून आशियाच्या पूर्वेकडील देशांमध्ये, मोठ्या प्रमाणावर आर्थिक विकासाला गती आली आहे. सध्याच्या जागतिक आर्थिक अडचणींच्या काळात तर, ती विशेषत्वाने उठून दिसते. जपान, दक्षिण कोरिया, तैवान, हाँगकाँग, सिंगापूर आणि आता चीन, या सर्व देशांचा समावेश आशियामधील गतिमान विकास करणाऱ्या देशांमध्ये होतो. या विकासाच्या पार्श्वभूमीवर एका नव्याच दिशेने विचारवंतांनी सैद्धांतिक मांडणीचा प्रयत्न सुरू केला आहे. आशियाची संस्कृती आणि आर्थिक विकास, यांचे नाते बांधण्याचा हा प्रयत्न आहे. आशियाच्या संस्कृतीमध्ये पूर्वापार रुजलेली मूल्ये आणि त्यातही कन्फ्युशिअसचे तत्त्वज्ञान-त्यातील मूल्ये यांचा या देशांच्या आर्थिक प्रगतीशी संबंध काय आहे, हे शोधण्याचे काम चालू आहे.

हा प्रश्न खूप महत्त्वाचा आहे, असे अमर्त्य सेन म्हणतात. कन्फ्युशिअन मूल्ये किंवा आशियातील इतर मूल्ये जर आर्थिक विकासाला चालना देण्यात यशस्वी ठरली असली तर, यासंदर्भातील कार्यकारण संबंध तपासण्याने आपल्याला अशा विशिष्ट मूल्यांमधील आर्थिक विकासाला चालना देण्याची ताकद अजमावता येईल. आणि मग, हे आर्थिक विकासाचे मूल्याधारित स्पष्टीकरण देणारे शास्त्र उपयुक्त ठरू शकेल.

पण, सांस्कृतिक मूल्ये नि आर्थिक विकास या संबंधांमधील सत्यता पडताळून पाहणे फारसे सोपे नाही. कारण, हा संबंध स्पष्टपणे मांडणे कठीण असते. आशियाही त्याला अपवाद नाही. एक गोष्ट मात्र नक्की की औद्योगिक क्रांती ही प्रथमतः युरोपात झाली; आशियात नाही. त्याहीपूर्वी इटालीमध्ये ज्याचा उगम झाला आणि ज्याने सबंध युरोपचाच चेहरा-मोहरा बदलून टाकला, ते प्रबोधनाचे युगही आशियाच्या कितीतरी आधी, युरोपमध्ये सुरू झाले. त्यावेळी

देखील लोकांना कुतूहल होते की, अशी कोणती मूल्ये होती की जी युरोपला आशियाच्या आणि जगाच्या पुढे घेऊन गेली.

पुढे जपान हे राष्ट्र एक आर्थिक नि सैनिकीसत्ता म्हणून पुढे आले. तेव्हा, म्हणजे विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, असा प्रश्न उपस्थित केला गेला की, युरोपबाहेर औद्योगिकदृष्ट्या प्रगत होणारा जपान हाच एकमेव देश का ? जपानच का चीन का नाही ? जपानची काही खास मूल्ये, परंपरा, रीतीरिवाज अगदी सामुराई वंशापासून ते कुटुंबकेंद्री उद्योगांपर्यंत, यांकडे लोकांचे लक्ष जाऊ लागले.

यानंतर आशियातील इतर राष्ट्रे, हाँगकाँग, तैवान, सिंगापूर नि दक्षिण कोरिया प्रगत होऊन, जगाचे लक्ष वेधून घेऊ लागली. मग हळूहळू सामुराईंकडचे लक्ष उडून पूर्व आशियामधील देशांच्या एकत्रित परंपरांकडे लक्ष केंद्रित होऊ लागले. यातही अलीकडे चीनचे आर्थिक नि सामाजिक परिवर्तन होऊन आर्थिक विकासाचा जो वेग प्राप्त झाला, त्याकडे लक्ष जाऊ लागले आहे. त्यातही कन्फ्युशिअसच्या तत्त्वज्ञानाचे खास गुण शोधण्याचा, म्हणजेच जपान, चीन आणि इतर पूर्व आशियातील देशांमधील सांस्कृतिक बंध तपासण्याचा प्रयास होऊ लागला.

याचवेळी थायलंडही वेगाने प्रगती करू लागला. त्याचा सांस्कृतिक वारसा बौद्ध आहे; कन्फ्यूशियन नाही. जपानमध्येही पूर्वी काय नि आत्ताही काय, बुद्ध धर्माचाच प्रभाव आहे. कोरिया नि चीनमध्येही तो प्रभावी आहे. बौद्ध परंपरा ही कन्फ्युशियसच्या परंपरेपेक्षा मूलतः वेगळीच आहे. अगदी अलीकडेपर्यंत इंडोनेशियासुद्धा वेगाने प्रगती करीत होता. तिथे मुस्लिम, बौद्ध आणि हिंदू या सर्वच धर्म-संस्कृतींचा प्रभाव आहे. आत्ता आत्ता, भारताची मोठी अर्थव्यवस्थाही वेगाने पुढे सरकू लागली आहे. भारतातील राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग हा पूर्व नि पूर्व आशियाच्या पाठोपाठ पण युरोप-अमेरिकेपेक्षा जास्त आहे. या देशातील पूर्वीच्या मंदगती विकासाचे कारण म्हणून ज्या मूल्य परंपरांचा उल्लेख केला जात होता, त्यातच आता विकासाच्या स्पष्टीकरणासाठी पाहिले जात आहे; असे विवेचन अमर्त्य सेन यांनी केले आहे.

आशियातील आर्थिक विकासाचे स्पष्टीकरण आशियातील मूल्यांमध्ये शोधण्याविषयी शंका प्रदर्शित करीत असतानाच माझे म्हणणे नाही की, आशियातील आर्थिक विकासात, आशियातील मूल्यांचे काय स्थान आहे याबाबत आपण काहीच शिकलो नाही, असे अमर्त्य सेन म्हणतात. काही धडे मिळतात.

पण ते खास आशियाच्या संस्कृतीशी संबंधित आहेत असे म्हणता येत नाही. सगळ्यात महत्त्वाचा धडा आहे तो मात्र नकारार्थी आहे. युरोपियन मार्ग हाच एकमेव यशाचा मार्ग नाही, हा तो धडा आहे. हे समजण्यासाठी युरोपमधील औद्योगिक क्रांतीच्या काळाकडे वळावे लागते. वेबरच्या भाषेत बोलायचे तर त्यावेळी 'प्रोटेस्टंट्स नीतीशास्त्र आणि भांडवलशाहीचा प्राण' यांवर भर होता. आता आपल्याला हे माहीत झाले आहे की, इतरही मूल्ये विकासास सहाय्य करतात, कदाचित अधिक चांगली करतात. मागील शतकाच्या सुरूवातीच्या जपानच्या प्रगतीपासून आजच्या आशियातील देशांच्या प्रगतीपर्यंतच्या इतिहासाने हा धडा आपल्याला दिला आहे.

अर्थात, आधीच्या काळातील युरोपचे कौतुक करणारा पूर्वग्रह आणि आता आशियाच्या संबंधात एकत्रित मूल्यांचा विचार यात गल्लत करता कामा नये. जपानने विकासदराबाबत युरोपसारखीच किंवा त्याहीपेक्षा उंच उडी घेतली होती तरी त्याचा विकासदर आता मंद झाला आहे; आणि अशीच शक्यता पूर्वआशियातील देशांबाबतही आहे; आजच त्या देशांचा दरडोई वास्तव उत्पन्नाचा दर युरोपपेक्षाही कमी आहे. तरीही पूर्वआशियातील प्रगतीचे काही विशेष आहेत. या प्रगतीत शिक्षण नि कौशल्यवृद्धी यांचा फार मोठा भाग आहे. तसाच तो बाजार आणि शासन यांच्यातील खेळीमेळीच्या नि परस्पर सहकार्याच्या संबंधांचाही भाग आहे. तो इतर देशांनाही अंमलात आणता येणार नाही, असे नाही.

## संस्कृती व स्त्रियांचे वय

क्वीन्सलँड युनिव्हर्सिटी ऑफ टेक्नॉलॉजीच्या एका वैद्यकीय अधिवेशनात डॉ. गॅब्रिएला बर्गर यांनी आपल्या एका अभ्यासातील निष्कर्ष मांडले. ते असे - रजोनिवृत्तीच्या काळात महिलांच्या मानसिक स्थितीवर होणाऱ्या परिणामांच्या संदर्भात 'संस्कृती'चा प्रभाव पडतो. ऑस्ट्रेलियात, पंचवीस टक्के महिलांच्या बाबतीत, त्यांना आपले सौंदर्य, आपले स्थान व आपली समाजाला असलेली किंमत वृद्धत्वामुळे कमी होते, असे वाटते. याउलट पूर्वेकडील देशांमधील संस्कृतीत, वाढत्या वयाचा संबंध समजूतदारपणाशी नि आदर दर्शविण्याशी लावला जातो, त्यामुळे स्त्रियांचे कुटुंबातील स्थान मानाचे व आदराचे ठरते.

# संस्कृती व मानसशास्त्र

मानववंशाचा आणि मानवी संस्कृतीचा अभ्यास मानववंशशास्त्रात केला जातो. अलीकडच्या काळात, मनोवैज्ञानिक मानववंशशास्त्राची (psychological anthropology) शाखा एक नवी अभ्यासशाखा निर्माण झाली आहे. यामध्ये, वेगवेगळ्या सांस्कृतिक गटांमधील व्यक्तींच्या भिन्न वर्तनांचा, व्यक्तीमत्त्वांचा, वृत्तींचा अभ्यास, मानसशास्त्रीय पद्धतींचा वापर करून केला जातो. त्याचा एक फायदा असा झाला आहे की, मानसशास्त्रीय अभ्यासांतही संस्कृती, तिचे विविध घटक यांचे, जाणीवा, भावना किंवा आकलन या मानसशास्त्रीय संकल्पनांच्या संदर्भातील महत्त्व मानसशास्त्रज्ञांच्या लक्षात येऊ लागले आहे. शैक्षणिक मानसशास्त्रातही याची दखल घेतली जात आहे. 'सांस्कृतिक मानसशास्त्र' अशी संज्ञा आता, मानसशास्त्रात सांस्कृतिक अंगांनी केल्या जाणाऱ्या अभ्यासांना लावली जाते. 'संस्कृती' या संज्ञेत ज्या ज्या गोष्टींचा समावेश होतो, त्यांचे मानसशास्त्रीय स्वरूप पाहणे मनोरंजक आहे.

कोर बेअरवेल व थिओ वेरहेगन यांनी संयुक्तपणे, 'इंटरनॅशनल सोसायटी फॉर थिओरेटिकल सायकॉलॉजी' या संस्थेच्या, सातव्या अधिवेशनात, १९९७ साली, संस्कृतीच्या मानसशास्त्रीय अभ्यासावरील, एक निबंध सादर केला होता. त्यात, मानसशास्त्रामधील एका कळीच्या मुद्याबाबतची विसंगती स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. लेखकांच्या मते, लोक जेव्हा, आपण स्वत: 'कुणीतरी' आहोत, 'आपण' आहोत, आणि आपल्या स्वतःच्या अनुभवाद्वारेच आपण आपली वर्तणूक ठरवितो, असे म्हणतात, तेव्हाही त्यांची वागणूक ही प्राय: सामाजिक-सांस्कृतिक घटकांनीच निबद्ध केलेली असते, म्हणजे, आपली नैसर्गिक वागणूकही सांस्कृतिक घटकांनी - कुटुंब, समाजगट, नैतिकतेच्या कल्पना वगैरेंनी बाधित केलेली असते. अशा प्रकारे, हा निबंध, विशिष्ट अशा विषयावर लक्ष केंद्रित करीत असला तरी त्यावरून मानसशास्त्र आणि संस्कृती यांचा परस्परसंबंधही चांगल्या रीतीने स्पष्ट होतो.

तसा मानसशास्त्राने सुरूवातीपासूनच भिन्न संस्कृतींमधील लोकांच्या मानसक्रियांतील भिन्नतेवर लक्ष केंद्रित केले होतेच. पण, तेथे संस्कृती किंवा सामाजिक-सांस्कृतिक घटक हे केवळ संदर्भित घटक म्हणून किंवा मानवी

मानस-व्यवहारांची पार्श्वभूमी म्हणून येत असत. व्यक्तीचे व्यवहारच नव्हेत, तर व्यक्तीचे मानसही जे घडले आहे ते, सामाजिक-सांस्कृतिक घटकांनीच घडले आहे, याची जाणीव झाल्यापासून मानसशास्त्रीय अभ्यासाने वेगळे वळण घेतले. सांस्कृतिक मानसशास्त्राचा जन्म यातून झाला. त्यामुळे आता, मनुष्य, त्याच्या भाव-भावना, वृत्ती या साऱ्यांच्या अभ्यासात सामाजिक-सांस्कृतिक घटकांना मध्यवर्ती स्थान प्राप्त झाले आहे. संपूर्णपणे 'मनुष्य' नैसर्गिक असून त्याच्या 'पूर्णते'नंतर त्याच्यावर सामाजिक घटकांचा प्रभाव पडतो असे नाही तर, अशा घटकांचा प्रभाव पडूनच माणूस तयार होतो. माणसाचे 'अनुभव' जग हे अशा विविध बाह्य घटकांचा परिपाकच असते. म्हणूनच, श्वेडर यांनी आपल्या 'थिंकिंग थ्रू कल्चर्स : एक्सपिडिशन्स इन कल्चरल सायकॉलॉजी' या पुस्तकात, सांस्कृतिक मानसशास्त्राची व्याख्या देताना म्हटले आहे, " सांस्कृतिक परंपरा नि सामाजिक रीती-रिवाज हे माणसाच्या 'मानसा'ला नियंत्रित करतात, अभिव्यक्त करतात आणि त्यात बदल घडवून आणतात; परिणामतः 'मानवाचे मन' अशी एक गोष्ट राहत नसून, मन, भावना अथवा व्यक्तित्व यांत वांशिक भेद आढळून येतात." या नवविचारांचा परिणाम ज्ञानग्रहणाच्या किंवा आकलनाच्या संदर्भातील सिद्धांतांवरही होऊ लागला आहे. आता असा विचार मांडला जातो की, व्यक्तीच्या संदर्भातील आकलनाच्या प्रक्रियेचा शोध केवळ त्याच्या मेंदूत घेता येणार नाही तर तो, व्यक्ती-व्यक्तींच्या परस्पर संवाद-संबंधातूनही घ्यायला हवा.

गर्जेन यांनी 'सोशल सायकॉलॉजी अँड रॉंग रेव्होल्यूशन' या आपल्या संशोधनपर लेखात असे म्हटले आहे की, 'ज्ञानाचे स्थान आता मनुष्याच्या 'मना'त राहिलेले नाही तर ते, व्यक्तीच्या सामाजिक संबंधांच्या रचनेत सापडते." त्यामुळे अर्थातच, 'व्यक्तीचा स्वतःचा अनुभव' असे जेव्हा आपण म्हणतो, तेव्हा तो केवळ स्वतःचा (समाजविरहित) अनुभव राहत नाही तर तो सामाजिक-सांस्कृतिक घटकांनीच घडविलेला असा असतो. साहजिकच आता, सांस्कृतिक मानसशास्त्राला मानवी वर्तनाचे सामाजिक अंग जाणून घ्यायचे असेल तर त्यासाठी, माणसाच्या अनुभवांच्या बाहेर जायची जरूर नाही. आपण हेही लक्षात घेतले पाहिजे की, 'आपला' अनुभव हा निखळ 'आपला' अनुभव नसतो. तो आपला समाजसंबंधाने दूषित असाच अनुभव असतो.

अलीकडे जगभर जे सामाजिक बदल वेगाने घडून येत आहेत, त्यांनी देशांतर्गत आणि देशबाह्य असलेल्या संस्कृती-भिन्नतांबाबत सर्वच सामाजिक शास्त्रांतील अभ्यासकांना आकर्षित केले आहे. उदाहरणार्थ, जागतिकीकरणाच्या

प्रक्रियेमुळे देशा-विदेशांतील सांस्कृतिक फरक ठळकपणे जाणवू लागले आहेत; त्यातून संस्कृतींच्याच काही नव्या प्रतिमानांचा शोध घेणेही सुरू झाले आहे. भौतिक शास्त्रामध्ये ज्याप्रमाणे, इलेक्ट्रॉन्स हे, अणूरूपात आहेत तद्वतच ते लहरींच्या रूपांतही आहेत, हे सिद्ध झाले आहे, त्याचप्रमाणे संस्कृती ही सुद्धा एकाचवेळी स्थिरपद नि बदलती आहे, ही भूमिका प्रबळ होत चालली आहे. साहजिकच वेगवेगळ्या स्तरांवर संस्कृतींचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न होत आहे.

उदाहरणार्थ, 'सांस्कृतिक भिन्नता नि राष्ट्रीय एकात्मता' यांच्यातील परस्पर नात्याचे असेच एक क्षेत्र आहे. या नात्याचा शोध घेण्यासाठी बहुसंस्कृती राष्ट्रांचा अभ्यास संस्कृती-मानसशास्त्रातील अभ्यासक करीत आहेत. 'स्व'त्वाचा किंवा व्यक्तीच्या अस्मितेचा शोध घेण्यासाठी आता संस्कृतीच्या चौकटीत, वंश, व्यवसाय, राजकीय प्रणाली किंवा धार्मिक श्रद्धा यांचा होणारा परिणाम शोधला जातो किंवा त्यासाठीच व्यक्तींचे कुटुंब, मित्रमंडळी किंवा असेच इतर समाजगट यांच्या पातळीवरील सामाजिक संबंध न्याहाळले जाताहेत.

## संस्कृती व मानसशास्त्र परस्परसंबंध

अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या संस्कृती आणि कोणत्याही व्यक्तीच्या मानसिक प्रक्रिया यांचा संबंध आता सांस्कृतिक मानसशास्त्राच्या क्षेत्रात गृहीत धरला जातो. अर्थात, हा संबंध स्थिर नसून, बदलता असतो. तसेच तो दोन्ही दिशांनी असतो. म्हणजे, व्यक्तीच्या विचारांवर, भावनांवर किंवा वागणुकीवर जसा संस्कृतीचा परिणाम होत असतो, तद्वतच व्यक्तीचे विचार, भावना किंवा वागणूक यांचा, संस्कृतीवरही परिणाम होत राहतो. आणि हा परस्परसंबंध सातत्याने घडून येत असतो. या दोन्ही दिशांनी, सांस्कृतिक मानसशास्त्राच्या क्षेत्रात अभ्यास केला जातो.

मार्क शॅलर, ल्युसियन कॉनवे व एस. क्रँडॉल यांचे 'द सायकॉलॉजिकल फौंडेशन्स ऑफ कल्चर' हे पुस्तक, वर उल्लेखिलेल्या दुसऱ्या दिशेने संस्कृतीचा अभ्यास मांडणारे पुस्तक आहे. मानसशास्त्रीय प्रक्रियांचा संस्कृतींचा कसकसा परिणाम होतो याचा शोध मांडणारे हे पुस्तक आहे. थोडक्यात, मानसशास्त्राच्या दृष्टिकोणातून किंवा चष्म्यातून संस्कृतीचे स्वरूप न्याहाळण्याचा प्रयत्न येथे केला आहे. हा शोध खूप खोलवर जातो. मुळात संस्कृती कशा जन्माला आल्या, वेगवेगळ्या परंपरा किंवा खास वैशिष्ट्ये कशी निर्माण झाली इथपासून ते, संस्कृती टिकल्या कशा, बदलल्या कशा इथपर्यंत

शोध घेतला गेला आहे. संस्कृती निर्मितीच्या प्रक्रियेकडेच हा अभ्यास झुकत असल्यामुळे त्यात सर्वांनाच रस वाटू शकेल.

मनुष्याच्या ज्ञानग्रहण प्रक्रियांबाबत जसजशी अधिकाधिक माहिती प्राप्त होऊ लागली, तसतसा व्यक्तीच्या या संदर्भातील मानसिक प्रक्रियांचा नि त्यावरून ठरलेल्या वागणुकींचा, अधिक विस्तारित अशा समाजावर व संस्कृतींवर होणारा परिणाम अधिकत्वाने स्पष्ट होऊ लागला आहे. परंतु हे अभ्यासक्षेत्र तसे अजून नवीन आहे. विद्यापीठीय क्रमिक पुस्तकांतून, अशा तऱ्हेचे अभ्यास आणि त्यांवर बांधलेले सिद्धान्तन यांचा फारसा समावेश झालेला नाही. फार तर भिन्न संस्कृतींमधील मानसशास्त्रीय वेगळेपण आता, अशा स्तरावरील शास्त्रीय वाङ्मयात आणले गेले आहे. परंतु हे वेगळेपण ज्यांमुळे अस्तित्वात येते, त्या मानसशास्त्रीय प्रक्रियांचा वेध घेणे अजून दुर्मिळच आहे.

संस्कृती ही जर का मानवनिर्मित अशी बाब असेल तर, माणसाच्या मानसिकतेचा परिणाम संस्कृतिनिर्मितीच्या विविध घटकांवर पडणे रास्तच आहे. म्हणूनच वंशशास्त्रज्ञ मेलव्हिल हरकोविट्झ यांनी जेव्हा असे म्हटले की 'संस्कृती म्हणजे पर्यावरणाचा मानवनिर्मित भाग होय', तेव्हा त्याचे स्पष्टीकरण देताना मानसशास्त्रज्ञ हॅरी ट्रिआंडिस यांनी असे लिहिले आहे : 'संस्कृती ही मानवनिर्मित अशा व्यक्तिनिष्ठ नि वस्तुनिष्ठ अशा घटकांचे मिश्रण आहे. याच घटकांनी, आपल्या अस्तित्वाच्या शक्यता दुणावून, या निसर्गातील एका भागीदाराला परिणामस्वरूप असे समाधान प्राप्त करून दिले. जे परस्परांशी एकच भाषा, आणि एकाच वेळी एकाच ठिकाणी असल्यामुळे, सहज संवाद साधू शकले त्यांनी हे घटक आपलेसे केले. यातूनत संस्कृतींचे इमले उभे राहिले हे उघड आहे.'

संयुक्त राष्ट्रसंघातर्फे १६ ऑक्टोबर रोजी 'जागतिक अन्न दिवस' पाळण्यात येतो. हाच दिवस जागतिक पातळीवर 'मॅकडोनाल्ड विरोधी दिवस' म्हणून गेल्या १८ वर्षांपासून अनेक देशांमध्ये पाळण्यात येतो. ही कंपनी सर्व प्रकारचे पर्यावरणीय व मानवी शोषण करते, म्हणून या कंपनीचे खाद्यपदार्थ खाऊ नयेत, असे आवाहन ऑस्ट्रेलिया, फिलिपिन्स, न्यूझीलंड, कॅनडा, ब्राझील, माल्टा, इस्रायल, रशिया आणि खुद्द अमेरिकेत करण्यात आले आहे. खाद्यपदार्थांच्या बाबतीत 'अमेरिकन संस्कृती' पसरविणारी म्हणून ही कंपनी ओळखली जाते. *(डाऊन टू अर्थ)*

(पान क्र. २ वरून)
या संदर्भात दुसरे एक संशोधक डॉ. प्रभाकर मांडे यांच्या साहित्याकडे लक्ष वेधण्याची संधी घेतो.

अभिजन संस्कृती (Elite Culture किंवा Great Tradition) आणि जनसामान्यांची संस्कृती (Folk culture किंवा Little Tradition) यांच्या परस्परसंबंधांच्या दृष्टीनेही वरील विषयाचे अगत्य आहे. 'कारे बदरा...' या लेखात संस्कृत गीतांचा उल्लेख आहे आणि ढेरे यांच्या लेखातही संस्कृत पोथ्यांचा उल्लेख आहे. ही संस्कृत भाषा आली कुठून ? 'जोशी' नावाच्या या भटक्या जमाती म्हणजे पतित आणि वाळीत टाकलेले ब्राह्मण तर नव्हेत ? या विषयावरही श्री. मांडे यांचे संशोधन आहे असे आठवते, त्याकडेही लक्ष वेधतो.

**डॉ. स. ह. देशपांडे, पुणे.**

'औद्योगिक चीनचे जागतिक आव्हान' व 'जगाच्या पाठीवर' (विज्ञान) हे लेख विशेष आवडले. तसे सर्वच लेख आवडतात. खगोलविज्ञानावर व चीनसंबंधी आणखी लेख असल्यासही आवडतील.

**महेंद्र परदेशी, ठाणे.**

सप्टेंबर-ऑक्टोबरचा अंक मिळाला. अंकाचे सर्वांगीण स्वरूप खूपच कौतुकास्पद वाटले. 'भारतातील पाऊस' या लेखामुळे आपल्या नैसर्गिक साधन-सामग्रीचे सम्यक आकलन झाले. 'चीनचे आव्हान' हा लेख उद्बोधक व माहितीपूर्ण वाटला. आपल्या आर्थिक प्रश्नांची उकल लोकशाही नियोजनाने मार्गी लागत नसावी, असे वाटते.

**जे. जे. जोशी, पुणे**

अर्थबोधपत्रिकेचे अंक अतिशय वाचनीय असून अंतर्मुख करतात.

**बी. एच. कुलकर्णी, सांगोला, सोलापूर**


## संस्कृती विशेषांकासाठी त्वरा करा !

अर्थबोधपत्रिकेची वार्षिक (५०रुपये) अथवा द्वैवार्षिक वर्गणी (१००रुपये) ३१ डिसेंबर २००२ पूर्वी पाठविणाऱ्या वाचकांना, हा नोव्हेंबर-डिसेंबर २००२चा 'संस्कृती विशेषांक' (किंमत वीस रुपये) त्यांच्या वर्गणीतच मिळणार आहे. त्यामुळे वाचकांनी स्वत:ची व इतरांची वर्गणी लवकर भरावी. अंकाच्या मोजक्याच प्रती शिल्लक.

# संस्कृती व भारत

भारत व भारतातील संस्कृती याविषयी देशविदेशात अतिशय विस्तृत साहित्य उपलब्ध आहे. भारतीय संस्कृतीने सुरूवातीपासूनच अनेक मतमतांतरांचा विचार केल्याने, तत्संबंधीच्या अभ्यासांमध्येही अनेक प्रकारची मते अस्तित्वात आहेत. सर्व वादविवादांना टाळून, भारतातील संस्कृतीचे एक प्रमुख अंग असलेल्या संकल्पनेचा, म्हणजे, 'व्यक्तीच्या आत्मिक विकासा'चा व नीतीशास्त्राचा विचार, येथे करण्यात आला आहे. नीतीशास्त्र म्हणजे कर्माकर्मविवेक होय. नीतीशास्त्र हे वर्तनशास्त्र ठरते. भारतात प्राचीन काळी 'नीती ' या अर्थी, 'धर्म ' हाच शब्द वापरीत असत. (तेव्हा कोठे गेला होता राधासुता तुझा धर्म ? इ.) आज ज्याला आपण नीतीशास्त्र म्हणतो त्याला पूर्वी धर्मशास्त्र म्हणत. हे धर्मशास्त्र म्हणजे त्याकाळचे समाजशास्त्रच होते.

**धर्म म्हणजे आचारधर्म**

व्यक्तीचा आत्मिक विकास हा योग्य आचार-विचारांनी होतो, अशी भारतीय संस्कृतीची धारणा आहे. आचार (behaviour) म्हणजे 'वागण्याची योग्य पद्धत' असा अर्थ अभिप्रेत आहे. आचाराचे म्हणजेच वागणुकीचे, सदाचार (योग्य किंवा चांगले) व कदाचार (निंद्य किंवा अयोग्य आचार) असे दोन भाग पडतात. 'आचार हा सर्वांचा श्रेष्ठ धर्म होय,' व 'धर्माचे लक्षण आचार आहे,' असे म्हटले गेले आहे. अर्थात आचार याचा अर्थ सदाचार असाच सर्वत्र घेतला जातो, हे लक्षात ठेवले पाहिजे.

'धर्म ' या शब्दाबाबतही काही स्पष्टीकरण येथे होणे सयुक्तिक ठरेल. धर्माच्या निरनिराळ्या अंगोपांगांचा विचार करून धर्म शब्दाच्या अनेक व्याख्या भिन्न भिन्न ग्रंथात आढळतात. तथापि 'प्रजेचे धारण करतो तो धर्म ' अशी धर्माची सामान्य व्याख्या आहे. ही वागणुकीच्या, नीतीच्या अर्थाने आहे. या धर्माचे पालन सदाचाराचे नियम पाळूनच केले पाहिजे. कारण, धर्म हा आचाराधीन असून सदाचार आणि आत्मतुष्टी यांना धर्माचे लक्षण मानले आहे. (आत्मतुष्टी याचा अर्थ, 'सज्जनांना ज्या ठिकाणी संशय उत्पन्न होईल व जिथे दुसरे कोणतेही प्रमाण मिळणार नाही, तिथे स्वतःच्या अंतःकरणाला जे योग्य वाटेल, त्याचेच आचरण सज्जन करीत असतात,' असा आहे. सज्जन कोण याचेही काही निकष आहेत.)

धर्म हा व्यक्ती, समाज व राष्ट्र यांना व्यापून राहणारा आहे. धर्माबरोबरच आचार हाही सर्व ठिकाणी दाखल होतो. सदाचार हा, तो धर्म आचरण करणाऱ्या व्यक्तीच्या उन्नतीस व समाजाच्याही उन्नतीस हातभार लावतो, म्हणून तो प्रशंसनीय ठरतो.

सदाचार किंवा शिष्टाचार (म्हणजे सज्जन लोक सामान्यपणे पाळतात तो आचार) हे धर्माचे एक प्रमाण मानले गेल्यामुळे, भारतीय संस्कृती व त्या अनुषंगाने हिंदू धर्म किंवा सनातन धर्म हा सर्वसंग्राहक ठरला आहे. भारतात अनेक पंथोपपंथ निर्माण झाले आणि त्या सर्वांचा 'धर्मा 'त समावेश होऊ शकला तो यामुळेच. शिष्टाचार किंवा आत्मतुष्टी हे परंपरेने, रूढीने चालत आलेले असतात, ते निरनिराळ्या कालखंडात निरनिराळ्या व्यक्तींनी संमत केलेले असतात, ते युगपरत्वे भिन्न असतात. त्यामुळे भारतीय संस्कृती व धर्म हाही परिवर्तनीय आहे. वेदप्रामाण्य हा भारतीय संस्कृतीचा महत्त्वाचा भाग असला तरी, तो न मानणाऱ्यांचीही अनेक तत्त्वे, भारतीय संस्कृतीने शिष्टाचारामुळे स्वीकारली आहेत.

व्यक्तीच्या आत्मिक विकासासाठी आचार हे महत्त्वाचे ठरल्याने भारतीय संस्कृतीत कित्येक शतकांपूर्वी आचारांवर भर देण्यात आला. व्यक्तीचा आत्मिक विकास म्हणजे, त्याच्या बुद्धीचा विकास आणि बुद्धीचा विकास म्हणजे अंतःकरणाचा किंवा विचारांचा विकास होय, अशी साखळी मानली गेली. जीवनाचे सार जाणून घेण्यासाठी बुद्धी आवश्यक आहे; आणि भारतीय संस्कृतीने मोक्ष हे जीवनाचे सार मानल्याने मोक्ष मिळविण्यासाठी बुद्धी महत्त्वाची ठरली. 'मोक्ष म्हणजे जीवनाचे स्वरूप व तत्त्वज्ञान समजून घेऊन, ज्या वैश्विक शक्तीमुळे या निसर्गाचा, चराचरसृष्टीचा जन्म झाला, तिच्याशी एकरूप होणे होय.' खरे तर जीवनातील सर्व प्रकारची कर्तव्ये योग्य रीतीने पार पाडून मग मोक्ष मिळविणे याला पूर्वी महत्त्व होते. धर्म, अर्थ, काम व मोक्ष असा हा चार टप्प्यांवरील प्रवास आहे.

या मोक्षाच्या प्रवासात, ही बुद्धी तीन प्रकारची मानली गेली आहे; सात्त्विक, राजसी व तामसी. जीवनातील सर्व प्रकारचे नैतिक ज्ञान, कार्य-अकार्य, बंध-मोक्ष, भय-अभय हे ज्या बुद्धीला कळतात, ती सात्त्विक बुद्धी होय. वरील सर्वांचे ज्ञान योग्य रीतीने न जाणणारी ती राजस बुद्धी होय. आणि वाईट आचारांना, गोष्टींना म्हणजे अधर्मालाच योग्य समजते, ती तामसी बुद्धी होय. मानवी जीवनाचा प्रवास हा सात्त्विक बुद्धीकडे म्हणजे ज्ञानाकडे व्हावा,

असेच अपेक्षित आहे. सात्त्विक बुद्धी मिळविण्यासाठी बुद्धीच्या सात गुणांना आत्मसात करणे आवश्यक आहे. शुश्रूषा, श्रवण, ग्रहण, धारण, ऊहापोह, अर्थविज्ञान व तत्त्वज्ञान असे बुद्धीचे गुण आहेत. तर प्रमाण, विपर्यय, विकल्प, निद्रा व स्मृती या बुद्धीच्या पाच वृत्ती आहेत.

शोक, क्रोध, लोभ, काम, मोह, ईर्ष्या, मान, विचिकित्सा, कृपा, असूया, जुगुप्सा व बारासुता हे बारा, मनांचे मल असून, ते बुद्धीचा नाश करणारे आहेत. म्हणजे सर्व प्रकारचे वाईट किंवा अधर्मी विचार हे बुद्धीविकासाला अडथळा निर्माण करतात, म्हणून त्यांपासून दूर राहावे असे अपेक्षित आहे.

## आचारधर्मांची पिछेहाट

बुद्धीच्या विकासाला प्राधान्य देणाऱ्या भारतीय संस्कृतीतील हे आचारधर्म कालौघात मागे पडले आणि अनावश्यक कर्मकांड, चालीरीती, जातीभेद, मतभेद यांमुळे येथील समाजव्यवस्था खिळखिळी झाली. मग पुन्हा एकदा 'आचारांना' धर्म मानणाऱ्या बौद्ध धर्माची स्थापना येथे झाली. सम्राट अशोक व सम्राट हर्षवर्धन आणि इतर काही राजांच्या काळात येथे बौद्ध धर्माचा वटवृक्ष फोफावला. पण इस्लामच्या आक्रमणांमुळे आणि कर्मठ हिंदूंनी आचारधर्म हा कर्मकांडाशी जोडल्याने, मूळ धर्म हा, नीती किंवा वागणूक या अर्थाने मागे पडला. मग धर्म म्हणजे उपासनापद्धती व कर्मकांड असा त्याचा अर्थ झाला; आणि कर्मकांडाच्या मार्गाने मोक्ष मिळविण्याची धडपड हा समाज करू लागला. त्यानंतर इंग्रजांनी भारतावर सुमारे दीडशे वर्षे राज्य केले. त्यामुळे इंग्रजी भाषेतील 'रिलिजन' (म्हणजे उपासनापद्धती या अर्थाने) हा शब्द धर्मासाठी वापरण्यात येऊ लागला. त्यामुळे धर्म म्हणजे आचारधर्म वा जीवनव्यवहार की उपासनापद्धती की दोन्ही, असा वाद आजही भारतात चालू आहे.

भारतातील सामाजिक जीवनात मूळच्या आचारधर्मांची पिछेहाट झालेली दिसते. धर्माने वागणे किंवा धार्मिक असणे याचा अर्थ देवदेवतांची उपासना करणे व कर्मकांड करणे, अशा अर्थाने घेतला गेल्याने समाजातील एक गट त्या बाजूला वळला. मग या धार्मिकतेत सामाजिक विषमता, स्त्रियांचे दुय्यम स्थान, अन्याय करणाऱ्या चालीरीती अशा अनेक बाबींचा प्रवेश झाला. तर दुसरीकडे या प्रवृत्तींना विरोध करण्याकरिता धार्मिकताच नाकारणाराही एक गट उभा राहिला. पण दोन्ही गटांनी मूळच्या आचारधर्माकडे लक्ष दिलेले दिसत नाही. दरम्यान अनेक समाजसुधारकांनी धर्मातील अनिष्ट बाबींना विरोध करून सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. भारतात अशा सर्व घडामोडी घडत

असतानाच, जागतिक पातळीवर मात्र भारतीय संस्कृतीतील आचारधर्म व आध्यात्मिकता यांना, विसाव्या शतकाअखेरीस महत्त्व मिळत असलेले दिसते. पाश्चात्य संस्कृतीत भोगवादाला व व्यक्तिवादाला महत्त्व देण्यात आले. पण सर्व भौतिक सुखे मिळूनही माणसे सुखी नसतात, असे त्यांना आढळले आणि मग पाश्चात्यांना भारतीय संस्कृतीतील मानसिक शांती देणारे वागणुकीचे तत्त्वज्ञान समजून घेणे गरजेचे वाटू लागले.

## आचारधर्म व व्यक्तीचा विकास

आचारधर्म मानणाऱ्या भारतीय संस्कृतीने प्रत्येक व्यक्तीचा आत्मिक विकास हा चार टप्प्यांमध्ये होऊ शकतो असे म्हटले आहे. शारीरिक विकास, मानसिक विकास, नैतिक विकास व आध्यात्मिक विकास असे हे चार टप्पे होत. व्यक्ती, कुटुंब, समाज आणि समष्टी (सभोवतालचे विश्व) यांच्यात राहून हा विकास योग्य रीतीने होऊ शकतो, असेही म्हणण्यात आले आहे.

शारीरिक विकास - व्यक्तीची वागणूक नीट होण्यासाठी तिचे शरीर व मन यांची निरोगी वाढ होणे, हा पहिला टप्पा आहे. यासाठी योग्य आहार-विहाराची गरज आहे. आयुर्वेदाने व योगशास्त्राने याविषयीचा विचार केला आहे. 'शरीरमाद्यम् खलू धर्म साधनम्' असे या संस्कृतीने म्हटले आहे. मानसिक विकास - केवळ खाऊन किंवा शरीर नीट ठेवून मनुष्य जगू शकत नाही. त्याच्या मनाचा विकास हाही तेवढाच महत्त्वाचा आहे. मनाच्या विकासासाठी ज्ञान मिळविण्याची गरज आहे. शिकण्याचे महत्त्व येथे आहे. 'सा विद्या या विमुक्तये', किंवा 'विद्याविहीना पशु:' असे म्हणण्यात आले आहे. शिकणे, वाचन करणे, विचारशक्ती वाढविणे आणि विविध प्रकारची कौशल्ये शिकणे, विज्ञान-कला-साहित्य यांची जोपासना करणे, समाजात ज्ञान पसरविणे याला संस्कृतीने महत्त्व दिले आहे.

आर्थिक व नैतिक विकास - मिळविलेल्या ज्ञानाचा व्यक्तीने आपल्यासाठी व समाजासाठी उपयोग करावा, याकरिता काही मूल्यांची आखणी करण्यात आली. ज्ञानाचा, कौशल्यांचा उपयोग अर्थार्जनासाठी करून कुटुंबव्यवस्था टिकवून व पुढची पिढी वाढवून आर्थिक, नैतिक व सामाजिक विकास करावा असे अपेक्षित आहे. आध्यात्मिक विकास - आचारधर्म हे नीट का पाळायचे याची कारणमीमांसा अध्यात्माने केली आहे. चांगले का वागायचे ? दुसऱ्याचे शोषण का करायचे नाही ? मानसिक समाधान म्हणजे काय ? व्यक्तीचा विश्वरचनेशी कसा संबंध आहे ? हा विचार समजून कृती करणे म्हणजे आध्यात्मिक विकास होय. *(संदर्भ - संस्कृतिकोश व इंटरनेट )*

⌘ ⌘

# मध्य महाराष्ट्रातील व मराठवाड्यातील पाऊस

*(अर्थबोधपत्रिकेच्या मागील अंकात, नीळकंठ रथ यांचा, 'भारतातील पाऊस' असा लेख दिला होता. त्याचाच पुढील भाग या अंकात देत आहोत. - संपादक)*

## मध्य महाराष्ट्रातील पाऊस

द्वीर्घ कालातील (१८७१ ते २०००) मध्य महाराष्ट्रातील खरीप (जून ते सप्टेंबर) पावसाची सरासरी ५७२.९ मी.मी. ही भारतीय सरासरीपेक्षा (८५१.२ मी.मी) कमी आहे यात आश्चर्य काहीच नाही. कारण, शेती-हवामानविषयक वापरल्या जाणाऱ्या 'कोरडा' या संज्ञेनुसार हा कोरडा प्रदेश आहे. या १३० वर्षांपैकी ६६ वर्षात खरीपातील पाऊस या सरासरीपेक्षाही कमी होता; तर उरलेल्या ६४ वर्षांत तो सरासरीपेक्षा जास्त झाला.

याबाबतीत एक आश्चर्य करावी अशी घटना म्हणजे, सगळ्यात जास्त पाऊस पडलेली अर्धी वर्षे ही शंभर वर्षांपूर्वीचीच आहेत. उदाहरणार्थ, सरासरीपेक्षा टक्केवारीने खूप पाऊस पडलेली शतकापूर्वीची ही वर्षे पुढीलप्रमाणे आहेत : १८७५ (३३%), १८७८ (६२.६%), १८८२ (४४.१%), १८८३ (४७%), १८९२ (३२.३%), १९१४ (४७.१%), १९३३ (३२.५%), १९३८ (३०.५%), १९६१ (३५.१%), १९८८ (३१.८%), जास्त पावसाच्या दहा वर्षांपैकी फक्त दोन वर्षे ही शेवटच्या चार दशकांतील आहेत.

याउलट, अत्यल्प पावसाची वर्षे बहुतांशी गेल्या शंभर वर्षांतली आहेत. उदाहरणार्थ, १८७१ (३२.९%), १८९९ (५५.४%), १९०४ (३२.९%), १९०५ (३१.५%), १९११ (३७.७%), १९१८ (६३.६%), १९२० (३०.३%), १९२२ (३०.४%), १९३६ (३०.४%), १९५१ (३२.६%), १९७२ (४१.१%), १९८५ (३८.६%). यातही अत्यल्प पावसाची शेवटची तीन वर्षे ही गेल्या चार दशकातीलच आहेत.

आणखी एक गंमतीदार घटना अशी की, अगदी १८७१ पासूनचा म्हणजे १३० वर्षांतला आढावा घेतला तर असे दिसून येते की, प्रत्येक दशकामध्ये, एकूण खरीप पाऊस सरासरीपेक्षा कमी आढळला तो ४,५ किंवा ६ वर्षे आणि सरासरीपेक्षा जास्त पाऊस आढळला तो ६,५, किंवा ४ वर्षे.

पुढील तक्ता (क्रमांक १) पाहावा. हा असा अनुभव इतर हवामानपट्ट्यांमध्ये मात्र आढळला नाही. सर्वसाधारण पावसाच्या संदर्भात पाहता १३० वर्षांपैकी, ७७ वर्षांमध्ये (म्हणजे, सुमारे साठ टक्के वर्षांमध्ये) एकूण पाऊस हा प्रमाणापेक्षा जास्त किंवा कमी होता. ही टक्केवारी देशातील इतर कुठल्या प्रदेशापेक्षा जास्त आहे. अर्थात, मध्य महाराष्ट्र हा कमी पावसाचा प्रदेश असल्यामुळे हे साहजिकच मानता येईल. असे एकही दशक नाही की जेव्हा, खरीप पाऊस सर्वसाधारण (प्रमाण) पावसापेक्षा एखादे वर्ष तरी कमी नाही, कमी पावसाची वर्षे मात्र वेगवेगळ्या दशकात संख्येने वेगवेगळी आहेत. ती १ ते ५ वर्षांच्या दरम्यान आहेत. म्हणजे, पावसातील मोठे चढउतार हेच मध्य महाराष्ट्राचे वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल. खरोखरच, असे एकही दशक

**तक्ता क्रमांक १**

| कालावधी | सरासरीच्या | | प्रमाणाच्या | |
|---|---|---|---|---|
| | खाली | वर | खाली | वर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १८७१-१८८० | ४ | ६ | ३ | ४ |
| १८८१-१८९० | ६ | ४ | २ | ३ |
| १८९१-१९०० | ५ | ५ | १ | १ |
| १९०१-१९१० | ५ | ५ | ३ | ४ |
| १९११-१९२० | ५ | ५ | ५ | ३ |
| १९२१-१९३० | ६ | ४ | ४ | ० |
| १९३१-१९४० | ५ | ५ | ३ | ३ |
| १९४१-१९५० | ५ | ५ | २ | ३ |
| १९५१-१९६० | ५ | ५ | २ | ४ |
| १९६१-१९७० | ४ | ६ | १ | ३ |
| १९७१-१९८० | ५ | ५ | ३ | ४ |
| १९८१-१९९० | ५ | ५ | ५ | ४ |
| १९९१-२००० | ६ | ४ | २ | ३ |

आढळून येत नाही की जेव्हा, पावसाचे प्रमाण लागोपाठ पाच वर्षे सरासरीपेक्षा कमी किंवा जास्त आहे.

या वर्षी (२००२) जुलै महिन्यातील पावसाची गैरहजेरी फार मोठी काळजी करायला लावणारी ठरली; पण आपण मध्य महाराष्ट्रातील पावसाच्या इतिहासात आणखी जरा डोकावू या. सबंध मागील १३० वर्षांच्या कालावधीत या भागाची, जुलै महिन्यातील पावसाची सरासरी १८२.८ मी.मी. इतकी होती. या सरासरीपेक्षा ३० टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस जुलै महिन्यात झाल्याची उदाहरणे २२ वर्षांची आहेत. त्यातही, आश्चर्याची गोष्ट अशी की १९८५ नंतरच्या सोळा वर्षांमध्ये अशी कमी पावसाची पाच वर्षे आढळतात. या सर्व वर्षी पावसाची सरासरी ३० टक्क्यांपेक्षाही कमी भरली. ही वर्षे म्हणजे, १९८५, १९८६, १९८७, १९९२ व २००० अशी आहेत. त्यातही १९८६ साली सरासरीच्या

**तक्ता क्रमांक २**

| कालावधी | सरासरीच्या | | प्रमाणाच्या | |
|---|---|---|---|---|
| | खाली | वर | खाली | वर |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १८७१-१८८० | ३ | ७ | ३ | ६ |
| १८८१-१८९० | ४ | ६ | ३ | ५ |
| १८९१-१९०० | ५ | ५ | ४ | ४ |
| १९०१-१९१० | ५ | ५ | ४ | ३ |
| १९११-१९२० | ६ | ४ | ६ | ३ |
| १९२१-१९३० | ९ | १ | ७ | ० |
| १९३१-१९४० | ३ | ७ | ३ | ४ |
| १९४१-१९५० | ६ | ४ | ४ | २ |
| १९५१-१९६० | ३ | ७ | ३ | ५ |
| १९६१-१९७० | ५ | ५ | ३ | १ |
| १९७१-१९८० | ६ | ४ | ५ | २ |
| १९८१-१९९० | ५ | ५ | ५ | ४ |
| १९९१-२००० | ६ | ४ | ६ | ३ |

५५टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस जुलै महिन्यात झाला. मात्र त्याच वर्षी एकूण खरीप पाऊस फक्त १८टक्क्यांनी कमी झाला. यांपैकी १९८५ हे वर्ष मात्र सर्वात कमी पावसाचे झाले. १९९२ व २००० ही वर्षे मात्र अशी होती की ज्यावेळी जुलैतील पावसाची सरासरी ३० टक्क्यांपेक्षा कमी असूनही, एकूण हंगामातील पाऊस मात्र साधारणपणे प्रमाणातच होता. त्यामुळे केवळ जुलैमधील पावसावरून संपूर्ण हंगामातील पावसाचे निदान करणे तितकेसे बरोबर ठरणार नाही.

## मराठवाड्यातील पाऊस

मराठवाड्यातील खरीप पावसाची सरासरी मात्र एकूण मध्य महाराष्ट्राच्या पावसाच्या सरासरीपेक्षा, १३० वर्षांच्या या दीर्घकालात जास्त आहे, (६९२ मी.मी.). यांपैकी सुमारे निम्म्या वर्षांत (६४ वर्षे) पाऊस सरासरीपेक्षा जास्त आणि निम्म्या वर्षात (६६ वर्षे) सरासरीपेक्षा कमी पडला. सरासरीपेक्षा कमी पावसाच्या वर्षांपैकी बहुतेक वर्षांत (६६पैकी ५६वर्षांत) तो प्रमाणापेक्षाही (सरासरीच्या १० टक्क्यांपर्यंत खाली) कमी झाला. मध्य महाराष्ट्रापेक्षा हे चित्र जरा वेगळे आहे. (कारण, मध्य महाराष्ट्रात सह्याद्री पर्वताच्या रांगांमधील पूर्वेकडील जास्त किंवा स्थिर पावसाचे प्रदेशही समाविष्ट झालेले आहेत.)

मराठवाड्यात प्रमाणापेक्षा जास्त पाऊस मात्र ४२ वर्षांमध्ये पडला. (मागील पान क्रमांक ४९ वरील तक्ता क्रमांक २ पाहा.) या तक्त्यावरून असे दिसून येईल की, सरासरीपेक्षा किंवा प्रमाणापेक्षा कमी वा जास्त पाऊस पडणाऱ्या वर्षांमध्ये फरक खूपच आहेत. हे पुन्हा, मध्य महाराष्ट्राच्या चित्रापेक्षा वेगळे चित्र आहे. १९१८ ते १९२७ या दहा वर्षांत पाऊस सरासरीपेक्षा नेहमीच कमी झाला. तसेच १९९१ ते १९९५ ही पाच वर्षे सतत कमी पावसाची होती. तर, १९३१ ते १९३५ ही सलग वर्षे सरासरीपेक्षा जास्त पावसाची गेली; अशीच १९५३ ते १९५९ हीही वर्षे सलगतेने जास्त पावसाची होती. मराठवाड्यातील अत्यल्प (म्हणजे सरासरीच्या ४० टक्क्यांपेक्षाही कमी) पावसाची वर्षे होती, १८७१, १८९९, १९१८, १९२०, १९७२ आणि १९८४. परिणामतः ही सर्वच वर्षे मराठवाड्यातील अत्यल्प शेती उत्पादनाची होती. जास्त पावसाची (म्हणजे सरासरीपेक्षा ४० टक्क्यांहूनही अधिक) वर्षे होती : १८७२, १८८३, १८९२, १९१०, १९१६, १९५५, १९८३, १९८८, १९८९. यापैकी शेवटची तीन वर्षे शेतमाल उत्पादनाची चांगली वर्षे होती.

आता, आपण, मराठवाड्यातील जुलैमधील पावसाकडे जरा नजर

टाकू. सबंध १३० वर्षांच्या कालावधीमधील जुलैच्या पावसाची सरासरी होती १८२.४ मी.मी. इतकी. जुलैत याच्या पन्नास टक्क्यांपेक्षाही कमी पावसाची वर्षे होती ती, १८७१(६१%), १८७७(६४%), १८९९ (८७%), १९०५ (५०%), १९१८ (६४%), १९२० (६९%), १९३० (७१%), १९३६ (५४%), १९७१ (३५%), १९७२ (७१%) आणि १९९४ (५३%) ही होय. अर्थातच, हीच वर्षे अल्प शेतीउत्पादनाचीही होती.

## एकूण पाऊस व शेतमाल उत्पादन

पाऊस कमी आहे किंवा जास्त आहे यावरच पीकपाण्याची परिस्थिती अवलंबून नसते हे उघडच आहे. म्हणून तर समर्थ रामदासांनी म्हटले आहे.


*बहू कष्टलों पावलों जी स्वदेशा*
*प्रजा बोलती कौल दे राघवेशा*
*भुमीनें कदा पीक सांडू नये रे*
*वदे राम लक्ष्मणा हें लिही रे ।।१५।।*
***मनासारिखी मेघवृष्टी न व्हावी***
***जया पाहिजे ते प्रसंगी पडावी***
*समर्था प्रभू रोगराई नको रे*
*वदे राम लक्ष्मणा हें लिही रे ।।१६।।*
*पिकें देखतां सर्व चिन्ता निवाली*
*असावी गृही संग्रही पेंवपालीं*
*बिजें बीज कोणाशि मागू नये रे*
*वदे राम लक्ष्मणा हें लिही रे ।।१७।।*
*("कौल" : समर्थ रामदास)*

हेही तितकेच खरे आहे, की सबंध हंगामात पाऊस फारच कमी पडला तर तो बियाणे रुजायच्या आणि ती वाढीच्या काळातही अपुराच पडलेला असणार. पण, अशी काही अपवादात्मक परिस्थिती सोडली तर मग, एकूण पावसाच्या आकडेवारी वरून शेती उत्पादनाबाबत निश्चित ठोकताळे मांडता येत नाहीत. पुढे दोन आलेख दिले आहेत. (पान क्रमांक ५२ वर पाहावे) त्यात खरीपाच्या पावसाची दीर्घकालीन सरासरीपासूनची दूरता (deviations) दर्शविली आहे. या भागातील मुख्य पीक खरीप ज्वारीचे आहे. या ज्वारी पिकाच्या बाबतीत, दरवर्षीच्या दर हेक्टरी उत्पादनात पडणारा फरक याठिकाणी नोंदविला आहे. १९६० ते १९९३ अशी ३४ वर्षे यासाठी (अक्ष अक्षावर) घेतली आहेत. पडणारा फरक टक्केवारीने, जास्त वा कमी, असा (अय अक्षावर) दर्शविला आहे. याची तुलना करण्यासाठी पिकाच्या बरोबरीने खरीपाच्या पावसातील फरकाचाही वक्र काढला आहे. आलेखावरून असे दिसून येईल की, खरीप ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन हे पावसाच्या फरकाच्या दिशेनेच, काही वेळा गेले आहे. परंतु हे नेहमीच घडलेले नाही. मध्य महाराष्ट्रात पाऊस आणि खरीप ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन हे एकमेकांच्या विरोधी दिशेने गेले आहे अशी वर्षे आहेत, १९६२, १९६७,


१९६९, १९७०, १९७३, १९७७, १९७८, १९८७, १९९० आणि १९९२ ही. मराठवाड्यात अशीच विसंगतीची वर्षे आहेत १९६०, १९६५, १९६६, १९६७, १९६८, १९७०, १९७३, १९८७, १९९२ नि १९९३ ही.

या विसंगतीची कारणे शोधणे फारसे कठीण नाही. एकतर, पावसाची आकडेवारी ही मोठ्या थोरल्या प्रदेशाची एकत्रित केलेली असल्यामुळे त्यात भिन्नता आढळणारच. दुसरे असे की, शेतीच्या उत्पादनाची परिस्थिती विशिष्ट वेळातील पावसावर अवलंबून असते. हंगामातील एकूण पावसावर नाही. त्यामुळे पिकांवर एकूण पावसाच्या होणाऱ्या परिणामाबद्दल कोणी ठामपणे सांगत असेल, तर ते चुकीचे ठरेल. म्हणूनच रामाने लक्ष्मणाला हा बारकावा लक्षात घ्यायला सांगितला आहे.

## आलेख




खरीप - मध्य महाराष्ट्रातील ज्वारी




खरीप - मराठवाड्यातील ज्वारी

# जगाच्या पाठीवर....(संस्कृती)

संस्कृतीचा विचार यापूर्वीही बऱ्याच प्रमाणात केला गेला आहे आणि आजही अनेक देशांमधील विचारवंत याबद्दल सातत्याने विचार करीत आहेत. जगाच्या पाठीवरील हे सर्व जुने-नवे विचार आपल्यापर्यंत पोचविणाऱ्या, काही महत्त्वाच्या पुस्तकांतील निवडक विचार, या सदरात मांडण्यात आले आहेत.

## 'संस्कृतीचा मोठा घटक 'धर्म'

**'ॲन इंटलिजन्ट पर्सन्स गाईड टू मॉडर्न कल्चर'** या पुस्तकाचे लेखक आहेत **रॉजर स्क्रटन.** धर्म हा 'संस्कृतीचा एक मोठा घटक असून, धर्माच्या अस्तित्वाशिवाय संस्कृतीला काहीच महत्त्व नाही. तसेच कोणत्याही समाजाच्या चांगल्या कालखंडात, धर्म व संस्कृती या दोन गोष्टी नेहमी परस्परसहकार्याने, परस्परसामंजस्याने कार्य करताना दिसतात,' असे मत या लेखकाने मांडले आहे. संस्कृतीमध्येही त्यांनी, 'सामान्य संस्कृती' व 'उच्च संस्कृती' असे दोन प्रमुख भाग पाडले आहेत. समाजातील सर्वसाधारण व्यक्ती वा समूहाचे आचार-विचार, परंपरा इ. म्हणजे सामान्य संस्कृती आणि काही मर्यादित घटकांपर्यंत पोचलेले अभिजात साहित्य-कला, विचार, इ. बाबी या उच्च संस्कृतीत मोडतात. सामान्य संस्कृती ही, बाह्य आघात फार काळ सहन करू न शकणारी अशी असते, त्यामुळे जाहिराती व इतर काही मार्गांनी ती मोडणे वा बदलणे सोपे जाते. ज्यावेळी सामान्य संस्कृती मोडीत निघायची वेळ येते तेव्हा, उच्च संस्कृती तिच्या मदतीला धावून येते, असे त्यांना वाटते.

कोणत्याही समाजासाठी संस्कृती ही फार महत्त्वाची गोष्ट असून, तिच्यापासून दूर पळण्यापेक्षा तिच्या आधारे पुढे जाणे, हे स्क्रटन यांना गरजेचे वाटते. संस्कृतीच्या ऐवजी असलेले इतर पर्याय त्यांना तुलनेने महत्त्वाचे वाटत नाहीत. तसेच बहुतेक प्रसंगी समाजातील बुद्धिवादी गट हा सामान्य संस्कृतीचा पाठीराखा नसतो, उलट तो आपल्याला अडचणीची वाटलेली सामान्य संस्कृती दूर सारून पुढे जातो, अशी काही मते स्क्रटन यांनी या पुस्तकातून मांडली आहेत. हे पुस्तक म्हणजे बौद्धिक मेजवानी असून, क्रांतीकारकांचे विचार जसे गुपचूप पसरतात तसे, त्यातील विचार समाजात गुपचूप पसरावेत, असे मत काही वाचकांनी व्यक्त केले आहे.

## माणसाचे चारित्र्य व संस्कृती

'मानवी विकासप्रक्रियेत संस्कृतीचा सिंहाचा वाटा असून चारित्र्य घडविण्यात संस्कृती महत्त्वपूर्ण भूमिका बजावत असते,' असे मत **डफी हशेन्** या लेखिकेने व्यक्त केले आहे. **'बिल्डिंग कॅरेक्टर अँड कल्चर'** या पुस्तकात त्यांनी निसर्ग, परिसर, सांस्कृतिक पर्यावरण आणि त्याद्वारे होणारे मानवाचे सर्वांगीण पोषण यांतील परस्परसंबंधांचा उलगडा केला आहे. जागतिक पातळीवर मान्य झालेले विविध शास्त्रांचे ज्ञान आणि मूल्ये यांचा भक्कम पाया बाजूला ठेवून जर, मानवी विकास होऊ लागला तर, त्यातून धोके निर्माण होतील. हे धोकेही लेखिकाने स्पष्ट केले आहेत.

संस्कृतीचा निर्माता म्हणून आणि संस्कृतीमधीलच एक महत्त्वपूर्ण घटक म्हणून मानवाचे संस्कृतीत असलेले स्थान इथपासून ते मानवी बुद्धीने, आकलनाने विविध प्रकारचे ज्ञान जाणून घेऊन, त्याचा मानवाच्या व समाजाच्या वागणुकीवर, विकासप्रकियेवर होणारा परिणाम आणि यातील मानवाची अतिशय महत्त्वपूर्ण ठरणारी भूमिका, अशा मूलभूत प्रश्नांचा ऊहापोह लेखिकेने केला आहे. माणसाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्वांगीण विकासप्रक्रियेत, संस्कृती ही भरणपोषण करणारी एक अत्यावश्यक अनौपचारिक यंत्रणा आहे. यात कौटुंबिक, शालेय, समवयस्क गटाची आणि परिसरातील समाजाची, विविध प्रसारमाध्यमांद्वारे पसरणाऱ्या संस्कृती, या सर्वांचा समावेश होतो. या सर्वांचा संस्कृतीवर आणि व्यापक अर्थाने संस्कृतींचा या सर्वांवर परिणाम होत असतो. यातीलच सर्वात काळजीचा विषय आहे हिंसाचाराच्या संस्कृतीचा. संस्कृतीचा अतिशय चुकीचा अर्थ, विविध प्रसारमाध्यमांद्वारे पोचविला जात असून, त्याचे भयंकर परिणाम समाजाला भोगावे लागू शकतात, अशी भीतीही त्यांनी व्यक्त केली आहे. मात्र हे विचार निराशावादाकडे झुकणारे नसून त्यातून आशावादी मार्ग शोधण्याकडे वाटचाल व्हावी, असा लेखिकेचा प्रयत्न आहे.

## आधुनिक जगातील संस्कृतीची भूमिका

**'द फेटफूल क्वेश्चन ऑफ कल्चर'** असे एक अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक अमेरिकेतील येल विद्यापीठातील, इंग्रजी भाषा व साहित्य विभागाचे प्राध्यापक **जेफरी हर्टमन** यांनी लिहिले आहे. या पुस्तकाला काही पुरस्कारही मिळाले आहेत. संस्कृती या शब्दाची व्याख्या, संकल्पना, या संकल्पनेचे आधुनिक जगात असलेले महत्त्व अशा अनेक बाबींचा शोध या पुस्तकात लेखकाने घेतला आहे. संस्कृतीचे कार्य वा उद्दिष्ट हे समाजासमाजातील दुजाभाव

वा दूरता कमी करणे हे आहे. शेती करणाऱ्या समाजापासून औद्योगिक समाजाकडे होत गेलेली मानवसमाजाची वाटचाल ही, माणसाला काहीतरी हरवले असल्याची जाणीव निर्माण करते. वर्डस्वर्थसारख्या कवींनी शब्दांच्या माध्यमातून हे 'हरवलेपण' औद्योगिक काळातील नागरिकांना परत मिळवून दिले. संस्कृतींमधील तणाव कमी करण्यासाठी भाषा व साहित्य यांची मोलाची मदत होऊ शकते. कला, संस्कृती आणि राजकारण यांच्यातील समतोल संबंधांचा विचार करताना, साहित्य व संस्कृती हा केंद्रबिंदू ठरू शकतो, अशी मते लेखकाने मांडली आहेत.

कोणत्याही विचारधारेत, संस्कृती आणि राजकारण यांचे एकत्र येणे हे, हिताचे ठरू शकत नाही, असे लेखकाला वाटते. साहित्य हा एक अनुभव आहे, तो स्व-विकासाचा, शिकण्याचा एक मार्ग ठरू शकतो, मात्र त्याचा उपयोग विकासासाठी करायचा की राजकीयदृष्ट्या प्रतिक्रियात्मक वा विरोधी विचारधारेचा प्रसार करण्यासाठी करायचा, हे आपल्याला ठरवायचे आहे, असे ते म्हणतात. हर्टमन यांनी पाश्चिमात्य साहित्य, कला, प्रसारमाध्यमे आणि दैनंदिन जीवनातील बारकावे, या सर्वांचा साकल्याने विचार करून एक अभ्यासपूर्ण पुस्तक वाचकांसमोर आणले आहे.

## तंत्रज्ञानातील बदल व परंपरागत संस्कृती

**'ट्रॅडिशनल कल्चर्स : अँड द इम्पॅक्ट ऑफ टेक्नॉलॉजिकल चेंज'** हे पुस्तक अमेरिकेतील जॉर्ज फॉस्टर या लेखकाने १९६२मध्ये प्रसिद्ध केले. तंत्रज्ञानातील विकास व त्या विकासाच्या अनुषंगाने, विकसनशील देशांना विविध आंतरराष्ट्रीय संघटनांकडून करण्यात येणारी मदत आणि या सर्वांशी संबंधित असलेली विकसनशील राष्ट्रांमधील नागरिकांची सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक बाजू, याचा विचार फॉस्टर यांनी केला आहे. 'कल्चर' म्हणजे 'एखाद्या समाजगटाची परंपरेने चालत आलेली विशिष्ट जीवनपद्धती' अशी व्याख्या त्यांनी या पुस्तकात स्वीकारली आहे.

तंत्रज्ञानातील बदल वेगवेगळ्या संस्कृतींपर्यंत पोचविताना त्या विशिष्ट संस्कृतीची चांगली ओळख असणे आवश्यक आहे. हा मुद्दा स्पष्ट करताना फॉस्टर यांनी एक छोटेसे उदाहरण दिले आहे. औद्योगिकरणाच्या युगात एका मोठ्या कंपनीच्या उत्साही विक्रेत्याने शेतीसंबंधित काही अवजारे (नवतंत्रज्ञानयुक्त) दुसऱ्या देशात विकण्याचा प्रयत्न केला. तेथील काही शेतकऱ्यांनी शंका व्यक्त करीत का होईना, पण या वस्तू विकत घेतल्या. काही

दिवसांनी मात्र त्या शेतकऱ्यांनी या कंपनीच्या वस्तू टाकून आपली जुनीच अवजारे वापरण्यास सुरूवात केली. असे का व्हावे, हे त्या विक्रेत्याला काही कळेना. चौकशीअंती असे आढळले की, ही नवतंत्रज्ञानयुक्त अवजारे त्या भागातील मातीसाठी योग्य ठरली नाहीत. म्हणजे त्या भागातील शेतकरी सांस्कृतिकदृष्ट्या नवतंत्रज्ञानाच्या विरोधात नव्हते पण त्यांचा निर्णय हा योग्य, अनुभवातून घेतलेला आणि परिसरविज्ञानाच्या संस्कृतीचे परिमाण असलेला होता. तंत्रज्ञानातील बदल स्वीकारताना एखाद्या समाजाच्या संस्कृतीवर होणारे परिणाम कसकसे असू शकतात, कोणते बदल चटकन स्वीकारले जाऊ शकतात, तर कशा प्रकारच्या बदलांना विरोध होऊ शकतो, यासंबंधी सर्व गटांची मानसिकता कशी असते, इ. अनेक बाबींचा विचार या पुस्तकात करण्यात आला आहे. अर्थात, तंत्रज्ञानातील आताचे बदल पाहता हे पुस्तक जुने झाले आहे, तरी त्यातील मूलभूत बाबींचा ऊहापोह महत्त्वाचा आहे.

## अर्थव्यवस्था व संस्कृती

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत 'अर्थव्यवस्था व संस्कृती' हा विषय चर्चेत आहे. कोणत्याही देशातील व्यक्तीच्या वागणुकीवर प्रभाव पाडणारे दोन घटक म्हणजे संस्कृती व अर्थव्यवस्था होय, असा मध्यवर्ती विषय घेतलेले **'इकॉनॉमिक्स अँड कल्चर'** हे, प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ **डेव्हिड थॉस्बी** यांचे अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तक अलीकडेच प्रसिद्ध झाले आहे. अर्थव्यवस्थेचा व संस्कृतीचा काही परस्परसंबंध आहे का ? या संबंधांमुळे संस्कृतीचे अर्थव्यवस्थेवर काही परिणाम होऊ शकतात का ? संस्कृतीचे आर्थिक आयाम व अर्थशास्त्राचा सांस्कृतिक संदर्भ कोणता ? अशा प्रश्नांचा शोध त्यांनी घेतला आहे.

## संस्कृतींमध्ये संघर्ष

संस्कृतीची व्याख्या, इतिहास, भिन्न विचारसरणीमुळे इतिहासात झालेली युद्धे व त्यांचा संस्कृतीशी असलेला संबंध, काळानुरूप संस्कृतींना मिळत असलेले महत्त्व, विविध संस्कृतींमधील होत असलेले व होऊ शकणारे संघर्ष आणि संस्कृतींचे भवितव्य अशा अनेक परस्परसंबंधी घटनांचा वेध घेण्याचा प्रयत्न **'द क्लॅश ऑफ सिव्हिलायझेशन्स अँड द रिमेकिंग ऑफ वर्ल्ड ऑर्डर'** या पुस्तकात लेखक **सॅम्युअल हन्टिंग्टन** यांनी केला आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीत हे पुस्तक वादग्रस्त ठरले आहे.

*(या व याआधीच्या अर्थव्यवस्थेसंबंधीच्या पुस्तकावर यापूर्वी अर्थबोध-पत्रिकेत लेख प्रसिद्ध झाले आहेत - संपादक)*

# मानसिक आरोग्यसेवा व सांस्कृतिक गट

"जेव्हा मानसिक स्वास्थ्याचा विचार पुढे येतो, तेव्हा संस्कृतीचा घटक महत्त्वाचा ठरतो." असे अमेरिकेचे सर्जन जनरल डेव्हिड सॅचर यांनी आपले मत जाहीरपणे मांडले. २००१ साली झालेल्या सर्जन्सच्या वार्षिक अधिवेशनात त्यांनी आपला १९९९सालचा 'सर्जन जनरलचा अहवाल' मांडला. आकडेवारीच्या आधारे सॅचर यांनी असे दाखवून दिले की अमेरिकेत असलेल्या अल्पसंख्याकांना मिळणारी आवश्यक ती मानसिक स्वास्थसेवा आणि त्यांचा दर्जा हा बहुसंख्य गोऱ्यांपेक्षा कितीतरी कमी असतो.

डेव्हिड सॅचर यांनी या संदर्भात, 'संस्कृती'ची एक वेगळी व्याख्या केली आहे. त्यांच्या मते, मानसिक स्वास्थ्यावर परिणाम करणारे, रीतीरिवाज, श्रद्धा व मूल्ये या सगळ्यांना एकत्रितरीत्या संस्कृती म्हणता येईल. "कारण, मानसिक आजाराकडे समाज कसा पाहतो, त्याचे निदान कसे केले जाते, त्यासाठी स्वास्थ्यसेवा कशा पुरविल्या जातात, त्याला निधी कसा प्राप्त करून दिला जातो; तसेच रोगी आपली आजारचिन्हे कशी व्यक्त करतात आणि आपल्या कुटुंबातून व समाजातून ते त्या आजाराचा सामना कसा करतात, या सगळ्यांवर संस्कृतीचा प्रभाव पडत असतो."

आपल्या २००पानी अहवालात, त्यांनी अमेरिकेतील विशिष्ट वांशिक समुदायांचा, मानसिक स्वास्थसेवांच्या संदर्भात अभ्यास केला आहे. हे विशिष्ट गट म्हणजे, आफ्रिकन अमेरिकन्स, अमेरिकन इंडियन्स, अलास्कन नेटिव्ह्ज, एशियन अमेरिकन्स, पॅसिफिक आयलँडर्स आणि हिस्पॅनिक अमेरिकन्स होय.

अमेरिकेच्या लोकसंख्येत आफ्रिकन अमेरिकन्सची संख्या १२ टक्के आहे. त्यातील सुमारे बावीस टक्के लोक गरिबीत जगतात. अमेरिकेत आरोग्यविम्याची पद्धत सार्वत्रिक आहे. तरीही जेमतेम २५ टक्के अफ्रीकन अमेरिकनांना विमासंरक्षण आहे. मानसिक स्वास्थ्यसेवा केवळ एक तृतीयांश लोकांपर्यंत पोचली आहे. बेघर, निराधार मुले, कैदी आणि हिंसेला बळी

पडणाऱ्यांच्या अमेरिकनांमध्ये सुमारे ५० टक्के प्रमाण या लोकांचे आहे. परंतु, मानसिक स्वास्थ्यसेवांपर्यंत पोचणे, त्यांचा वापर करणे आणि त्यांचा दर्जा योग्य असणे या सर्वच बाबतींत, आफ्रिकन अमेरिकन लोकांना अडचणी असतात.

असाच दुसरा वांशिक गट आहे तो हिस्पॅनिक अमेरिकनांचा. हा अमेरिकेतील एक वाढता समुदाय आहे. यांतील ४० टक्के लोकांनाही इंग्रजी येत नाही आणि स्वास्थ्यसेवा पुरविणारांना या लोकांची स्पॅनिश भाषा येत नाही. त्यामुळे आवश्यक स्वास्थ्यसेवा त्यांच्यापर्यंत पोचण्यातच अडचणी येतात. साहजिकच ही मंडळी, इतर म्हणजे अल्पसंख्याक म्हणजे एशियन-अमेरिकन किंवा पॅसिफिक आयलँडर्सप्रमाणेच आपापपल्या समाजांतील 'फोक हिलर्स' वर अवलंबून राहतात.

अमेरिकेतील आणखी एक वाढता समाजगट म्हणजे एशियन अमेरिकन व पॅसिफिक आयलँडर्सचा. त्यांच्याबाबतीत, लज्जा किंवा नाव बद्दू होण्याची भीती यांमुळे त्यांच्यात मानसिक स्वास्थ्यसेवांचा वापर करण्याचे प्रमाण इतरांपेक्षाही फार कमी आहे.

अमेरिकेतील सर्वांत लहान वांशिक गट आहे तो केवळ एक टक्का असलेल्या अमेरिकन-इंडियन व अलास्कन नेटिव्ह्ज यांचा. मात्र यांचा प्रश्न वेगळ्याच अर्थाने गंभीर आहे, असे सॅचर यांचे म्हणणे आहे. या समाजात आत्महत्येचे प्रमाण राष्ट्रीय सरासरीच्या दीडपट आहे. त्यातही बहुसंख्य १८ ते २४ या वयोगटातील असतात. दारू नि मादक द्रव्यांच्या सेवनाचेही प्रमाण मोठे आहे. सुमारे २६ टक्के लोक गरिबीत जीवन कंठत आहेत. त्यामुळे एकूणच यांना मानसिक आरोग्यसेवेची मोठी गरज आहे आणि ती त्यांना मिळत नाही.

वेगवेगळ्या सांस्कृतिक गटांतील लोकांशी संपर्क साधून त्यांच्या मानसिक आरोग्याविषयीची अभ्यास करताना अनेक तृटी लक्षात आल्या आणि त्या भरून काढण्याबाबत आपण आणखी विलंब करू शकत नाही, असे सॅचर यांनी सांगितले. स्थानिक आरोग्य पुरविणाऱ्यांना, एकूणच समाजाला विश्वासात घेऊन या प्रकाराच्या आरोग्यसेवा पुरविल्या पाहिजेत असेही त्यांनी सांगितले.

आपल्या भाषणाच्या अखेरीस, डेव्हिड सॅचर यांनी, सर्वांना उभे राहायला सांगून आपल्याबरोबर त्यांनाही उच्चरवाने म्हणायला लावले, 'संस्कृती महत्त्वाची ! संस्कृती महत्त्वाची ! संस्कृती महत्त्वाची !'

## वाचकांच्या प्रतिक्रियांसाठी

कृपया प्रत्येक वाचकाने (केवळ सभासदाने नव्हे !) खालील मुद्यांच्या आधारे आपल्या प्रतिक्रिया पोस्टकार्ड, आंतरदेशीय पत्राद्वारे किंवा हाच कागद वा याची झेरॉक्स प्रत पाकिटात घालून अवश्य कळवाव्यात ही विनंती. (योग्य ठिकाणी ✓ टिक करावे.)

१) अंक कसा वाटतो ? उत्तम ☐ बरा ☐ असमाधानकारक ☐

२) आपल्याला आवडलेले लेख १. ________

२. ________ ३. ________

३) आपल्याला न आवडलेले लेख १. ________

२. ________ ३. ________

४) अंकाबाबत व विषयांबाबत आपल्या सूचना १. ________

२. ________ ३. ________

५) संस्थेतर्फे आयोजित चर्चासत्रांत सहभागी होण्यासाठी आवडीचे विषय :-

१. ________ २. ________ ३. ________

---

## अर्थबोधपत्रिका

दिनांक :

*सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज*

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून माहे ........ पासून नोंदवून घ्यावे. एकूण सहा अंकांची वार्षिक वर्गणी ५०/- (परदेशस्थ वाचकांसाठी $ १० फक्त) डिमांड ड्राफ्ट/चेक/मनीऑर्डर/पोस्टलऑर्डरने / रोख पाठवीत आहे. **(फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.)**

चेक/ड्राफ्टचा तपशील - ________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता. ________

________

________

जिल्हा ________ पिन - ________

**सूचना :** चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. सभासदत्वाच्या नूतनीकरणासाठी कृपया पत्रिकेच्या वेष्टनावरील आपला सभासद क्रमांक **अवश्य कळवावा.**

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. आपल्या सदस्यत्व क्रमांकाचा संदर्भ देऊन दुपारी १.०० ते ४.०० या कार्यालयीन वेळात ग्रंथालयातील अनमोल पुस्तकांचा लाभ घेता येईल. वाचनालयातील पुस्तकांतील पाने शुल्क भरून झेरॉक्सही करता येतील. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे (सकाळी १०.३० ते दु. ५.०० या वेळेत ) फोनवरून अथवा प्रत्यक्ष भेटून चौकशी करावी.

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत.

अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी **आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.**

## पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलत

जे पदव्युत्तर विद्यार्थी एकदम दोन वर्षांची वर्गणी भरतील त्यांना पन्नास टक्के सवलतीत अंक मिळतील. पत्रिकेची दोन वर्षांची वर्गणी १०० रुपये. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना सवलतीत फक्त ५० रुपये. नोंदणीसाठी अंतिम मुदत डिसेंबर २००२. आपल्या महाविद्यालयाच्या / विद्यापीठाच्या ओळखपत्राच्या झेरॉक्सप्रतीसह, वर्गणी फक्त मनीऑर्डरने पाठवावी.

## खास अर्थबोधपत्रिकेच्या वर्गणीदारांसाठी

**आ**पण आपल्या ओळखीच्या पाच व्यक्तींची वार्षिक वर्गणी रुपये २५०/- म.ऑ.ने एकत्रपणे पाठवा. आपल्यासह त्या सर्वांना भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे पन्नास रुपये किंमतीचे [ *शोध घेते ते शिक्षण* : प्रा. रमेश पानसे ] हे नवे प्रकाशन भेट पाठविले जाईल.

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY
ARTHABODH
PUNE

# अर्थबोध पुरवणी

# पावसानंतरचे ऊन

एक वेगळा विचार, एक कृतिप्रवण विचार, एक नवी आवश्यक चळवळ ज्यातून सुरू होईल असा विचार समोर ठेवणारा असा एक लेख आपणाकडे पाठवीत आहोत.

आपणास योग्य वाटल्यास याच्या छायांकित प्रती करून आपण इतरांना हा लेख मुक्तपणे पाठवू शकता.

# पावसानंतरचे ऊन

**रमेश पानसे**

माणसाच्या मुलावर जन्मतःच धर्म लादला जातो, ही व्यथित करणारी घटना आहे. प्राण्यांच्या बाबतीत असे घडत नाही. त्यांना धर्म नसतो; निसर्गदत्त असा फक्त 'स्वधर्म' असतो. जगणे, मैथून आणि मृत्यू या जीवनचक्राबाहेर, त्यांचे जीवन युगानुयुगे गेलेले नाही. प्राण्यांना नाही अशी एक महान गोष्ट माणसाला प्राप्त झाली आहे. ती म्हणजे विकसित आणि विकसित होणारा मेंदू. या मेंदूच्या जोरावर माणसाने मोठे भौतिक कर्तृत्व दाखविले आहे तसेच अफाट कल्पनाशक्तीचेही विश्व निर्माण केले आहे. विविध कलांचे नि साहित्याचे, मानवी जीवनातील दालन हे याचेच द्योतक आहे. 'देवा'ची संकल्पना ही अशीच एक मानवाच्या उत्तुंग कल्पनाशक्तीतून साकार झालेली साहित्यिक कल्पना आहे. देव नसला तरी देव आहे असे वाटावे; देव नसावा असे मनोमन पटत असतानाच, देव असावा असेही वाटावे, मानवाने 'देवा'ची निर्मिती केलेली असली तरी देवानेच मानवाची निर्मिती केली आहे, अशी श्रद्धा निर्माण व्हावी, इथपर्यंत नि हजारो वर्षे मानवी मनावर पगडा बसविणारी देवाची संकल्पना हे, मानवाचे शास्त्रज्ञान-तंत्रज्ञान विकासाइतकेच मोठे बौद्धिक कर्तृत्व आहे. देवाच्या संकल्पनेभोवतीच, प्रामुख्याने धर्माची संकल्पना बांधली गेली आहे. त्यामुळे कल्पनाशक्तीचे विशाल स्वरूप त्यामध्येही दृग्गोचर झालेले आहे. एवढेच नव्हे तर देवाच्या संकल्पनेइतकाच मानवी मनाचा ताबा, धर्माच्या संकल्पनेने घेतला आहे. देव जेवढा विशिष्ट समुदायाच्या मनात रुजला आहे, तेवढाच, धर्म त्यांच्या सामाजिक नि सांस्कृतिक वागणुकीचे अधिष्ठान म्हणून व्यवहारात दाखल झाला आहे.

माणसाच्या नित्याच्या वागणुकीशी अशी धर्माची सांगड घातल्याने, माणसाला, तो आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे असे वाटू लागले.

आणि त्याचे हे असे वाटणे, समाजात परंपरेने रूढ केलेल्या, देवळांसारख्या नि धर्मगुरू नि धर्मपीठांसारख्या व्यवस्थांनी अधिकाधिक घट्ट करत नेले. समाजातल्या कित्येक माणसांना, आपल्या जगण्याचे साधन असलेला व्यवसाय म्हणून या व्यवस्था टिकविणे आणि शक्य झाल्यास त्या वाढवणे गरजेचे वाटू लागले. त्यातून एका अलिखित कायद्याची निर्मिती झाली. धर्म ही गोष्ट माणसाच्या जन्माशी जोडली गेली. आई-बापांचा धर्म आपोआपच मुलांना दिला गेला; त्यांच्यावर लादला गेला. त्यामुळे आता आपला जन्मच मुळी कुठल्यातरी 'धर्मा'तच होतो. आपण या घटनेविषयी विचारच करीत नसू तर आपले सारे जीवनच त्या विशिष्ट धर्मात व्यतित होते आणि आपला मृत्यूही धर्मांतर्गतच होतो.

धर्म हा असा आपल्या जीवन-मरणाशी चिकटविला गेला आहे, ही अतिशय व्यथित करणारी गोष्ट आहे. धर्म हा असा आपल्या जीवनाचा अविभाज्य घटक झाला आहे, ही सामाजिकदृष्ट्या अतिशय क्लेशकारक घटना आहे. आपले असंख्य व्यक्तिगत, सामाजिक आणि राजकीय प्रश्नांचे मूळ, या धर्मकल्पनांचा आपल्या मनावर जो पगडा बसलेला आहे, त्यात दडलेले आहे. आज जगातील बहुसंख्य लोकांचा फार मोठा वेळ, शक्ती नि पैसैही तथाकथित धर्मकारणासाठी नि त्यातून निर्माण झालेल्या विविधांगी प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी वाया जातो आहे; एवढेच नव्हे तर देव नि धर्म यांचा मनाला होणारा जाच कित्येकांच्या बाबतीत वैयक्तिक कार्यक्षमतेला नि कर्तृत्वाला बाधा ठरत आहे.

असाही अनुभव येतो की धर्मकल्पनेशी जखडलेल्या अवस्थेत माणसाची स्वतंत्रपणे विचार करण्याची शक्तीच हळूहळू लोप पावू लागते. जो विचार करावयाचा, मग तो स्वतःविषयीचा असो, आजूबाजूच्या समाजाविषयीचा असो अथवा राष्ट्राविषयीचा असो, तो धर्मांतर्गतच संकुचित केला जातो. धर्मापल्याड जाऊन समुदायाचा, मानवी जीवनाचा विचार करण्याचे सामर्थ्यच तो गमावून बसतो.

धर्म हा मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक झाला असला तरी तो आवश्यक घटक नाही, हे पटवून घेणे माणसाला कठीण जाते आहे; ही खरी भविष्याविषयी चिन्ता करावी अशी गोष्ट आहे. मनाला

धर्मबंधनात जखडून ठेवले की धर्माशी फारकत घेण्याचा विचार सुचत नाही; सुचला तरी तो पटत नाही; आणि पटला तरी तो अंमलात आणण्याचे धाडस होत नाही. मग असेही घडते की एक व्यावहारिक शहाणपण म्हणून आपण तो विचार सोडून देतो.

विचार हा सुद्धा स्वतंत्रतेच्या वातावरणातच फुलतो नि फळतो. व्यक्तिगत किंवा सामाजिक जीवनात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर माणसाने स्वतंत्र विचार करण्याची आपली शक्ती दूषित होऊ देता कामा नये. आपण धर्मकल्पनेशी बांधलेल्या आपल्या मनाच्या साखळ्या जरा जरी सैल केल्या तरी स्वतंत्र विचारशक्तीचे वारे आपल्याभोवती खेळू लागते. पाऊस पडून गेल्यानंतरच्या उन्हासारखे निर्मळ नि ताजेतवाने वाटू लागते.

भूतकाळातील माणसाने आपल्या अफाट कल्पनाशक्तीच्या जोरावर धर्मकल्पनेला जन्म दिला; त्याच कल्पनाशक्तीच्या उत्तुंग अशा भरारीने आता धर्मातीत अशा मानवी जीवनाची संकल्पना आपण खचितच जन्माला घालू शकतो.

आपण स्वतःपासून सुरूवात करू शकतो. आपण स्वतःला धर्मातीत मानू शकतो; नव्हे आपण स्वतःला धर्मातीत नेऊ शकतो. या धर्मातीत होण्याच्या प्रवासात आपल्याबरोबर आणखीही कोणी येतील अशी खात्री बाळगू शकतो. धर्म असलेल्या जीवनाकडून धर्म नसलेल्या जीवनाकडे सारा समाज वाटचाल करील असे स्वप्न आपण पाहू शकतो. आता, धर्मातीत समाजाच्या संस्थापनेसाठी आपण प्रस्थान ठेवू या !

■ ■

**अधिक संपर्कासाठी**
रमेश पानसे
सुगंध, विजयानगर कॉलनी,
२११८, सदाशिवपेठ, पुणे - ४११ ०३०
फोन - ४३३०३४३
ई-मेल : panse_ramesh@vsnl.net

SCHOOL OF POLITICAL ECONOMY
ARTHABODH
PUNE

## *संस्कृती मित्र की शत्रू ?*

*माणसे काही रित्या पोकळीत राहात नाहीत. ती सभोवतालच्या विशिष्ट अशा वातावरणात राहत असतात. माणसांच्या सभोवताली विविध यंत्रे, कपडे, इमारती, पुस्तके, साहित्य अशा बऱ्याच काही दृष्य वस्तू असतात, त्याप्रमाणेच त्यांच्या मनातील कल्पना, श्रद्धा, चालीरीती, बोलीभाषा अशा वस्तूरूप नसणाऱ्या पण मनाला जाणवणाऱ्या, अनेक गोष्टीही असतात. माणसांच्या भोवतालचे हे दृष्य व अदृष्य वातावरण म्हणजे संस्कृती होय.*

*संस्कृती ही आपली मार्गदर्शक मित्र आहे; कारण, आपल्या दैनंदिन व्यवहारात ती आपल्याला अनेक प्रकारे मदत करीत असते. उदा. भाषेमुळे आपण विचारांची देवाण-घेवाण करू शकतो, आपले आचार-विचार, कल्पना, श्रद्धा, यांचा योग्य मेळ घालून समाजात वावरण्यासाठी संस्कृतीच आपल्याला मदत करीत असते. बाह्य जगतापासून आपल्यावर होणारे हल्ले परतविण्यास संस्कृतीच पुढे सरसावते. तसेच या बाह्य जगतातील आपला मित्र कोण व शत्रू कोण, हेही बरेचदा आपली संस्कृतीच ठरवीत असते.*

*संस्कृती ही आपली कट्टर शत्रू ठरू शकते; जेव्हा ती आपल्या पलीकडे 'आणखी संस्कृती' आहेत, हे विसरते तेव्हा. संस्कृतीचा वृथा अभिमान तिच्या नाशासाठी कारणीभूत ठरतो. याचे उदाहरण म्हणजे हिटलर.*

*संस्कृतींमध्ये प्रगतीचेही बीज असते आणि नाशाचेही. कोणते बीज रुजवायचे हे शेवटी माणसाच्याच हातात असते. कारण, संस्कृती म्हणजे माणसाचे मनच नव्हे काय ?*

*खरे पाहता संस्कृती ही तटस्थ असते. माणसेच आपल्या मनाप्रमाणे तिला शत्रू वा मित्र ठरवितात आणि तिचा हवा तसा उपयोग करून घेतात. संस्कृती ही समाजातील बहुसंख्य लोकांपर्यंत सहज पोचू शकते म्हणून तिचा दुरूपयोग करणारीही माणसेच आणि तिचा सदुपयोग करून घेऊन आपली व आपल्या संस्कृतीची प्रगती करणारीही माणसेच !!* *(संदर्भ - इंटरनेट)*

RNI, New Delhi, Ref. MAHMAR22654/13/1/2002TC
Dated 23-1-2002 & Declaration Ref. P.H.M./S.R./86/VIII/2002

## भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ▪'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ▪भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ▪अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ▪इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ▪संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ▪संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ▪अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे मंडळ -**

•स. वा. कोगेकर •विकासचंद्र चित्रे •मृणालदत्त चौधरी
•कुमुदिनी दांडेकर •द.ना. धनागरे
•आनंद नाडकर्णी •मनोहर भिडे •नीळकंठ रथ •के. एन्. राज
•व्ही.एम्.राव •दि.चं. वधवा •सु.म. विद्वांस •ए. वैद्यनाथन
•सत्यरंजन साठे •रामदास होनावर

इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे द्वैमासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे